• पुणे, शुक्रवार, २० डिसेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 24 • वर्ष ४ थे, अंक २४ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com | Beyond The News







चिखली-कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामे, पत्राशेडवर 'बुलडोझर' P५



उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मागणी



कांदा निर्यातीवरचे २० टक्के शुल्क रद्द करा P८




## At a Glance

### आमदार निवासात निकृष्ट दर्जाचे जेवण

**नागपूर:** नागपूरच्या आमदार निवासात निकृष्ट दर्जाचे जेवण मिळत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत शिवसेना ठाकरे गटाचे आमदार प्रवीण स्वामी कॅमेरातून शूट करून परिस्थिती दाखवली आहे. आमदार निवासात मिळत असलेल्या निकृष्ट दर्जाच्या जेवणासंबंधी विधानसभा अध्यक्षांकडे प्रवीण स्वामी यांनी लेखी तक्रार केली आहे. मागील चार » पान ७ वर

### डॉ. संतोष तेली यांना सुवर्णपदक

**पुणे :** इंटरनॅशनल कुराश असोसिएशनच्या वतीने मंगोलिया येथे घेण्यात आलेल्या जागतिक कुराश चॅम्पियनशिप स्पर्धेत पुण्यातील डॉ. संतोष तेली यांनी पहिल्यांदाच सुवर्णपदक पटकविले. त्यानिमित्त कुराश असोसिएशन ऑफ महाराष्ट्रातर्फे डॉ. संतोष तेली यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. अर्जुन पुरस्कार विजेते काका पवार यांच्या हस्ते डॉ. तेली यांना शाल, पुष्पगुच्छ, » पान ७ वर

# संसदभवन परिसरात दे-धक्का!

## संसद भवन बनले आखाडा : भाजपचे २ खासदार जखमी, राहुल गांधींवर एफआयआर?


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली- :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्यावरून राजकीय वातावरण तापले आहे. या वादाने पुढचे टोक गाठले. संसदेत हा मुद्दा गाजत असताना संसदे बाहेर चक्क धक्काबुक्की झाली. त्यात भाजपचे दोन खासदार जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉ. आंबेडकर यांच्या अपमानाच्या विरोधात काँग्रेसचे खासदार आज संसदेत निदर्शन करत होते. जय भीम, जय भीमच्या घोषणाही सुरू होत्या. यावेळी काही खासदार संसद भवनात प्रवेश करण्याचा प्रयत्न करत असताना धक्काबुक्की झाली. यात भाजपचे खासदार प्रताप सारंगी व मुकेश राजपूत हे जखमी झाले आहेत. सारंगी यांच्या डोक्याला दुखापत झाली आहे. त्यांना आयसीयूमध्ये ठेवण्यात आले आहे. या दोन्ही खासदारांनी राहुल गांधी यांच्यावर आरोप केले आहेत. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही या घटनेची माहिति देण्यात आली आहे.

**» गदारोळ**

राहुल गांधी यांनी एका खासदाराला धक्का दिला. तो माझ्यावर पडल्यामुळे मी खाली पडलो. मी पायऱ्यांजवळ उभा असताना राहुल गांधी आले आणि त्यांनी एका खासदाराला धक्का दिला. त्याच्या धक्क्याने मीही खाली पडलो, असे प्रतापचंद्र सारंगी म्हणाले. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनीही राहुल गांधी यांना लक्ष्य केले. 'राहुल गांधी हे हाणामारी करण्यासाठीच आले होते. त्यांचे वागणे एखाद्या गुंडासारखे होते.

हा देश गुंडगिरी खपवून घेणार नाही. त्यांनी आमच्या एका वयोवृद्ध खासदाराला ढकलून खाली पाडलं, असे दुबे म्हणाले. केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सर्व प्रकाराचा निषेध केला आहे. संसद हे शारीरिक बळ दाखवण्याचं ठिकाण नाही, असे त्यांनी म्हटले आहे. » पान ७ वर





"जखमी अवस्थेतील प्रतापचंद्र सारंगी यांना पाहून वाईट वाटले. संसदेच्या इतिहासातील हा काळा दिवस आहे. शिष्टाचाराचा भंग झाला आहे. राहुल गांधी आणि काँग्रेसनं संसद भवनाच्या आवारात ज्या प्रकारची गुंडगिरी केली, तसे भारताच्या इतिहासात कधीच घडलेले नाही. आम्ही या गुंडगिरीचा निषेध करतो. — **शिवराजसिंह चौहान**



"आजपर्यंत बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरुंबाबत जे काही सांगितले आहे ते खोटे आहे. संसदेत जे काही घडले ते योग्य नाही. लोकसभा, राज्यसभा या ठिकाणी अशा गोष्टी घडू नयेत हाच आमचा प्रयत्न असतो. आम्ही कुठलाही अडथळा आणलेला नाही. १४ दिवस सभागृहं कशी चालतील याकडेच आम्ही लक्ष दिले आणि मग आंदोलन केले.आमच्याकडे हा मुद्दा होता की अदाणी देशाला लुटत आहेत आणि त्या मुद्द्यावरुन आम्ही सरकारला प्रश्न करत होतो. —**मल्लिकार्जुन खरगे**



'मी आत जाण्याचा प्रयत्न करत होतो. भाजप खासदार मला रोखण्याचा प्रयत्न करत होते आणि मला धमक्या देत होते, मी कुणालाही धक्का बुक्की केली नाही. —**राहुल गांधी (खासदार)**

# अखेर महायुतीचे खाते वाटप ठरले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महायुतीतील खातेवाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाला आहे. शिवसेना, भाजप, आणि राष्ट्रवादीच्या गटांमध्ये विभागणी झाली आहे. शिवसेनेच्या वाट्याला महत्त्वाची खाती आली असून, या विभागणीमुळे पुढील राजकीय समीकरणे निश्चित होतील. गेल्या मंत्रिमंडळातील महत्वाची खाती त्या- त्या पक्षाकडेच राहणार आहे. » पान ७ वर

### कॅबिनेट मंत्री व त्यांचे खाते

| | |
|---|---|
| देवेंद्र फडणवीस | **मुख्यमंत्री व गृह विभाग** |
| अजित पवार | **उपमुख्यमंत्री व अर्थ खाते** |
| एकनाथ शिंदे | **उपमुख्यमंत्री व नगरविकास खाते** |
| चंद्रशेखर बावनकुळे | **उर्जा विभाग** |
| राधाकृष्ण विखे पाटील | **महसूल विभाग** |
| हसन मुश्रीफ | **कृषी विभाग** |
| चंद्रकांत पाटील | **उच्च व तंत्रशिक्षण विभाग** |
| गिरीश महाजन | **आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग** |
| गुलाबराव पाटील | **जलसंपदा विभाग** |
| गणेश नाईक | **कामगार विभाग** |
| दादा भुसे | **पर्यावरण विभाग** |
| संजय राठोड | **आदिवासी विकास विभाग** |
| धनंजय मुंडे | **सहकार व वस्त्रोद्योग विभाग** |
| मंगलप्रभात लोढा | **गृहनिर्माण विभाग** |
| उदय सामंत | **उद्योग विभाग** |
| जयकुमार रावळ | **पर्यटन व सांस्कृतिक विभाग** |
| पंकजा मुंडे | **सामाजिक न्याय विभाग** |
| अतुल सावे | **अल्पसंख्याक विकास विभाग** |
| आशिष शेलार | **अर्थ व नियोजन विभाग** |
| अशोक उईके | **पशुसंवर्धन विभाग** |
| शंभूराज देसाई | **सार्वजनिक बांधकाम विभाग** |
| दत्ता भरणे | **अन्न व नागरी पुरवठा विभाग** |
| आदिती तटकरे | **महिला व बालकल्याण विभाग** |

# 'वन नेशन, वन इलेक्शन'साठी जेपीसी स्थापन

## ३१ सदस्यांचा समावेश: महाराष्ट्रातून खा. सुप्रिया सुळे, श्रीकांत शिंदे?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या विधेयकावर विचार करण्यासाठी संसदेची संयुक्त समिती (जेपीसी) स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये प्रियांका गांधी वाड्रा यांच्यासह सुप्रिया सुळे, श्रीकांत शिंदे यांच्यासह ३१ सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. या समितीत लोकसभेचे २१ आणि राज्यसभेचे १० असे एकूण ३१ सदस्य असतील. मनीष तिवारी, धर्मेंद्र यादव, कल्याण बॅनर्जी, संबित पात्रा, अनिल बलूनी, अनुराग सिंह ठाकूर यांचीदेखील जेपीसीसदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दोन्ही सभागृहातील संख्याबळाच्या दृष्टीने पॅनेलमध्ये भाजपचे सर्वाधिक सदस्य आहेत. कायदामंत्री अर्जुनराम मेघवाल आज लोकसभेत समिती स्थापनेचा प्रस्ताव मांडणार आहेत. या समितीचे संभाव्य अध्यक्ष म्हणून माजी विधी राज्यमंत्री चौधरी यांची निवड होण्याची शक्यता आहे. ठाकूर यांचे देखील नाव चर्चेत आहे. नियमानुसार अध्यक्ष ओम बिर्ला अंतिम निर्णय घेतील. राज्यसभेने स्वतंत्र संदेशाद्वारे समितीसाठी आपल्या १० सदस्यांची नावे जाहीर केली आहेत. या समितीमध्ये लोकसभेच्या १४ सदस्यांचा समावेश करण्यात आला असून त्यापैकी १० सदस्य भाजपचे आहेत.

### खासदारांचा समितीत समावेश

१. पी.पी. चौधरी
२. सीएम रमेश
३. बासरी स्वराज
४.पुरुषोत्तम रुपाला
५. अनुराग सिंह ठाकूर
६. विष्णू दयाल राम
७. भर्तृहरी महताब
८. संबित पात्रा, डॉ.
९. अनिल बलूनी
१०. विष्णू दत्त शर्मा
११. प्रियांका गांधी वाड्रा
१२. मनीष तिवारी
१३. सुखदेव भगत
१४. धर्मेंद्र यादव
१५. कल्याण बॅनर्जी
१६.सेल्वगणपति
१७. जी. एम. हरीश बालयोगी
१८. सुप्रिया सुळे
१९. श्रीकांत शिंदे
२०. चंदन चौहान
२१.बालशोवरी वल्लभनेनी

देशात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्याची तरतूद करणारे संविधान (१२९ वी दुरुस्ती) विधेयक, २०२४ आणि संबंधित 'केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक, २०२४' कनिष्ठ सभागृहात सादर करण्यात आले. ज्याला विरोधी पक्षांनी कडाडून विरोध केला आहे. मतदानानंतर हे विधेयक सभागृहात मांडण्यात आले. विधेयकाच्या बाजूने २६३ तर विरोधात १९८ मते पडली. त्यानंतर मेघवाल यांनी सभागृहाच्या संमतीनंतर 'केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक २०२४' आवाजी मतदानाने मांडले. विरोधी पक्षांनी या विधेयकाला राज्यघटनेच्या मूलभूत रचनेवर आणि संघराज्यावर हल्ला असल्याचे म्हटले आहे.

## विधान परिषद सभापतीपदी राम शिंदे यांची एकमताने निवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** भाजपचे आमदार आणि माजी मंत्री राम शिंदे यांची विधानपरिषद सभापतीपदी एकमताने निवड करण्यात आली. विधानपरिषदेमध्ये सभापतीपदाचा प्रस्ताव सादर करण्यात आला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासोबत सर्व नेत्यांनी राम शिंदे यांना सभापतींच्या खुर्चीवर आसनस्थ केले. तसेच सर्वांनी शुभेच्छा दिल्या.शिवसेना नेत्या, उपसभापती निलम गोऱ्हे या विधानपरिषदेच्या सभापती पदासाठी इच्छुक होत्या. विधानपरिषदेचे » पान ७ वर

# लाडक्या बहिणींची संक्रांत गोड!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** लाडकी बहीण योजनेचा डिसेंबर महिन्याचा हप्ता अद्यापही बँक खात्यात जमा झालेला नाहीय. त्यामुळे हा हप्ता कधी मिळणार, असा प्रश्न लाडक्या बहिणींच्या मनात उपस्थित होत आहे. महाराष्ट्र सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरू केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना खूपच लोकप्रिय झाली. या योजनेच्या अंतर्गत महिलांच्या बँक खात्यात थेट १५०० रुपये जमा करण्यात येत आहेत. जानेवारी महिन्याचा हप्ता हा मकरसंक्रातीपूर्वी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.त्यामुळे नवीन वर्षात लाडक्या बहिणींचा संक्रांत सण आता गोड होणार आहे.

लाडकी बहीण योजनेचा शेवटचा हप्ता ऑक्टोबर महिन्यात जमा झाला होता. ऑक्टोबर महिन्यात ऑक्टोबर आणि नोव्हेंबर असे दोन्ही महिन्यांचे एकत्रित पैसे देण्यात आले होते. निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे हा निर्णय घेण्यात आला होता. पण आता सरकार स्थापन झाले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसोबतच इतर मंत्र्यांचा शपथविधी सोहळा सुद्धा पार पडला. पण अद्यापही डिसेंबर महिन्याचा हप्ता लाडक्या » पान ७ वर

SINHGAD TECHNICAL EDUCATION SOCIETY
19/15, Erandawane, Smt. Khilare Marg, Off. Karve Road, Pune - 411004
Phone: 020 - 25431001 E-mail:admissions@sinhgad.edu
Sinhgad Institutes

B. PHARM / M. PHARM : ADMISSIONS OPEN : 2024-25
All the Institutes are Accredited by NAAC

Applications are invited from the eligible candidates for admissions under **Institutional Quota and Vacant Seats against CAP** for the Academic Year 2024-25 to **First Year of B. Pharm. and First Year of M. Pharm** Degree Courses approved by Pharmacy Council of India; Recognized by Govt. of Maharashtra; Affiliated to Savitribai Phule Pune University.

**SINHGAD COLLEGE OF PHARMACY**
VADGAON-AMBEGAON (BK), PUNE - 411 041
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041 Phone : 020 - 24354720
B. Pharm ▸ DTE Code: PH 6358
M. Pharm ▸ DTE Code: MP 6358
Principal : Dr. Rajesh B. Patil [09822100527]

**SINHGAD INSTITUTE OF PHARMACY**
NARHE, PUNE – 411 041
Narhe, Off Westerly Bypass Road, Pune - 411 041 Phone : 020 - 66831801 / 02
B. Pharm ▸ DTE Code: PH 6363
M. Pharm ▸ DTE Code: MP 6363
Principal : Dr. Moreshwar P. Mahajan [07030209755]

**SMT. KASHIBAI NAVALE COLLEGE OF PHARMACY**
KONDHWA (BK), PUNE - 411 048
Kondhwa (Bk), Kondhwa - Saswad Road, Pune - 411048 Phone: 020 - 67571171 / 72
B. Pharm ▸ DTE Code: PH 6362
M. Pharm ▸ DTE Code: MP 6362
I/c Principal : Dr. Minal R. Ghante [09850190499]

**SINHGAD INSTITUTE OF PHARMACEUTICAL SCIENCES**
KUSGAON (BK), LONAVALA, DIST. PUNE - 410401
Gat No. 309, Kusgaon (Bk), Off Mumbai-Pune Expressway,
Lonavala, Maval, Dist. Pune - 410401 Phone: 02114 - 673322 / 24
B. Pharm ▸ DTE Code: PH 6378
Principal : Dr. (Mrs.) Rukhsana Rub Pinjari [09890937888]

**Eligibility: A) F. Y. B. Pharm:** The candidate should have passed Std. 10+2 Examination or its equivalent with English as one of the subjects and Physics, Chemistry, Mathematics or Biology as optional subjects individually. The candidate should have obtained non-zero positive score in National Eligibility cum Entrance Test (NEET) or should have appeared in all the subjects in MHT-CET-2024 and should have obtained non-zero score in MHT-CET-2024 conducted by the Competent Authority.
**B) F. Y. M. Pharm:** Bachelor of Pharmacy from any institute approved by Pharmacy Council of India or Central or State Government with at least 55% marks in aggregate (at least 50% marks in case of Backward Class category, Economically Weaker Section and Persons with Disability Candidates belonging to Maharashtra State only) and obtained non-zero positive valid score in Graduates Pharmacy Aptitude Test (GPAT) conducted by National Testing Agency. For more details, contact Principal of the respective institute. Visit **www.mahacet.org** or **www.sinhgad.edu**
**Admission Procedure**: The candidate desirous for admission under Probable Vacant Seats against CAP should obtain the Admission Form & Prospectus available at respective college office. The duly filled in Admission Form along with testimonials with Rs. 1000/- for F. Y. B. Pharm. and 1500/- for F. Y. M. Pharm as admission form fee and the requisite fees should be submitted in the respective college office during working hours. The admissions will be given on the basis of merit. The candidate should directly approach to the Principal of the Institute / College or Dy. Registrar (Admissions) - 09623448939.
**Unique Features**: • Excellent Placement Track Record • Well Stocked Library • e-Library and Multimedia • Round the Clock Internet & Wi-Fi Connectivity • Separate Hostels for Boys & Girls with Mess Facility • Play Fields & Gymnasium • On Campus Medical Facility • Banking & Shopping Complex • Lush Green Campus • Student Friendly Environment • Students Amenities provided in the Campus.
**Note:** Sinhgad Institutes has not authorized any person / Agency / Organization / Association / Representative for admissions to the courses conducted by all institutes under Sinhgad Technical Education Society. The candidates are advised to remain in touch with the Dy. Registrar (Admissions) / College Principal / Authorized College Staff only.

*Subject to Pune Jurisdiction Only
**Prof. M. N. Navale**
Founder President

### १७ कोटींचे बिल 'महापॉवर-पे'ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्ह्यात प्रामुख्याने ग्रामीण भागातील १ लाख १२ हजार ३५८ ग्राहकांनी वॉलेटद्वारे १६ कोटी ९६ रुपयांचा भरणा केला. यात संबंधित ५६ वॉलेटधारकांना ५ लाख ६१ हजार रुपयांचे कमिशन देण्यात आले.ग्राहकांना वीजबिल भरणे अधिक सुलभ व्हावे यासाठी महावितरणने स्वतःचे 'महापॉवर-पे' पेमेंट वॉलेट सुरू केले आहे. त्यात १८ वर्षांपेक्षा जास्त कोणतीही व्यक्ती तसेच छोटे व्यावसायिक, » पान ७ वर

# एसटी प्रवास महागणार, भाडेवाढीची तयारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात नुकत्याच विधानसभा निवडणुका पार पडल्या आहे. महायुतीसरकार देखील स्थानप झाले आहे. रखडलेला मंत्रिमंडळ विस्तार झाला आहे. दरम्यान, नवे सरकार स्थापन झाल्यावर आता भाववाढीची टांगती तलवार नागरिकांच्या डोक्यावर येऊन पडली आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला झळ पोहोचवणारी बातमी पुढे आली आहे. एसटी महामंडळाने तब्बल १४.९५ टक्के भाडेवाढीचा प्रस्ताव दिला आहे. या निर्णयावर सरकार अंतिम निर्णय घेण्याची शक्यता आहे, अशी माहिती एसटी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी दिली. राज्यात एसटी महामंडळाने नागरिक प्रामुख्याने प्रवास करत असतात. सध्या बसमध्ये महिलांना अर्ध्या किमतीत तर वृद्ध नागरिकांना मोफत प्रवास आहे. मात्र, आता एसटी महामंडळाने राज्य सरकारला तब्बल १४.९४ टक्क्यांनी भाडेवाढ करण्याचा प्रस्ताव पाठवला आहे. सातत्याने होत असलेल्या महागाईमुळे एसटी महामंडळाने भाडेवाढीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. हा प्रस्ताव निवडणुकीपुर्वी सादर करण्यात आला होता. मात्र, शिंदे सरकारने या बाबत कोणताही निर्णय दिला नव्हता. आता निवडणुका होऊन नवे सरकार स्थापन झाले आहे. नवे सरकार स्थापन होताच एसटी भाड्याच्या वाढी संदर्भात मागणी करण्यात आली आहे.



**१४.९५ %**
• एसटी महामंडळाने तब्बल १४.९५ टक्के भाडेवाढीचा प्रस्ताव दिला आहे. या निर्णयावर सरकार अंतिम निर्णय घेण्याची शक्यता आहे

# स्पर्धा परीक्षांसाठी '2RE'चा 'स्मार्ट' उपाय

**रिसर्च**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आपल्या देशातील युवावर्ग सरकारी नोकरीच्या तयारीसाठी ६-७ वर्षे वाया घालवतो. परंतु, प्रत्येक तरुणाला एवढा वेळ का लागतो? याचे प्रमुख कारण म्हणजे स्पर्धा वाढली असून, परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जवळपास १२,००,००० पेक्षा अधिक असते, तर जागा १,००० पेक्षा कमी! मागील वर्षांच्या आकडेवारीनुसार यशाचे प्रमाण फक्त 0.1% आहे, म्हणजेच 99.9% विद्यार्थी अपयशी ठरतात.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) विविध पदांसाठी घेत असलेल्या अनेक परीक्षांसाठी एकट्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी दरवर्षी भरलेले ३२ लाख फॉर्म विचारात घ्या. तथापि, » पान ७ वर


### 2RE चे वैशिष्ट्ये

- **ऑडिओ बुक्स:** अभ्यासक्रम ऑडिओ स्वरूपात उपलब्ध.
- **वैयक्तिकृत मार्गदर्शन:** AI तंत्रज्ञानावर आधारित अभ्यास आणि प्रगतीचे विश्लेषण.
- **टेस्ट प्रेप फिचर्स:** MCQs, फ्लॅश कार्ड्स, आणि स्व-मूल्यमापनाचे साधने.
- **फ्रीमियम मॉडेल:** मोफत आणि प्रीमियम योजना.
- AI-आधारित ऑडिटिंग: विद्यार्थ्यांचा अभ्यास, वेळ, आणि मूड ट्रॅक करण्यासाठी स्मार्ट टूल्स.
- तुमचे यश आमचे ध्येय: 2RE तुम्हाला स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी स्मार्ट, सुलभ आणि योग्य साधने पुरवते.

**भविष्यातील योजना:** 2RE महाराष्ट्रातील MPSC आणि UPSC विद्यार्थ्यांसाठी अधिक सखोल मार्गदर्शन देत आहे. लवकरच, हे तंत्रज्ञान देशभर पसरवून, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल.



"**2RE कसा बदल घडवतो?** कोचिंग क्लासेस भरपूर आहेत, पण टेक्नोलॉजीचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांना सुलभ शिक्षण देणे शक्य आहे.तसेच 2RE विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिकृत अभ्यास, ऑडिओ फॉर्मेटमधील सामग्री, आणि स्मार्ट टेस्ट प्रेप तंत्रज्ञानाद्वारे शिकण्याचा वेगळा अनुभव देते.
— **सुजित चणखोरे, सह-संस्थापक, 2RE**



"**स्पर्धा परीक्षांमध्ये यशाचे गमक** "2RE मुळे अभ्यास सुलभ आणि वैयक्तिक झाला. ऑडिओ बुक्स मुळे प्रवासातही अभ्यास करता आला!"
— **यशस्वी विद्यार्थीनीं**

## प्रशासनाने निर्णय दोन वर्षातच बदलला, रस्ता आता ८४ मीटरचा

# कात्रज- कोंढवा रस्त्याचे 'भिजत घोगंड' कायमच...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** राष्ट्रसंचार कात्रज-कोंढवा रस्त्याचे भिजत घोगंड अजूनही कायमच आहे, आधीच्या भूसंपादनासाठी 'अडथळयांची शर्यत' सुरु असतानाच महापालिका प्रशासनाने पुन्हा एकदा निर्णय बदलला आहे. त्यानुसार कात्रज- कोंढवा रस्ता आता ८४ मीटरचा करण्यात येणार असून त्यासाठी तब्बल ९० हजार चौरस मीटर जागा ताब्यात घ्यावी लागणार आहे, या भूसंपादनासाठी राज्य शासनाकडे २३१ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे, त्यामुळे हे काम आणखी 'वेटिंग' वर जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

आता अवघ्या दोन वर्षांतच महापालीकेने पुन्हा एकदा आपला निर्णय बदलला असून आता कात्रज कोंढवा रस्ता पुन्हा ८४ मीटर केला जाणार आहे. यासाठी सुमारे तब्बल ९० हजार चौरस मिटर जागा ताब्यात घ्यावी लागणार आहे. त्याच्या भूसंपादनासाठी महापालिकेने आणखी २३१ कोटी रुपयांची मागणी राज्य सरकारकडे केल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिली.

महापालिकेकडून कात्रज-कोंढवा ( खडीमशिन चौक) पर्यंत रस्ता रूंदीकरण करत हा रस्ता ८४ मीटर करण्याचे काम हाती घेण्यात आले होते. मात्र, रस्ता ८४ मीटर रूंद करण्यासाठी भूसंपादनास मोठ्या प्रमाणात निधी लागणार असल्याने महापालिकेने हा रस्ता ५० मीटर करण्याचा निर्णय घेत शासनाकडे या रस्त्यासाठी २०० कोटींची मागणी केली होती.मात्र, शासनाने केवळ १४० कोटींचा निधी पालिकेस दिला.

**राष्ट्रसंचार EXCLUSIVE**

महापालिकेकडून या रस्त्याचे काम मागील सहा वर्षांपासून सुरू आहे. हा चार किलोमीटरचा रस्ता करण्यासाठी पालिकेस भूसंपादनासाठी ७१० कोटींची गरज होती. मात्र, निधी अभावी पालिकेने अडीचशें कोटींच्या कामाची निविदा काढली. त्यानंतर कामासाठी जागाच नसल्याने हे काम रखडले. या रस्त्यावर अवजड वाहनांची वर्दळ अधिक असल्याने अनेक अपघात घडले आहेत त्यात काहींचे प्राण गेले असून अनेक जण जायबंदी झाले आहेत. त्यामुळे महापालिकेने दोन वर्षांपूर्वी हा रस्ता ५० मीटरच रूंद करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे भूसंपदानाचा खर्च कमी होऊन तो २८० कोटी झाला. यामध्ये महापालिकेने ८० कोटींचा खर्च करण्याची तयारी दाखवित शासनाकडे २०० कोटींच्या निधीची मागणी केली. मात्र, शासनाने केवळ १४० कोटीच निधी दिला. त्यातून ५०० मीटर रस्त्यासाठी भूसंपादन सुरू आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कात्रज-कोंढवा रस्त्यासंदर्भात बैठक घेतली. त्यामध्ये महापालिकेने भूसंपादन करून द्यावे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातर्फे रस्त्याचे काम केले जाईल, अशी सूचना केली आहे.

### निर्णय नाही मात्र नाकाबंदी सुरु

- या महत्वाकांक्षी कामासाठी महापालिका प्रशासनाला आतापर्यंत भूसंपादन करण्यात सपशेल अपयश आले आहे, विशेष म्हणजे त्यासाठीचा १४० कोटी रुपयांचा निधी तयार असतानाही जागाच ताब्यात नसल्याने महापालिका प्रशासनाला कोणताही निर्णय घेता येत नाही. मात्र; हे वास्तव असतानाच प्रशासनाने वाहतूक पोलीसांशी संगनमत करुन या चौकात आधीपासूनच नाकाबंदी केली आहे. त्याचा सर्वाधिक फटका हा सर्वसामान्य वाहनचालक आणि नागरिकांना सहन करावा लागत आहे.



"महापालिकेने आता संपूर्ण रस्ता ८४ मिटर रुंदीचा करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. ८४ मिटर रुंदीचा रस्ता करण्यासाठी महापालिकेला ९० हजार चौरस मिटर जागेची आवश्यकता आहे, त्यासाठी २३१ कोटी रुपये खर्च येणार आहे. ही रक्कम उपलब्ध व्हावी यासाठी प्रस्ताव पाठवला आहे."

— **डॉ. राजेंद्र भोसले,** महापालिका आयुक्त

## ? पुण्यात काय घडतंय...

### बाबा पोकर्णा पुरस्कार सोहळा




- **आयोजक :** दि पूना मर्चंट्स चेंबर
- **पुरस्कारार्थी :** मे. पुरणचंद अॅन्ड सन्स्चे संचालक सतीश पुरणचंद गुप्ता
- **हस्ते :** राज्यसभा खासदार व सुप्रसिद्ध हिरे व्यावसायिक गोविंद ढोलकिया
- **प्रमुख उपस्थिती :** प्रकाश धोका, ललितगांधी (राज्यमंत्री दर्जा, जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ अध्यक्ष)
- **आयोजक :** चेंबरचे अध्यक्ष रायकुमार नहार, उपाध्यक्ष अजित बोरा, सचिव ईश्वर नहार, सहसचिव आशिष दुगड, माजी अध्यक्ष राजेंद्र बाठिया, प्रवीण चोरबेले.
- **कुठे :** जयराज स्पोर्ट्स अँड कन्वेन्शन सेंटर, क्रोम बॅक्वेट, कोंढवा
- **कधी :** २० डिसेंबर, सायंकाळी ५ वाजता

### राष्ट्रीय आरोग्य चित्रपट महोत्सव



- **उदघाटक :** पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम
- **प्रमुख उपस्थिती :** अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर
- मानसिक आणि शारीरिक आरोग्याशी संबंधित विविध विषयांबद्दल जागरूकता निर्माण करणारे चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी महोत्सव आयोजित केला जातो.
- **कुठे :** राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय,
- **कधी :** २० ते २२ डिसेंबर, दुपारी दोन वाजता

### पहिले बालरंगभूमी संमेलन



- **उदघाटक:** प्रख्यात चित्रकार अरुण दाभोळकर, ज्येष्ठ अभिनेत्री सविता मालपेकर
- **प्रमुख उपस्थिती:** सचिन पिळगावकर, मोहन जोशी, गंगाराम गवाणकर, डॉ. निशीगंधा वाड, कुमार सोहवी, शैलेश दातार, ऋतुजा देशमुख
- **आयोजक:** अॅड. नीलम शिर्के- सामंत
- **कुठे :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक, बिबवेवाडी
- **कधी :** २० ते २२ डिसेंबर, सकाळी ९
- **शुल्क :** कार्यक्रम सर्वांसाठी खुला

## Selected

### पिस्तूल बाळगणारा सराईत जेरबंद

**पुणे :** बेकायदा देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या मुंबईतील सराइताला गुन्हे शाखेने अटक केली. हडपसर भागातील सय्यदनगर परिसरात ही कारवाई करण्यात आली. त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल, तसेच काडतूस जप्त करण्यात आले.

रेहान नझीर कुरेशी (वय ३४, रा. लिंबोनी बाग, गोवंडी, मुंबई) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. हडपसर भागात देशी बनावटीचे पिस्तूल बाळगल्याप्रकरणी साहिल राजू शेख (वय २४) आणि जैद जावेद खान (वय २२) यांना गुन्हे शाखेच्या युनिट सहाकडून अटक करण्यात आली होती. त्यांच्याकडून तीन पिस्तूले आणि चार काडतुसे जप्त करण्यात आली होती. याप्रकरणात त्यांचा साथीदार रेहान कुरेशी पसार झाला होता. कुरेशी हडपसर भागातील सय्यदनगर परिसरात येणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक वाहिद पठाण यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि एक काडतूस जप्त करण्यात आले.

### कामाचे पैसे मागितल्याने दोघांवर कोयत्याने वार; आरोपीस अटक

**पुणे :** कामाचे पैसे मागितल्याने झालेल्या वादातून दोघांवर कोयत्याने वार करण्यात आल्याची घटना लोहगाव भागात घडली. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली. रोहित प्रकाश पारख (वय २९, रा. वडगाव शेरी), अक्षय पाटोळे अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी विमानतळ पोलिसांनी कल्पेश फकीरचंद रंगारी (वय ४२, रा. फॉरेस्ट पार्क सोसायटी, लोहगाव) याला अटक केली आहे.

### भीमथडी जत्रा आजपासून

**पुणे :** महिला बचत गटांना हक्काची बाजारपेठ मिळवून देणारी भीमथडी जत्रा २० ते २५ डिसेंबर दरम्यान सिंचननगर येथील कृषी महाविद्यालय मैदानात आयोजित करण्यात आली आहे. प्रायोजक व यशस्वी महिला उत्पादकांच्या हस्ते या जत्रेचे उदघाटन होणार आहे. त्यानंतर ही जत्रा पुणेकरांसाठी सुरु होईल. २१ ते २५ डिसेंबरदरम्यान सकाळी १० ते रात्री १० या वेळेत जत्रा खुली राहणार आहे.ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट' बारामती, 'भीमथडी फाउंडेशन व 'महात्मा फुले कृषी विद्यापीठ' राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या जत्रेत राज्यातील १८ पेक्षा जास्त जिल्ह्यासह देशातील इतर १२ राज्यामधून महिला बचत गट व महिला उद्योजिकांना ३२५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

## पुणे नेत्रतज्ज्ञ संघटनेची वार्षिक परिषद संपन्न




**पुणे :** पुणे नेत्रतज्ज्ञ संघटनेची १७ वी वार्षिक परिषद 'स्पेक्ट्रम २०२४' चे आयोजन महाराष्ट्र नेत्रतज्ज्ञ संघटनेच्या संयुक्त विद्यमाने औंधमधील भारतीय विज्ञान व संशोधन संस्था येथे करण्यात आले होते. यावेळी पोस्टर प्रकाशन करताना मान्यवर.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रसंचार पुणे नेत्रतज्ज्ञ संघटनेची १७ वी वार्षिक परिषद 'स्पेक्ट्रम २०२४' चे आयोजन महाराष्ट्र नेत्रतज्ज्ञ संघटनेच्या संयुक्त विद्यमाने औंधमधील भारतीय विज्ञान व संशोधन संस्था येथे करण्यात आले होते. परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यास ऑल इंडिया ऑप्थलोमोलॉजिकल सोसायटीचे अध्यक्ष डॉ.समर बसक, ज्येष्ठ नेत्रचिकीत्सक पद्मश्री तात्याराव लहाने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**» वार्षिक परिषद**

पुणे नेत्रतज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्ष डॉ.राधिका परांजपे, डॉ. नितीन कोलते, डॉ. आश्विनी मिसाळ, डॉ. वृषाली वरद आदींनी या परिषदेचे आयोजन केले होते. परिषदेत ब्रिटन, ओमान सह कलकत्ता, बंगळुरु, ओडिसा, जोधपूर, नवी दिल्ली, केरळ तामिळनाडू, गुजरात, महाराष्ट्रातून पुण्यासह मुंबई, नागपूर येथील तज्ज्ञ सहभागी झाले होते.

डॉ. समर बसक म्हणाले, नव्या पिढीच्या तरुण डॉक्टरांची विचार करण्याची क्षमता वेगळी असते. त्यांच्या विचारांना वेगळा पैलू असतो. त्यामुळे वेगवेगळ्या पिढीच्या डॉक्टरांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे. हेच आयुष्याचे तत्त्वज्ञान आहे.

डॉ. राधिका परांजपे म्हणाल्या, या परिषदेत नेत्र विज्ञान क्षेत्रातील संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान आणि नवीन उपाययोजना यांवर सखोल चर्चा झाली. परिषदेत भारतातील आणि परदेशातील आघाडीचे नेत्र तज्ज्ञ, संशोधक आणि नेत्रचिकित्सा क्षेत्रातील व्यावसायिक सहभागी झाले होते.

## कर्वेनगर लैंगिंग अत्याचारप्रकरणी संस्थाचालकांना सह आरोपी करा

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया वकील आघाडीची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुण्याला लाज आणणाऱ्या अतिशय गंभीर अशा घटना घडत आहेत, त्यामुळे पुण्याचे नाव खराब होत आहे. त्याची दखल घेऊन अशा घटना टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात आणि दोषींना कडक शासन करण्यात यावे अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया वकील आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. त्यासंदर्भात पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांना निवेदन देण्यात आले.

अश्या घटनेच्या घटनेच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले, यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया वकील आघाडी अॅड. मंदार जोशी, अॅड. शुभांगी ननावरे, अॅड आनंद कांबळे, पोलीस मित्र संघटनेचे मनोज पाटील, पत्रकार धनजंय जाधव आदी याप्रसंगी उपस्थित होते.

पुण्यातील कर्वेनगर येथील मिलेनियम स्कूल चे डान्स टीचर कडून मुलानं सोबत घृणास्पद लैंगिक कृत्य करणाऱ्या नराधम आरोपी व त्याला पाठीशी घालणाऱ्या निष्काळजी संस्थाचालक व इतर दोषी यांची चौकशी करून त्यांना या आरोपी सोबत सहआरोपी करण्यात यावे,संस्थाचालक पैशाच्या जोरावर अटकपूर्व जामीन मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत असे समजते आहे या बाबत देखील पोलिसांनी योग्य ती दक्षता घ्यावी,सदर नराधम आरोपीचे इतर कोणी मित्र नातेवाईक या मध्ये सहभागी आहेत का याचा सखोल तपास करण्यात यावा, शाळे मध्ये शिक्षक म्हणून नेमताना काय बाबी तपासून शाळेने शिक्षक म्हणून नेमले होते याचा सखोल तपास व्हावा, घाबरलेल्या मुले व पालक यांना संरक्षण देण्यात यावे,शिक्षण आयुक्त यांना देखील या संदर्भात वेगळी चोकशी करण्याचे आदेश देण्यात यावे तसेच पीडित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये तसेच भविष्यात शाळेकडून आणि संस्थाचालक यांचे कडून कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची लेखी हमी देण्यात यावी.

## ससून मध्ये मार्गदर्शन केंद्र सुरु करण्याची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पुण्यासाठी ससून रुग्णालय येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी चे मध्यवर्ती मदत व मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात यावे अशी मागणी आमदार सुनिल कांबळे यांनी केली आहे.पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या ससून सर्वोउपचार रुग्णालयात असंख्य गोरगरीब रुग्ण उपचारांसाठी महाराष्ट्रभरातून दाखल होत असतात, तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी च्या फॉर्म साठी लागणाऱ्या ससून शासकीय रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांच्या सही शिक्क्यासाठी असंख्य रुग्णांची रांग त्याठिकाणी दररोज असते.तरी या सर्वाचा विचार करता ससून सर्वोउपचार रुग्णालय येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे पुणे शहर व जिल्हा म्हणून एक मध्यवर्ती मदत व मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात यावे. अशी मागणी सुनिल कांबळे यांनी केली आहे. जेणेकरून तेथे येणाऱ्या रुग्णांना योग्य ते मार्गदर्शन व मदत होईल. असं देखील ते म्हणाले आहेत.

## ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणारे देवदूतच - संदीप खर्डेकर.

### क्रिएटिव्ह फाउंडेशन तर्फे रक्तदाब तपासणी यंत्र भेट



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मशाल संस्थेच्या माध्यमातून वस्ती विभागातील ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणारे हे देवदूतच आहेत असे गौरवोदगार क्रिएटिव्ह फाउंडेशन चे अध्यक्ष संदीप खर्डेकर यांनी काढले.

आज मशाल संस्थेच्या आरती भोर आणि कविता तडवी यांना ज्येष्ठ नागरिकांच्या तपासणी साठी सात रक्तदाब तपासणी यंत्र भेट देताना कर्तव्यपूर्तीचे समाधान आहेच पण भविष्यात देखील त्यांना अधिकाधिक सहाय्य करणार असल्याचे ही संदीप खर्डेकर म्हणाले.यावेळी ट्रस्ट चे सदस्य सारंग राडकर, सोशल वर्कर आणि मशाल च्या कम्युनिटी ऑफिसर आरती भोर, कविता तडवी, वंशिका ट्रस्ट चे विशाल सातपुते इ मान्यवर उपस्थित होते.

मशाल संस्थेच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करणाऱ्या व त्यांना औषधोपचार उपलब्ध करून देणाऱ्या आरती भोर व कविता तडवी यांनी ज्येष्ठ नागरिकांच्यात हाडांचा ठिसूळपणा, रक्तदाब, मधुमेह इ आरोग्याच्या समस्या वाढल्या असून परिस्थिती मुळे ते दुखणं अंगावर काढतात असे सांगितले.त्यावर संदीप खर्डेकर यांनी "ग्लोबल ग्रूप, वेस्टर्न इंडिया फोर्जिंग, नवलराय ए हिंगोरानी चॅरिटेबल ट्रस्ट" या सह अनेक दानशूर अश्या कार्याला मदत करत असतात त्यामुळे येणाऱ्या काळात तुम्हाला जी मदत लागेल ती उपलब्ध करेन असे वचन दिले.

## बापरे...! शहरात ६६७ अशास्त्रीय गतीरोधक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील प्रमुख रस्त्यांवर तसेच शहरात प्रवेश करणाऱ्या चारही दिशांच्या रस्त्यांवर उड्डाणपुलांचे काम सुरू आहे. त्यामुळे शहरातील वाहतुकीचा वेग मंदावला असून सकाळी आणि सायंकाळी वर्दळीवेळी वाहनांचा ताशी वेग अवघा दहा ते बारा किलोमीटर प्रतितास असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे वाहनांचा वेगच कमी असल्याने स्पीड ब्रेकर असल्यास कोंडीत आणखी भर पडत आहे. त्यामुळे जर गरज भासली तरच वाहतूक पोलीस आणि महापालिकेचा संयुक्त निर्णय घेऊन या पुढे रस्त्यांवर स्पीड ब्रेकर बसविण्यात येणार आहेत.

**» वाहतूक**

शहरातील सर्व रस्त्यांवरील गतिरोधक (स्पीड ब्रेकर) काढण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. काही महिन्यांपूर्वी शहरात सर्वेक्षण केले असता सुमारे ६६७ स्पीड ब्रेकर अशास्त्रीय असल्याचे आढळले होते. त्यामुळे शहराच्या वेगवेगळया भागात गल्ली-बोळांतील रस्त्यांसह मोठ्या रस्त्यांवरही वेगवेगळ्या आकारांचे आणि प्रकाराचे गतिरोधकआढळतात. मात्र, या स्पीडब्रेकर्सचा अंदाज न आल्याने, तसेच त्यामुळे अनेक चौकांत वाहतूक कोंडीत भर पडते आहे. त्यामुळे पोलिसांसह नागरिकांकडून हे स्पीडब्रेकर काढण्याची मागणी करण्यात येत होती.

त्यानंतर पालिका प्रशासनाने शहरात केलेल्या सर्वेक्षणात सुमारे ६६७ स्पीड ब्रेकर अशास्त्रीय तसेच चुकीच्या पध्दतीने उभारण्यात आल्याचे समोर आले. त्यानंतर महापालिकेने ते काढण्याची विशेष मोहीम हाती घेतली होती. मात्र, आता सर्वच स्पीड ब्रेकर काढण्यात येणार आहेत.

शहरात नेमके किती स्पीड ब्रेकर आहेत, याची कोणतीही माहिती महापालिकेकडे नाही. जुन्या हद्दीत चौदाशे किलोमीटरचे रस्ते असून नवीन ३४ गावांच्या समावेशानंतर आणखी पाचशे ते सहाशे किलोमीटर रस्त्यांची भर त्यात पडली आहे. त्यामुळे या सर्व रस्त्यांचे सर्वेक्षण महापालिकेकडून करण्यात येत आहे. त्यानुसार स्पीड ब्रेकरची संख्या निश्चित केली जात आहे. तसेच खड्डे, अंतर, रस्त्यांवरील अडथळे, चेंबर याप्रमाणे यांचे सर्वेक्षण केले जात आहे.

"शहरात काही विकासकामे सुरु असल्याने वाहनांचा वेग बहुतांशी प्रमाणात कमी झाला आहे, त्यामुळे यापुढे गतीरोधक बसविताना महापालिका प्रशासनाशी त्यासंदर्भात चर्चा करण्यात येणार आहे. यापूर्वी जे गतीरोधक चुकीच्या पध्दतीने बसविण्यात आले आहेत, त्याबाबत महापालिका प्रशासनाशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येणार आहे."

— **अमोल झेंडे,** पोलीस उपायुक्त, वाहतूक

## 'नरडेको'चे राष्ट्रीय अध्यक्ष निरजंन हिरानंदानी यांची अपेक्षा, माहीच्या अध्यक्षपदी स्मिता पाटील

# बांधकाम व्यवसायात महिलांची संख्या वाढण्याची गरज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशातील अन्य उद्योग, व्यवसायापेक्षा बांधकाम व्यवसायात वाढीचा वेग अधिक आहे. भारतात आज साधारणात वीस टक्के व्यवसायवृद्धीचा दर बांधकाम क्षेत्रात आहे, भविष्यात यात अधिक वाढ होईल. यामुळे पुरुष प्रधान समजल्या जाणाऱ्या बांधकाम व्यवसायात अधिकाधिक महिलांनी आले पाहिजे असे मत नॅशनल रिअल स्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल ( नरडेको) चे राष्ट्रीय अध्यक्ष आणि प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक निरंजन हिरानंदानी यांनी केले.

नॅशनल रिअल स्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल (नरडेको) माहीची स्थापना केली आहे. गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय, सर्व क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणारी राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च संस्था आहे. रिअल इस्टेट क्षेत्रातील महिला उद्योजकांना त्यांच्या महत्त्वकांक्षा पूर्ण करण्यासाठी 'माही' व्यासपीठाची स्थापना करण्यात आली आहे. हॉटेल शेरटॉन ग्रॅण्ड येथे 'नरडेको माही' आयोजित 'अध्यक्ष पदभार स्विकारण्याचा सोहळा' कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानवरून हिरानंदानी बोलत होते. यावेळी शेखर सिंह (आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका), नेरडेको चे जी. हरिबाबू, राजन बांदेलकर, अपेक्षिता तिपसे (महाव्यवस्थापक, कॉसमॉस बँक) डॉ. विद्या येरवडेकर (प्र. कुलगुरू, सिम्बायोसिस विद्यापीठ), देव गिल (प्रसिद्ध अभिनेते ), नवनिर्वाचित अध्यक्ष स्मिता पाटील, मावळत्या अध्यक्षा अनंता रघुवंशी, नरडेको पुणेचे अध्यक्ष भरत अग्रवाल आदि मान्यवर उपस्थित होते.



हिरानंदानी म्हणाले, आज मुंबई सारख्या शहरात पन्नास टक्के नागरिक झोपडपट्टी भागात राहतात, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी येत्या दहा वर्षांचा प्लॅन आम्ही सरकारला देणार आहोत, जेणेकरून मुंबई झोपडपट्टी मुक्त होईल आणि सर्वांना परवडणारी घरे मिळतील. माही च्या माध्यमातून बांधकाम व्यवसायत अधिकाधिक महिलांना पुढे आणण्यासाठी प्रयत्न करणार, त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण सुद्धा देण्यात येणार असल्याचेही हिरानंदानी यांनी नमूद केले.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, बांधकाम व्यवसायातील राष्ट्रीय पातळीवरील सनआस्थेने महिलांसाठी केवळ स्वतंत्र विंग सुरू करून थांबू नये, बांधकाम क्षेत्रातील महिला मंजुरांची संख्या लक्षणीय आहे, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी, त्यांना यथायोग्य मंजूरी देण्यासाठी प्रयत्न करावेत. आज देशाच्या राष्ट्रपती महिला आहेत, आपल्या महाराष्ट्रात मुख्य सचिव, पोलिस महासंचालक आणि मुख्य वनसंरक्षक अशा तीनही महत्वाच्या पदावर महिला आहेत यामुळे केवळ माही नाही तर नरडेको च्या अध्यक्षपदी महिला बांधकाम व्यावसायिक आल्या पाहिजे असे मत व्यक्त केले.

"रोटी कपडा और मकान या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत, मात्र आजही अनेकांचे हक्काचे घर झालेली नाही यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली परवडणाऱ्या दरात घर देण्यासाठी नरडेको वचनबद्ध आहे. "

— **निरजंन हिरानंदानी,** राष्ट्रीय अध्यक्ष नरेडको, प्रसिध्द बांधकाम व्यवसायिक

माहीच्या नवनिर्वाचित अध्यक्षा स्मिता पाटील म्हणाल्या, बांधकाम व्यवसायात महिलांचा सहभाग वाढविणे, मजूर महिलांचे प्रश्न सोडवणे या गोष्टी तर आम्ही करणार आहोतच, मात्र पर्यावरण पूरक घरांच्या निर्मितीसाठी आमचे प्रयत्न राहणार आहेत.

राजन बांदेलकर म्हणाले, बांधकाम क्षेत्र पुरुष प्रधान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बेटी बचाव, बेटी पढाव असा नारा दिलेला आहे. मेडिकल, फायनान्स सह अन्य क्षेत्रात महिलांची संख्या मोठी आहे, मात्र बांधकाम व्यवसायात ती तुलनेने फार कमी आहे.

याप्रसंगी नेरडेको चे जी. हरिबाबू, अपेक्षिता तिपसे, डॉ. विद्या येरवडेकर, देव गिल, अनंता रघुवंशी, भरत अग्रवाल यांनीही आपले मनोगत व्यक्त करत नरडेको माहीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

#रा

## At a Glance


### सावत्र वडिलांच्या त्रासाला कंटाळून तरुणाची आत्महत्या



**पुणे :** सावत्र वडिलांच्या त्रासाला कंटाळून एका तरुणाने आत्महत्या केल्याची घटना कोंढवा बुद्रूक परिसरात घडली. आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी वडिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शब्बीर ऊर्फ संदीप इब्राहिम शेख (वय ३३, रा. लक्ष्मीनगर, कोंढवा) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत संदीपच्या मावशीने १७ डिसेंबर रोजी कोंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून विजय सुमतराव कसोटे (रा. लक्ष्मीनगर, कोंढवा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संदीपच्या आईने आरोपी विजय कसोटे यांच्याशी दुसरा विवाह केला होता. संदीप अविवाहित आणि बेरोजगार होता. सावत्र वडिलांच्या त्रासाला कंटाळून त्याने तीन ऑक्टोबर रोजी राहत्या घरात पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली, असे फिर्यादीत म्हटले आहे.

### बीएमसीसीमध्ये आज विशेष कार्यक्रम



**पुणे :** बृहन् महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सच्या (बीएमसीसी) उद्योजकता विकास सेलने 'इनोव्हेट एक्स ३.०' हा नावीन्यपूर्ण आणि उद्योजकतेला चालना देण्याच्या उद्देशाने विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे. महाविद्यालयाच्या आवारात शुक्रवारी (ता. २०) हा कार्यक्रम पार पडणार आहे. 'इनोव्हेट एक्स ३.०' हे स्टार्टअप्ससाठी त्यांची उत्पादने प्रतिष्ठित गुंतवणूकदारांच्या पॅनेलसमोर सादर करण्यासाठी आणि थेट निधी प्राप्त करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ असणार आहे. यात सुमारे ६० स्टार्टअप्स त्यांचे नावीन्यपूर्ण उत्पादन प्रदर्शन करतील. ज्यामुळे विद्यार्थी व सहभागी यांना नेटवर्किंगसाठी गतिशील वातावरण निर्माण होईल. स्टार्टअप अर्थव्यवस्थेतील विविध दृष्टिकोन प्राप्त करून, उद्योजक आणि गुंतवणूकदारांशी संलग्न होण्यास उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने आकर्षित करण्यासाठी हा कार्यक्रम सक्षम ठरेल. सादरीकरणाच्या सत्रांव्यतिरिक्त, कार्यक्रमात उपस्थितांना उद्योग तज्ज्ञांचे व्यावहारिक मार्गदर्शन आणि सल्ला दिला जाणार आहे. 'इनोव्हेट एक्स ३.०' हे विद्यार्थी आणि उद्योजक दोघांनाही अनेक संधी उपलब्ध करेल. तसेच, नवीन उपक्रम आणि उद्योजकीय प्रतिभेच्या वाढीस मदत करेल, असा विश्वास प्राचार्य आर. पी. कुचेकर आणि सेलच्या समन्वयक डॉ. प्रीती राजगुरू यांनी व्यक्त केला.

### सारथी' तर्फे विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचे आयोजन

**पुणे :** छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांच्यामार्फत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) आणि प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी दिली. मराठा आणि कुणबी समाजातील विद्यार्थ्यांना या परीक्षेच्या अभ्यासाकरिता प्रोत्साहन मिळावे, यासाठी सारथी संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना ११ महिने कालावधीसाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे, तर त्यासाठी प्रशिक्षणार्थींना दरमहा दहा हजार रुपये विद्यावेतन देण्यात येणार आहे.

# कोट्यावधींच्या घोटाळयाची 'रिंग'...!

## रिंगरोडला नमनालाच घडाभर तेल, भूसंपादनात मोठा 'गोलमाल'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही वर्षांपासून नुसताच चर्चेत असलेल्या ' रिंगरोड' ला उदघाटनाच्या आधीच कोट्यावधी रुपयांच्या घोटाळयाने विळखा घातला असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे रिंगरोडमध्ये ज्या जिरायती जमीनी बाधीत होत आहेत, त्या बागायती दाखविण्याचा ' महाप्रताप' प्रांत, तलाठी आणि मंडल यांनी केला आहे. त्यामुळे शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे बहुचर्चित अशा या रिंगरोडची अवस्था ' नमनालाच घडाभर तेल' अशी झाली असून त्यामध्ये कोट्यावधी रुपयांच्या घोटाळयाची ' रिंग' झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहराच्या सर्वच बाजूला मोठ्या प्रमाणात नागरीकरण वाढले आहे, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीही होत आहे. त्यामुळे ही वाहतूक शहराच्या सभोवतालच्या बाजूने वळविण्यासाठी १९९७ साली राज्य शासनाने रिंगरोडला मंजूरी दिली आहे. विशेष म्हणजे आतापर्यंतच्या सर्वच निवडणुकांमध्ये सत्ताधारी आणि विरोधकांनीही याच रिंगरोडचे हत्यार करत मते मिळविली आहेत, हे वास्तव असतानाच या बहुचर्चित अशा रिंगरोडचे काम पूर्ण करण्यात सर्वांनाच सपशेल अपयश आले आहे. त्यामुळे या रिंगरोडचा ' नकाशा' अद्यापही कागदावरच राहीला आहे, त्याचा जोरदार फटका ग्रामीण भागातील नागरिकांना बसत असल्याचे चित्र आतापर्यंत स्पष्ट झाले आहे.

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

या रिंगरोडच्या संदर्भात राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने भूसंपादनाची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, त्यानुसार हवेली तालुक्यातील पूर्व आणि पश्चिम पट्ट्यात त्याबाबतची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. विशेष म्हणजे त्यासंदर्भात या जमीनीच्या सात बारावर शिक्केही टाकण्यात आले आहेत, त्यामुळे या जमीनीच्या संदर्भात कोणतेही व्यवहार करु नयेत असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.मात्र, असे असतानाही प्रांत, मंडल आणि तलाठी यांनी चिरीमिरी घेऊन अशा नोंदी केल्या आहेत असा आरोप माहिती सेवा समितीचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत वारघडे यांनी केला आहे.



### सर्वसामान्य नागरिक ' गॅस 'वर

- या रिंगरोडमध्ये अनेक घरेही बाधीत होत आहेत, त्यांच्या घराच्या उतार्यावरही शिक्के मारण्यात आले असून त्यांना या जागेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करता येत नाही. विशेष म्हणजे त्यांना या घरावर कोणत्याही बँकेचे कर्जही मिळत नाही, त्यामुळे त्यांना इच्छा असूनही घराची दुरुस्ती करता येत नाही. परिणामी हा सर्वसामान्य नागरिक हवालदिल झाला असून काय रिंगरोडच्या संदर्भात काय निर्णय घ्यायचा तो घ्या अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांनी केली आहे.

### असा झाला ' महाघोटाळा'..!

- जिरायती जमीनी दाखविल्या बागायती
- बागायती जमीनीचा मिळणार मोठा मोबदला
- जिल्हा प्रशासनाने ठेवले कानावर हात
- इतर हक्कात नोंद असतानाही केला उद्योग
- शासनाचा आदेश असतानाही मोठ्या प्रमाणात दस्त नोंदणी.
- सात बारावर शिक्के असतानाही व्यवहारात ' फेरफार'
- उपनिबंधकांच्या हवेली १ ते २८ मध्ये बेकायदेशीर दस्त नोंदणी
- तरीही भूसंपादनाचा मिळणार मोबदला

"या महत्वाकांक्षी प्रकल्पात कोणतीही बाधा येणार नाही अथवा त्यामध्ये घोटाळा होणार नाही याची दक्षता जिल्हा प्रशासनाच्या वतीने आधीपासूनच घेण्यात आली आहे, तरीही काही व्यवहार झाले असतील तर त्या नोंदी करण्याचे अधिकार प्रशासनाला आहेत. तसेच यामध्ये दोषी आढळलेल्या कोणालाही पाठीशी न घालता त्यांच्यावर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येणार आहे."

— डॉ. यशवंत माने, प्रांताधिकारी, हवेली



"शहरातील आणि चोहोबाजूची वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रिंगरोड हा महत्वाकांक्षी प्रकल्प ठरणार आहे, त्याचा फायदा हजारो नागरिक आणि वाहनचालकांना होणार आहे. या कामाला प्रत्यक्षात सुरुवात होणार आहे असे दिसत असतानाच त्यामध्ये कोट्यावधी रुपयांचा घोटाळा झाला आहे, त्यामुळे या दोषींवर कठोर कारवाई करावी."

— चंद्रकांत वारघडे, संस्थापक अध्यक्ष, माहिती सेवा समिती

## 'पीएमआरडीए'च्या कामकाजाचे विकेंद्रीकरण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीएमआरडीएमधील विकास परवानगी विभागात जे काही प्रस्ताव महानगर आयुक्त यांच्याकडे निर्णयासाठी सादर होत होते, त्यापैकी काही अधिकार त्यांनी अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्याकडे हस्तांतरित केले आहे.प्रशासकीय कामकाजात गतिमानता यावी, या उद्देशाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील (पीएमआरडीए) बांधकाम परवानगी विभागातील कामकाजाचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे.

यात अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्याकडे एक एकरापर्यंतचे भूखंड क्षेत्रावरील बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार असणार आहे. प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी बुधवारी हा निर्णय घेतला असून त्यांची तातडीने अंमलबजावणीचे आदेश दिले आहे.

कामकाजात गतिमानता येण्याच्या दृष्टिकोनातून संबंधित निर्णय घेण्यात आला असून प्रस्ताव सहाय्यक महानगर नियोजनकार, रचना सहाय्यक यांनी सह, उप महानगर नियोजनकार यांच्यामार्फत अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव दाखल करावे लागणार आहे. आयुक्त डॉ. म्हसे यांनी अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला यांच्याकडे या कामकाजाची जबाबदारी सोपवली आहे.

# नव्या वर्षाची चाहूल सिमेंट्च्या दरवाढीने

## बांधकाम व्यवसायावर परिणामाची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नविन वर्षात होण्या आगोदरच आता सिमेंट दरात झालेल्या वाढीमुळे चिंता वाढणार आहे. सिमेंट दारात वाढ होऊ लागल्याने बांधकाम क्षेत्रालाही आर्थिक झळ सोसावी लागणार आहे.सिमेंटचे दर वाढल्याने बांधकाम व्यवसायावर काहीसा परिणाम होणार असून सर्वसामान्यांच्या खिशाला मात्र कात्री लागणार आहे.

पाच महिने सिमेंटच्या किमती स्थिर राहिल्यानंतर डिसेंबरमध्ये सिमेंटच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली. सध्या मजुरांची उपलब्धता वाढल्यामुळे रिअल इस्टेट क्षेत्रात सिमेंटची मागणी वाढली आहे. तसेच मोठ्या पायाभूत प्रकल्पांमध्येही सिमेंटची मागणी कायम असल्याने या महिन्यात सिमेंटच्या किमतीत वाढ झाली.

दरवाढ

सिमेंट उद्योगातील बड्या कंपन्यांचे अधिग्रहण होऊन काही मोजक्याच कंपन्या शिल्लक राहिल्याने किमती वाढत राहतील, असा अंदाज बांधकाम क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत.

सध्या 50 किलो सिमेंटच्या पोत्याच्या किमतींमध्ये १० ते १५रुपयांची वाढ झाली असून, सध्याच्या किमती ३५०ते ४०० रुपयांदरम्यान आहेत. बारामती तालुक्यात ३०० ते ३९०रुपये प्रमाणे प्रतिपोते गुणवत्तेप्रमाणे आणि कंपनीनुसार सिमेंटचा दर होता. यामध्ये आता ३१५ते ३२० रुपये म्हणजेच प्रति ५० किलो पोत्यांच्या किमतीत १५ ते २० रुपये वाढ झाली आहे. स्टीलचे दर मात्र स्थिर असून स्टील ५१ ते ५२ रुपये किलो दराने विकले जात आहे.



सिमेंट वाढल्याने बांधकाम व्यवसायावर काहीसा परिणाम होणार असून सर्वसामान्यांच्या खिशाला मात्र कात्री लागणार आहे. बारामती शहर आणि तालुक्यात सध्या मोठ्या प्रमाणात सदनिकेची कामे सुरू आहेत. त्यांना अधिक दराने सिमेंट घ्यावे लागणार आहे. तेल, डाळी, भाजीपाला आदींमध्ये वाढ झाली असतानाच आता वाढलेल्या सिमेंट दरामुळे नव्याने बांधकाम करणाऱ्या सर्वसामान्य जनतेला महागाईची झळ बसणार आहे.

बांधकाम व्यवसाय हा अनेकांना रोजगार पुरवणारा व्यवसाय आहे. या व्यवसायावर अनेकांची गणिते अवलंबून असतात. त्यामुळे बांधकाम व्यवसायाने गती घेतली. तर त्याचा अर्थकारणावर परिणाम होत असतो. परंतु, वाढीव किमतीमुळे हा व्यवसाय थंडावला तर बाजारपेठेवर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे सरकारने दरामध्ये हस्तक्षेप करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# नाट्यगृहात आता सिनेमाचीही ' नांदी'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नाट्यगृहामध्ये चित्रपटाचा खेळ दाखविण्याचा प्रयोग शुक्रवारी (दि.२०) पुण्यात यशवंतराव नाट्यगृहात होत आहे. त्यामुळे ही एक वेगळी नांदी मराठी चित्रपटांसाठी ठरू शकते. मराठी चित्रपटांना मल्टीप्लेक्समध्ये योग्य जागा मिळत नसल्याने अनेक चांगले चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोचत नाहीत. त्यामुळे राज्यामध्ये एक वेगळा प्रयोग करण्यात येत आहे. त्याची सुरवात पुण्यातून होत आहे.

मराठीमध्ये गेल्या काही वर्षांपासून अतिशय चांगले चित्रपट तयार होत आहेत. त्यातून सामाजिक संदेश, भावनिक गुंतागुंत असे अनेक विषय आले. पण काही चित्रपट चांगले असूनही त्यांना मल्टीप्लेक्समध्ये जागाच मिळाली नाही. त्यामुळे ज्या ठिकाणी नाट्यगृह रिकामे असेल तिथे चित्रपटाचे खेळ दाखविण्यात यावेत, अशी मागणी समोर आली. ही मागणी राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील, उपाध्यक्ष गार्गी फुले यांनी सर्वप्रथम केली.

सांस्कृतिक

तसा प्रस्ताव त्यांनी तत्कालीन सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना दिला. त्यानंतर काही दिवसांपूर्वी पुण्यातील 'द बॉक्स' या रंगमंचावर प्रदीप वैद्य यांनी 'या गोष्टीला नावच नाही' हा चित्रपट दाखविला. त्याचे चार खेळ झाले. त्याला पुणेकरांनी चांगला प्रतिसाद दिला. तत्कालीन सांस्कृतिक मंत्र्यांनी महापालिकांनाही याविषयी चर्चा करून निर्णय घेण्याचा आदेश दिला होता.

त्यावर पुणे महापालिकेने गेल्या आठवड्यात बैठक घेतली. त्यात प्रायोगिक तत्वावर म्हणून २० डिसेंबर रोजी चित्रपटाचा पहिला शो लावण्यासाठी परवानगी दिली. त्यानूसार शुक्रवारी (दि.२०) पहिला चित्रपट यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात झळकणार आहे. सांस्कृतिक विश्वासाठी, मराठी चित्रपटासाठी ही एक वेगळी सुरवात ठरणार आहे. हा प्रयोग राज्यभर सुरू झाला, तर अनेक मराठी चित्रपटांना रंगमंचावर आपला खेळ सादर करता येईल. प्रेक्षकांनाही चांगले चित्रपट पाहता येतील.

# अभ्यासिका नव्हे तर भंगार मालाचे गोडाऊन

## महापालिकेचा प्रताप, विद्यार्थी हवालदिल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वडगाव बुद्रुक येथील प्रभाग क्र.३३ अ, सर्व्हे नं.५४ मध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका व ग्रंथालयासाठी तीन मजली इमारत महापालिकेने बांधली आहे. माजी नगरसेवक हरिदास चरवड यांच्या प्रयत्नातून तसेच राजाभाऊ लायगुडे, माजी नगरसेविका राजेश्री नवले, नीता दांगट यांच्या सहकार्यातून ही अभ्यासिका आणि ग्रंथालय उभे राहिले आहे.

परंतु सिंहगड रस्ता परिसरातील वडगाव बुद्रुक येथे विद्यार्थ्यांसाठी बांधण्यात आलेल्या अभ्यासिका व ग्रंथालयाच्या नवीन इमारतीत महापालिका प्रशासनाने वेस्ट ट्रीटमेंट पावडरच्या गोण्या ठेवल्या आहेत.



तसेच वरच्या मजल्यावर इतर साहित्य ठेवल्याने ही अभ्यासिका व ग्रंथालय भंगार मालाचे गोडावून बनले आहे. यामुळे विद्यार्थी आणि नागरिकांनी प्रशासनाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली आहे.

७ डिसेंबर २०२१ रोजी या इमारतीचे लोकार्पण तत्कालीन आमदार चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आणि तत्कालीन महापौर मुरलीधर मोहोळ, तत्कालीन आमदार भीमराव तापकीर यांच्या उपस्थितीत झाले होते. परंतु, सध्या ही इमारत महापालिका प्रशासनाने भंगार मालाचे साहित्य ठेवण्याचे गोडवूनच बनविली आहे. यामुळे परिसरातील विद्यार्थी आणि नागरिकांतून प्रशासनाविरोधात संताप व्यक्त होत आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार फोनवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

"वडगाव बुद्रुक परिसरात मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक संस्थांचे जाळे असून, या ठिकाणी हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांची गरज ओळखून येथे महापालिकेच्या वतीने तीन कोटी रुपये खर्च करून अभ्यासिका व ग्रंथालय बांधण्यात आले आहे. परंतु, महापालिका प्रशासनाने ही इमारत सध्या विविध साहित्य ठिकाण्याचे गोडावूनच बनवली आहे."

— हरिदास चरवड, माजी नगरसेवक

## सन्मान जिद्दीचा अन चिकाटीचाही...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा




**पुणे :** दहाव्या इयत्तेत शिकत असलेल्या ईशिका अनिल काकडे या विद्यार्थीनीने गेल्या दहा वर्षांच्या कालावधीत जिद्द आणि चिकाटीच्या बळावर उत्तुंग भरारी घेतली आहे, तिच्या या कष्टाची दखल घेऊन तिला सन्मानित करण्यात आले. तिच्या या यशात वडिल अनिल काकडे आणि आई वैशाली काकडे यांचा मोलाचा वाटा आहे.

# 'त्या' खचलेल्या रस्त्याची होणार चौकशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जंगली महाराज रस्त्यावर गेल्या ३० वर्षांत एकदाही खड्डा पडलेला नाही. पण, याच रस्त्यावर पाच वर्षांपूर्वी केलेले चेंबर खचून मोठा खड्डा पडला होता. एवढ्या कमी कालावधीत हा चेंबर खचला कसा, याची चौकशी पथ विभागाकडून केली जाणार आहे.

पुणे शहरात पावसाळ्यात अनेक रस्त्यांना खड्डे पडतात. पण, महापालिकेने सुमारे ३० वर्षांपूर्वी जंगली महाराज रस्त्याचे काम करताना त्याच्या कामाच्या गुणवत्तेकडे तत्कालीन अधिकाऱ्यांनी लक्ष दिल्याने या रस्त्याला खड्डे पडत नाहीत. पण, गेल्या काही वर्षांपासून जंगली महाराज रस्त्यावर पावसाळ्यात पाणी तुंबण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे महापालिकेने येथील पावसाळी गटारांची क्षमता वाढविणे, नवीन चेंबर बांधण्याचे काम हाती घेतले होते. त्यामुळे



यंदाच्या वर्षी पाणी कमी प्रमाणात तुंबले होते. छत्रपती संभाजी महाराज उद्यानाच्या समोरच्या बाजूस जंगली महाराज रस्त्यावर पावसाळी गटाराचे चेंबर खचले होते. मनसेचे कार्यकर्ते प्रशांत कनोजिया यांनी यासंदर्भात महापालिकेकडे तक्रार केली. अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता तेथे मोठे भगदाड पडण्याची शक्यता होती. पण, हा प्रकार वेळीच लक्षात आल्याने मोठा अपघात होण्यापासून वाचला आहे.

"जंगली महाराज रस्त्यावर हा चेंबर सुमारे ५ वर्षांपूर्वी केलेला आहे. पण, तो एवढ्या लवकर कसा काय खचला, मोठी पोकळी कशी निर्माण झाली, याची चौकशी केली जाईल. संबंधित ठेकेदार आणि अभियंत्यांवर जबाबदारी निश्चित केली जाईल."

— अनिरूध्द पावसकर, पथ विभागप्रमुख, पुणे मनपा

# केळयांसाठी शाळांना मिळणार अनुदान- शरद गोसावी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेत राज्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना अंडी, केळी देण्यात येतात. त्यासाठी शाळांना प्रलंबित राहिलेले, तसेच चालू वर्षातील अनुदान देण्यात येणार असून, शाळांनी त्यासाठीचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक शरद गोसावी यांनी दिले.

अनुदान

शाळा स्तरावर २०२३-२४ या कालावधीमध्ये नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२४ दरम्यान आठवड्यातील एक दिवस अंडे देण्याचा, २०२४-२५मध्ये त्रिस्तरीय आहार रचनेप्रमाणे दोन आठवड्यातू एकदा अंडा पुलाव देण्याचे निर्देश देण्यात आलेले होते. मात्र, राज्यातील अनेक जिल्हे आणि केंद्रीय स्वयंपाकगृह संस्थांना अंडी आणि केळी वाटपासाठीचे अनुदान देणे प्रलंबित आहे. त्यासाठी वेळावेळी संचालनायाकडे अनुदानाची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे सर्व जिल्ह्यांनी प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत २०२३-२४ आणि २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांत योजनेतील पात्र सर्व विद्यार्थ्यांना अंडी आणि केळी या पदार्थांचा लाभ दिला असल्याची खात्री संबंधित शाळांच्या मुख्याध्यापक यांच्याकडून प्रमाणित करून घ्यावी. नोव्हेंबर २०२३ ते एप्रिल २०२४ दरम्यान शाळा अथवा केंद्रीय स्वयंपाकगृहाला द्यायचे अनुदान आणि शाळांना या पूर्वी वितरित अग्रीम रक्कम, उर्वरित देयकाच्या फरकाची रक्कम अशी एकत्रित अनुदान मागणी संचालनालयाकडे नोंदवण्यात यावी.

# सर्व्हरची ' गती 'मंदावली अन रेशन वाटपाचीही

शासकीय

ई-पॉस मशिनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक अडचणी राज्यभरच असल्याने मशिन संथगतीने काम करत आहेत. त्यामुळे शहरासह जिल्ह्यात रेशनवरील धान्यवाटप आतापर्यंत १० टक्के धान्यवाटप झाल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधळकर यांनी सांगितले.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ई-पॉस मशिनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बदल करण्यात येत आहे. यामुळे शहरासह जिल्ह्यात रेशनवरील धान्यवाटप रखडल्याचे चित्र आहे. तर दुसरीकडे शहरात अजूनही दुकानांमध्ये गहू पोचला नसल्याने धान्यवाटप सुरू झाले नसल्याचा आरोप दुकानदारांच्या संघटनेने केला आहे.

शहरात सुमारे ४ हजार टन तांदूळ वितरण व्यवस्थेतून दिला जातो. आतापर्यंत केवळ २ हजार २०० टन तांदूळ पोहचला आहे. तर २ हजार ६०० टन



गव्हापैकी २ हजार २०० टन गहू दुकांनदारांपर्यंत पोहचला असल्याचे अन्नधान्य वितरण अधिकारी प्रशांत खताळ यांनी सांगितले. जिल्ह्यातील सुमारे १हजार ८०० दुकानांपैकी १ हजार दुकानांमध्ये धान्य पोचले आहे.

मात्र, अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांनी धान्यवाटप सुरू असल्याचा दावा केला आहे. सर्व्हर धीम्यागतीने काम करत असल्याने १० टक्केच धान्यवाटप झाले आहे.

राज्यात रेशनवरील धान्यवाटप ई-पॉस मशिनद्वारे केले जाते. या मशिनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बदल (सॉफ्टवेअर) काम सुरू आहे. त्यामुळे राज्यभरच ई पॉस मशिन संथगतीने काम करत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे

"पुणे शहरात धान्यवाटप सोडा, धान्यच पोहचलेले नाही. वितरण केव्हा करणार, असा प्रश्न ग्राहक करत आहेत. अन्नधान्य वितरण अधिकारी धान्य पोचल्याचे खोटे सांगत आहेत.मात्र, गहू पोचला नसल्याने अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून वाटपासाठी आवश्यक असलेली परवानगी मिळालेली नाही.."

—गणेश डांगी, अध्यक्ष, रेशन दुकानदार, संघटना

रेशन दुकानांमध्ये ग्राहकांच्या रांगा लागल्या आहेत. हीच स्थिती जिल्ह्यातही आहे. मात्र, शहरात वेगळी परिस्थिती आहे. शहरात काहीच दुकानांमध्ये तांदूळ पोचला आहे.

रेशन दुकानदार संघटनेचे अध्यक्ष गणेश डांगी यांनी केला आहे. त्यामुळे डिसेंबरमध्ये अद्याप धान्यवाटप सुरू झाले नसल्याचेही त्यांचे म्हणणे आहे. महिन्याचे केवळ १२ दिवस उरले असताना धान्य केव्हा मिळणार आणि त्याचे वितरण केव्हा करणार, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. धान्य दुकानांमध्ये पोचले असून, ई-पॉस मशिन सुरू आहे.

# सत्ताधारी पक्षाच्या आमदारांमुळे नाल्यांना सीमाभिंत बांधण्याच्या कामाला खो

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** सत्ताधारी पक्षाच्या आमदारांमुळे नाल्यांना सीमाभिंत बांधण्याच्या कामाला खो बसला आहे. त्यातच या कामासाठी राज्य सरकारकडून अद्याप दोनशे कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला नाही. यापार्श्वभुमीवर महापालिका प्रशासनाने आमदारांनी घेतलेल्या आक्षेपावर मलनि:सारण विभागाला तपासणी करून अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

शहरातून वाहणाऱ्या नाल्यांमुळे निर्माण होणाऱ्या पुरस्थिती नियंत्रणासाठी सिमाभिंत उभारणे आणि इतर कामे केली जाणार आहे. यासाठी राज्य सरकारकडून दोनशे कोटी रुपयांचा निधी मंजुर झाला आहे. अद्याप हा निधी महापालिकेच्या तिजोरीत जमा झालेला नाही. सदर कामे करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला होता, त्यानुसार खडकवासला मतदारसंघातील ५१ कामांसाठी ४९ कोटी, कॅन्टोन्मेंट मतदारसंघातील सात कामांसाठी ४७ कोटी, पर्वती विधानसभा मतदारसंघातील १४ कामांसाठी ५० कोटी, कोथरुड मतदारसंघातील ७ कामांसाठी २४ कोटी, शिवाजीनगर मतदारसंघातील ९ कामांसाठी ३० कोटी रुपये इतकी अंदाजपत्रकात तरतुद केली होती. सदर कामांसाठी राज्य सरकारकडून दोनशे कोटी रुपयांचा निधी मंजुर झाला असुन, तो निधी आल्यानंतर कामे सुरु करण्यास परवानगी दिली जाईल असे नमूद करीत प्रशासनाने कामांची निविदा प्रक्रीया राबविली होती. जुलै ते सप्टेंबर या कालावधीत ही निविदा प्रक्रीया पार पडली होती.

या निविदा प्रक्रीयेत मे. पाटील कन्स्ट्रक्शन इन्फ्रा, सुमती सोल्युशन प्रा. लि. , फोर्स कन्स्ट्रक्शन यांनी पुर्वगणपत्रकाच्या तुलनेत कमी दराने निविदा दाखल केल्याने त्यांना कामे दिली जाणार होती. दरम्यान, या निविदा प्रक्रीयेवर आमदार माधुरी मिसाळ, सुनील कांबळे, भीमराव तापकीर यांनी काही आक्षेप नोंदविले आहे. सदर कामांच्या निविदा या पुर्वगणनपत्रकाच्या तुलनेत पंधरा ते वीस टक्के कमी दराने दाखल झाल्या आ हेत. त्यामुळे सदर निविदा प्रक्रीया रद्द करावी आणि फेरनिविदा काढण्यात यावी अशी मागणी आमदारांनी केली आहे. या निविदा कमी दराने दाखल झाल्याने कामाची गुणवत्ता चांगली असेल की नाही ? सदर ठेकेदारांना दुसऱ्या ठिकाणी काम मिळाल्याने ही कामे संबंधित ठेकेदार करू शकत नाही असे दावे आमदारांनी केले आहेत. महापालिका प्रशासनाने आमदारांनी दिलेल्या पत्राची दखल घेत, यासंदर्भात मलनि:सारण विभागाला निविदा प्रक्रीयेवरील आक्षेपावर अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

दरम्यान, स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा अश्विनी कदम यांनी या कामाच्या निविदा प्रक्रीया पार पडल्या असुन, त्यामध्ये स्पर्धात्मक दर प्राप्त झाले आहे. तरीही काम सुरु करण्याचे आदेश देण्यात आले नाही, ही कामे पावसाळा सुरु होण्यापुर्वी पुर्ण होणे गरजेचे आहे. कामे लवकर सुरु केली नाही तर आंदोलन करू असा इशारा कदम यांनी दीला आहे.

**आमदारांनी घेतलेल्या आक्षेपावर मलनि:सारण विभागाकडून माहीती मागविली आहे. सदर कामासाठी राज्य सरकारकडून अद्याप निधी प्राप्त झाला नाही. हा निधी जोपर्यंत येत नाही तोपर्यंत काम सुरु करण्याचे आदेश देता येणार नाही. या कामाच्या फेरनिविदा काढायची का ? नाही हा देखील निर्णय अद्याप झालेला नाही."**

— डॉ. राजेंद्र भोसले
महापालिका आयुक्त

## घटस्फोटाच्या दाव्यामुळे वडिलांचे पहिल्यादांच दर्शन

**पुणे :** कौटुंबिक वादात पती-पत्नीचे मतभेद होऊन त्याची झळ मुलांना सोसावी लागत असल्याचे प्रकार नियमित घडतात. असाच एक प्रकार नुकताच पुढे आला आहे. एका जोडप्याने घटस्फोटासाठी दावा दाखल केला तेव्हा त्यांचा २१ वर्षीय मुलगादेखील न्यायालयात उपस्थित होता. यातील धक्कादायक बाब म्हणजे त्या मुलाने पहिल्यांदाच आपल्या वडिलांना पाहिले, तेही थेट त्यांच्या आई-वडिलांच्या घटस्फोटाच्या प्रक्रियेवेळी.

प्रमिला आणि पुष्कर असे या जोडप्याचे नाव. त्यांना प्रशांत (सर्व नावे बदललेली) नावाचा २१ वर्षीय मुलगा आहे. प्रमिला या गृहिणी आहेत, तर पुष्कर नोकरी करतात. हे दोघेही एकाच परिसरात राहायला आहेत. दोघांच्या वडिलांची एकमेकांशी ओळख होती. त्या ओळखीतून प्रमिला आणि पुष्कर यांचे मे २००२ मध्ये लग्न झाले. लग्नानंतर काही दिवसांतच त्यांच्यात वैचारिक मतभेदावरून वाद सुरू झाले. गर्भवती असलेल्या प्रमिला ७ मे २००३ रोजी माहेरी परत आल्या. दुसऱ्याच दिवशी म्हणजे ८ मे २००३ रोजी त्यांनी प्रशांतला जन्म दिला. पत्नीच्या बाळंतपणानंतर पुष्कर एकदाही त्यांना भेटायला गेले नाही. त्यामुळे प्रशांतला कधीच वडिलांची माया मिळाली नाही.

Selected



## अभिनव शिक्षण शास्त्र महाविद्यालयात जनजागृती रॅली

**पुणे :** एड्स सप्ताहाचे औचित्य साधून आंबेगाव येथील अभिनव शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील भावी शिक्षकांनी एड्स जनजागृती रॅलीसह विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी एड्स या विषयावर आधारित पोस्टर्स तयार करून आणि घोषणा देत आंबेगाव परिसरात विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढली.गावातील नागरिकांनी या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.आरती गांगुर्डे आणि आरोग्य आणि योगा प्रमुख प्रा. मिनल सोनुकले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अभिनवचे संस्थापक राजीव जगताप सचिव सुनीता जगताप संस्थेच्या समन्वयक डॉ. सविता शिंदे यांनी हा सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल विद्यार्थी शिक्षकांचे कौतुक केले. या रॅलीचे नियोजन प्राचार्या डॉ. कांचन चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राध्यापकांच्या सहकार्याने भावी शिक्षकांनी हा सामाजिक उपक्रम राबवला.

## श्रीमती लिला खराडकर यांचे निधन

**पुणे :** नामवंत शिक्षिका आणि सोलापूर जिल्हातील अक्कलकोट भागात मुलींच्या शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करणाऱ्या श्रीमती लिला खराडकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्या 92 वर्षाच्या होत्या.



40 वर्षापूर्वी अक्कलकोट परिसरात शिक्षण प्रसाराची जबाबदारी स्वीकारून शिक्षणाची गंगा घरोघरी पोहचविण्याचे कार्य त्यांनी केले. अतिशय गरीब परिस्थिती त्यांनी स्वत: एम. ए बीएडचे शिक्षण पूर्ण करून परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षित केले. या कामाची दखल घेत अक्कलकोट नगरपरिषदेचा आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले होते. त्यांच्या पश्चात तीन मुल, सुना आणि नातवंड असा परिवार आहे. जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट पुणेचे कॅम्पस संचालक डॉ. आर. डी. खराडकर यांच्या त्या आई होत्या.

## ‘काव्यमेय’ कवितासंग्रहाचे प्रकाशन उद्या

**पुणे :** पुण्यातील ‘कलार्पण’ संस्थेतर्फे सुगम संगीत, नाट्यसंगीत आणि अभंगवाणीचा कार्यक्रम आणि अमेरिकेतील गायक कवी अमेय बनसोड यांच्या ‘काव्यमेय’ कवितासंग्रहचे प्रकाशन शनिवार दिनांक २१ डिसेंबर रोजी, दुपारी १ वाजता भरत नाट्यमंदिर, सदाशिव पेठ, पुणे , येथे आयोजित करण्यात आला आहे.

गायक सुरमणी पं. सुधाकर तळणीकर आणि ‘काव्यमेय’ काव्यसंग्रहाचे कवी गायक अमेय बनसोड (अमेरिका) हे कार्यक्रम सादर करतील. मंदार तळणीकर (सहगायन व हार्मोनियम) आणि पल्लवी लोखंडे (सहगायन) हे असतील, याशिवाय वाद्यसंगत केदार तळणीकर (तबला) आणि गणेश पापळ (पखवाज) करणार आहेत. या कार्यक्रमात ‘काव्यमेय’ काव्यसंग्रहाचे प्रकाशन सुरमणी पं. सुधाकर तळणीकर यांच्या हस्ते संपन्न होईल. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामुल्य आहे.

# विद्यार्थ्यांचा आदिवासी बांधवांना कपड्यांचा ‘ आधार’

## जाधवर ग्रुपचा अभिनव उपक्रम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आदिवासी व ग्रामीण भागातील कुटुंबांचा कडाक्याच्या थंडीपासून बचाव व्हावा, या उद्देशाने नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या १० हजार कपडयांची मदत आदिवासी बांधवांना पाठविण्यात आली. सत्या फाउंडेशन, पुणे च्या सहकार्याने उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

जाधवर इन्स्टिटयूटच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाला सत्या फाऊंडेशनच्या गीतांजली जाधव, जाधवर इन्स्टिटयूटचे उपाध्यक्ष अॅड.शार्दुल जाधवर आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते कपडयांनी भरलेल्या टेम्पोला हिरवा झेंडा दाखविण्यात आला.

गीतांजली जाधव म्हणाल्या, कोणतेही पाठबळ, आर्थिक मदत नसताना झोमॅटो सारख्या कंपनीमुळे पुणे आणि लगतच्या परिसरात जवळपास ७० ते ७५ लाख रुपयांचे धान्य वाटप आम्ही करू शकलो. भोर, वेल्हे पानशेत, आंबी यासह अनेक ठिकाणच्या आदिवासी पाड्यांमध्ये धान्य वाटपासोबतच कपडे व इतर वस्तूंचे वाटपही फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. माझ्यासारख्या एका सामान्य व मध्यमवर्गीय कुटुंबातील महिलेला समाजातील सर्व घटकांमधून मान्यता आणि प्रोत्साहन मिळाल्याने आणखी समाजोपयोगी कार्य करण्यास प्रेरणा मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

» समाजसेवा

अॅड. शार्दुल जाधवर म्हणाले, समाजातील गरजू घटकांना विविध योजनांच्या माध्यमातून मदत देण्याकरिता शासनाच्या सर्व यंत्रणा कार्यान्वित असतात. मात्र, सामाजिक संस्थांसह सामान्य नागरिक म्हणून आपलीही जबाबदारी आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणिव निर्माण करण्याचा प्रयत्न यानिमित्ताने करण्यात आला. विद्यार्थ्यांनी चांगले कपडे गोळा करुन गरजूंपर्यंत पोहोचविण्याच्या उपक्रमात मोठा वाटा उचलला आहे.

# भव्य रांगोळीतून प्रतिभाताई पाटील यांना शुभेच्छा

## जिजामाता मुलींच्या शाळेचा अभिनव उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त २५ बाय १५ फूट भव्य रांगोळी काढून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. पहिल्या महिला राष्ट्रपती, भारताचा अभिमान, प्रतिभाताई पाटील तुमचे नाव, देशवासियांसाठी अजरामर गान...असे म्हणत विद्यार्थ्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

श्री शिवाजी मराठी सोसायटीच्या जिजामाता मुलींच्या शाळेमध्ये प्रतिभाताई पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी शिवाजी मराठा सोसायटीचे मानद सचिव अण्णा थोरात, जिल्हा परिषदेचे उप शिक्षण अधिकारी महिंद्रकर, विस्तार अधिकारी प्रणिती कुमावत, संस्थेचे सहसचिव विकास गोगावले, नियामक मंडळ अध्यक्ष कांचन सत्येंद्र, बि.एम. गायकवाड, रघुनंदन जाधव, कारभारी मंडळ अध्यक्ष सुरेश देसाई, पद्माकर पवार उपस्थित होते. जिजामाता शाळेच्या मुख्याध्यापिका समिक्षा सांडभोर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.



**पुणे :** श्री शिवाजी मराठी सोसायटीच्या जिजामाता मुलींच्या शाळेमध्ये भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त २५ बाय १५ फूट भव्य रांगोळी काढून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

अण्णा थोरात म्हणाले, भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या कर्तृत्वाचा आदर्श घेत विद्यार्थ्यांनी त्यांचा वाढदिवस साजरा केला. प्रतिभाताई पाटील यांच्या समाजसेवेची आणि नेतृत्वाची प्रेरणा घेत विद्यार्थ्यांनीही समाजोपयोगी कार्य करावे आणि समाजातील सर्व क्षेत्रांमध्ये पुढे यावे, असेही त्यांनी सांगितले.

# सेवाधर्म हाच मानव धर्म: रा.स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हिंदू धर्म हा शाश्वत धर्म असून, या चिरंतन व सनातन धर्मातील आचार्य सेवाधर्माचे पालन करतात, हा सेवा धर्म म्हणजेच मानव धर्म आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी काढले.

हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेच्या वतीने शिक्षण प्रसारक मंडळीच्या महाविद्यालयाच्या मैदानात हिंदू सेवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.येत्या २२ डिसेंबर पर्यंत हा महोत्सव सुरु आहे. हिंदू संस्कृती, संस्कार आणि सामाजिक सेवाकार्याची माहिती सादर करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील अनेक देवस्थाने, सामाजिक, धार्मिक संस्था, मठ मंदिरांच्या सेवाकार्याचा त्यात सहभाग आहे. त्याच्या उद्घाटन प्रसंगी सरसंघचालक डॉ. मोहन भागवत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर स्वामी गोविंददेवगिरी महाराज, ज्योतिष तज्ज्ञ लाभेश मुनीजी महाराज, इस्कॉनचे गौरांग प्रभू, शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष अॅड.एस. के जैन, उपाध्यक्ष श्रीकृष्ण चितळे, हिंदू सेवा महोत्सवाचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेचे राष्ट्रीय संयोजक गुणवंत कोठारी, हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेचे अध्यक्ष अशोक गुंदेचा आदी मान्यवर उपस्थित होते.

सरसंघचालक डॉ. भागवत पुढे म्हणाले की, सेवा करताना कायम प्रसिद्धी पासून दूर राहण्याचा आपला स्वभाव असतो. दिखाव्यासाठी सेवा न करता ती निरंतर करत राहणारे सेवेची कामना करतात.सेवेचा धर्म सांभाळताना अतिवादी न होता त्याचा मध्यम मार्ग आपण देशकाल परिस्थितीनुसार स्वीकारायला हवा. मानव धर्म हाच विश्वाचा धर्म असून तो सेवेतून प्रकट व्हावा. आपण विश्वशांतीसाठी घोषणा देतो मात्र अल्पसंख्यांकांची काय अवस्था इतरत्र आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे. तीन हजार वर्षापेक्षा अधिक परंपरा असलेले शस्त्र, वाचन, इतिहास,स्वभाव आपले आहे. ते पाहणे आणि अंगीकारणे, पुढील पिढ्यांना त्यातून प्रेरणा देणे यासाठी असे हिंदू सेवा महोत्सवासारखे उपक्रम आहेत.

पोट भरण्यासाठी आवश्यक ते केलेच पाहिजे पण गृहस्थाश्रमापलीकडे आपण जे जे मिळाले आहे ते सेवा रूपाने दुप्पट द्यायला हवे. जग आपले प्रतिपालक आहे.उपभोगाची वस्तू नाही हि भावना असेल तर परिवार समाज, गाव देश, राष्ट्र यांची मुक्त सेवा करण्याची प्रेरणा आणि अनुकरण आपण करावे. असा संदेशही त्यांनी दिला.

## जीवनात सर्वात आधी मनुष्याने धर्माचे पालन केले पाहिजे - पूज्य राजन जी महाराज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राधर्म,अर्थ,काम,मोक्ष हे चार पुरुषार्थ भगवंताचे गुणगान केल्यास मनुष्याला प्राप्त होतील. जीवनात मनुष्याने सगळ्यात आधी धर्माचे पालन केले पाहिजे. अर्थाची आवश्यकता आहे. परंतु अर्थ हे धर्माच्या छायेत असले पाहिजे. धर्माच्या छायेत अर्थ आल्यामुळे सात्विक कामना जन्म घेते आणि त्यामुळे परमार्थ होऊन मोक्षाची प्राप्ती होते,असे पूज्य राजन जी महाराज यांनी सांगितले.

श्री गौड ब्राह्मण समाज, श्री चारभुजानाथ मंदिर राम कथा समितीतर्फे श्रीराम कथा प्रेम यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. चित्रकूट धाम, वर्धमान लॉन्स समोर, बिबवेवाडी कोंढवा रस्ता येथे आयोजित कथा सोहळ्यात सहाव्या दिवशी प्रेममूर्ती पूज्य संत श्री प्रेमभूषणजी महाराज यांचे कृपापात्र पूज्य राजन जी महाराज यांनी निरूपण केले.

पूज्य राजन जी महाराज म्हणाले, भगवंताची प्रार्थना केल्यास अडचणी येणार नाहीत किंवा पूजा पाठ केल्यावर आजार-रोग होणार नाहीत, या भ्रमात राहू नका. संकटे ही येणारच आहेत. परंतु भगवंताची प्रार्थना केल्यास त्या संकटांचा



प्रभाव तुमच्या मनावर पडणार नाही. हा भगवंताच्या प्रार्थनेचा लाभ आहे. मनुष्य हा कोणत्याही वस्तू मुळे नाही, तर साधनेमुळे सुखी होतो. जीवनात केलेले सत्कर्मच आपल्याला सुखी करू शकतात, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कथा सोहळ्याचे आयोजन दि. २२ डिसेंबर पर्यंत दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ७ यावेळेत चित्रकूट धाम, वर्धमान लॉन्स समोर, बिबवेवाडी कोंढवा रस्ता येथे करण्यात आले आहे. श्रीराम कथा प्रेमयज्ञ सोहळ्यात श्री राम मंगल यात्रा, श्री भरत चरित्र, श्री शबरी प्रेम, सुंदरकाण्ड आणि श्री राम राज्याभिषेक याविषयी पूज्य राजनजी महाराज हे निरूपण करीत आहेत. सोहळ्याकरिता प्रवेश विनामूल्य असून रामभक्तांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

# वाचन संस्कृतीचा संदेश देत मध्य पुण्यात भव्य शोभायात्रा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जय जगन्नाथ शंकरशेट, जय विश्वकर्मा, जय दैवज्ञ... अशा घोषणा देत नारायण पेठेतील अष्टभुजा दुर्गादेवी मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. अखिल भारतीय दैवज्ञ समाजोन्नति परिषदेतर्फे आयोजित शोभायात्रेत समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत वाचनसंस्कृतीला चालना देण्याचा संदेश दिला.

परिषदेतर्फे २१ वे अधिवेशन आणि १० वे दैवज्ञ साहित्य संमेलनाचे आयोजन दि. २२ डिसेंबर पर्यंत स्वारगेट जवळील गणेश कला क्रीडा मंच येथे करण्यात आले आहे. त्याचा प्रारंभ शोभायात्रेने झाला. यावेळी समाज श्रेष्ठी डॉ. गजानन रत्नपारखी, डॉ. आनंद पेडणेकर, अजय कारेकर, कुमार अणवेकर, सुरेंद्र शंकरशेठ, उदय गडकरी, मनमोहन चोणकर, सूर्यकांत कल्याणकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.



**पुणे :** अखिल भारतीय दैवज्ञ समाजोन्नति परिषदेतर्फे नारायण पेठेतील अष्टभुजा दुर्गादेवी मंदिर पासून शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सहभागी समाज बांधव.

नारायण पेठेतील अष्टभुजा दुर्गादेवी मंदिर, केसरी वाडा, रमणबाग शाळा, बालगंधर्व रंगमंदिर मार्गे अष्टभुजा दुर्गादेवी मंदिर येथे शोभायात्रेचा समारोप झाला. यामध्ये वाचनसंस्कृती विषयी तसेच समाज प्रबोधनात्मक जनजागृती करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशातील कलाकार घोड्यावर बसून शोभायात्रेत सहभागी झाले होते. ठिकठिकाणी पालखी आणि ग्रंथांचे पूजन व औक्षण नागरिकांनी केले. तसेच पुष्पवृष्टी देखील करण्यात आली.

श्री अष्टभुजा दुर्गादेवी इस्टेट ट्रस्ट, पुणे या संस्थेच्या यजमानपदाखाली हे आयोजन करण्यात आले आहे. अधिवेशन व संमेलनाला प्रवेश खुला असून पुणेकरांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# एका कार्यकर्त्याला आणखी काय हवं असतं?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधण्याची संधी आज आम्हा मोहोळ कुटुंबियांना मिळाली. संसदेचे अधिवेशन सुरु असताना त्यांनी अत्यंत व्यस्त असताना सुध्दा दिलेला वेळ कुटुंबातील प्रत्येक सदस्याला सुखावून गेला. माझी आई, पत्नी, मुली, भाऊ आणि कुटुंबातील प्रत्येकाशी मा. मोदीजींनी संवाद साधला. प्रत्येकाशी मराठीतून केलेली विचारपूस आणि खुशाली विचारताना स्पष्ट दिसलेली आत्मीयता भावणारी होती.

भारतीय जनता पार्टीत काम करायला सुरुवात केल्यापासून तर आजपर्यंत कुटुंबियांनी मला अविरत साथ दिली. त्या कुटुंबियांना पार्टीच्या आणि देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाशी थेट आपुलकीचा संवाद होतो, हे फक्त भारतीय जनता पार्टीतच होतं.

**मोदीजींचे आम्हा मोहोळ कुटुंबियांच्या वतीनं मनापासून धन्यवाद ! आभार मानण्याऐवजी त्यांच्या ऋणात राहूनच धन्यवाद व्यक्त करतो. भाजपा ही केवळ पार्टीच नाही, तर परिवार आहे, याची आणखी अनुभूती देणारे क्षण आयुष्यभरासाठी स्मरणात राहतील !"**


— मुरलीधर मोहोळ,
केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री

## द मिरॅकल ऑफ ग्रॅटिट्यु या पुस्तकाचे प्रकाशन

# संपूर्ण विश्वाला शांततेची आणि ज्ञानाची अत्यंत गरज - राजेश पांडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रख्यात आध्यात्मिक गुरु व लेखक सरश्री यांनी लिहलेल्या द मिरॅकल ऑफ ग्रॅटिट्यड (कृतज्ञतेची किमया) या मराठी पुस्तकाचे प्रकाशन एफ. सी. कॉलेज येथील पुणे पुस्तक महोत्सवात पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजक राजेश पांडे, महर्षी विनोद रिसर्च फाउंडेशनचे डॉ. संप्रसाद विनोद, विश्वशक्ती इंटरनॅशनल फाऊंडेशनचे प्रमुख डॉ. दत्ता कोहिनकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मा. कुलगुरू नितीन कळमकर आणि



तेजज्ञान फाऊंडेशनचे विश्वस्थ डॉ. मकरंद परांजपे यांच्या हस्ते करण्यात आले.

राजेश पांडे म्हणाले की द मिरॅकल ऑफ ग्रॅटिट्यु या पुस्तकाचे प्रकाशन माझ्या हस्ते होताना मला आनंद होतोय. त्यापेक्षा मला जास्त आनंद याचा होतोय की हे पुस्तक पुणे पुस्तक महोत्सवात प्रकाशित झाले. येथील लोकांचे प्रसन्न चेहरे पाहून या सेवाभावी संस्थे सोबत मी लवकरच जोडला जाणार आहे. अशी भावना राजेश देशपांडे यांनी व्यक्त केली.

कोहिनकर म्हणाले की विश्वात आयुष्य जगत असताना अध्यात्मा शिवाय जगणं खूप अवघड असतं. लाखो लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवण्याची क्षमता प्रख्यात वक्ते व प्रगल्भ लेखक सरश्री यांच्या विचारात आहे. त्यांनी उभा केलेला जनसमुदाय जगभरात कार्यरत आहे. आपल्यामध्ये नेहमी कृतज्ञतेची भावना रुजणे महत्वाचे आहे. कृतज्ञतेची

**संपूर्ण विश्वाला शांततेची आणि ज्ञानाची अत्यंत गरज आहे. सरश्री आणि हॅपी थॉट्स यांच्या विषयी मला माहीत आहे. त्यांचे कार्य आणि समाजातील योगदान वाखाणण्याजोगे आहे. राजेश पांडे, आयोजक पुणे पुस्तक महोत्सव"**

— राजेश पांडे
आयोजक पुणे पुस्तक महोत्सव

किमया हे पुस्तक समाजात सकारात्मक बदल घडवेल.

डॉ. संप्रसाद म्हणाले की सरश्री यांनी तेजज्ञान फाऊंडेशनची स्थापना केली असून त्यांनी समजात सकारात्मक विचारांचा प्रसार आणि प्रचार मोठ्या प्रमाणात केला आहे. त्यांनी ज्ञानाची एक अनोखी प्रणाली तयार केली आहे. तेजज्ञान फाऊंडेशनची स्थापना ही, समाजात"आनंदी विचार"पसरवण्यासाठी पुस्तके, प्रवचन आणि अध्यात्मिक ज्ञान हे स्टेप बाय स्टेप दिले जाते.

तेजज्ञान फाऊंडेशनने या पुस्तकाची निर्मिती केली असून वॉव प्रकाशन तर्फे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे.

#रा

## At a Glance

### टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**चाकण :** विद्यालाल सोमारी पाटील (वय ३८, रा. नाणेकरवाडी, चाकण) असे मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याप्रकरणी संतोष सोमारी पाटील (वय ४४) यांनी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार परमेश्वर बबन जाधव (रा. कडाचीवाडी, चाकण) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा भाऊ विद्यालाल पाटील हे त्यांच्या दुचाकी (एमएच १४/डीएस ८३५८) वरून कडाचीवाडी येथून चाकणकडे जात होते. मेदनकरवाडी कमानी समोर आल्यानंतर आरोपी परमेश्वर जाधव याने त्याच्या ताब्यातील टँकरने (एमएच १४/डीएम ८२८३) पाटील यांच्या दुचाकीला धडक दिली.

### महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह

**तळेगाव स्टेशन :** येथील इंद्रायणी विद्या मंदिर संस्था संचालित कृष्णराव भेगडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल एज्युकेशन अँड रिसर्च (बी.फार्मसी ) महाविद्यालयामध्ये रिलायन्स फाऊंडेशन आणि मॅजिक बस यांच्या संयुक्त विद्यमाने उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह उत्साहात पार पडला, अशी माहिती प्राचार्य डॉ. संजय आरोटे यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. श्याम आवटे यांनी केले. रिलायन्स फाऊंडेशनच्या प्रतिनिधी कविता प्रसाद यांनी फाऊंडेशनतर्फे 39 विद्यार्थ्यांचे आठ दिवस सॉफ्ट स्किल्स ट्रेनिंग घेऊन त्याच मुलांकरिता हा कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित केला होता.

# चिखली-कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामे, पत्राशेडवर ‘बुलडोझर’

## आ. लांडगे यांची लक्षवेधी, महानगरपालिका प्रशासन ‘ॲक्शन मोड’वर!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिखली :** पिंपरी-चिंचवड शहरातील कुदळवाडी- चिखली या भागातील अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेड, भंगार दुकानांवर महानगरपालिका प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे. भंगार दुकानांमध्ये वारंवार लागणाऱ्या आगींच्या घटना आणि बांगलादेशी, रोहिंग्यांच्या बेकायदा वास्तव्याबाबत भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी हिवाळी अधिवेशनामध्ये राज्य सरकारचे लक्ष वेधले आणि दोनच दिवसांत ‘बुलडोझर’ कारवाई सुरू झाली आहे.

» कारवाई

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.०२ मधील मोरे-पाटील चौक ते कुदळवाडी पोलीस चौकी येथे १८ मीटर रुंद डी.पी. रस्ता (३०० मीटर लांबी ) व कुदळवाडी पोलीस चौकी ते विसावा चौक या ३० मीटर रुंद डी.पी.रस्ता ५५० मीटर लाबींच्या डी.पी.रस्ता रस्त्याच्या दुतर्फा सुमारे ९ हजार चौ.मी. क्षेत्रातील ३० आर.सी.सी.बांधकामे, तसेच सुमारे ४ हजार चौ.मी. क्षेत्रामधील ४५ वीट बांधकामांसह पत्राशेड इत्यादीवर अतिक्रमण जमीनदोस्त करण्यात आले आहे.

तसेच, गेल्या दोन दिवसांमध्ये चिखली- कुदळवाडी परिसरातील एकूण १३ हजार चौ.मी. आर.सी. सी.बांधकामे व पत्राशेडवर कारवाई करण्यात आली. यामधील बहुतांशी भंगार व्यावसायिकांचे अनधिकृत दुकाने होती. मंजूर विकास आराखड्यातील रस्ते विकसित करणेकामी कारवाई या पुढेही सुरु राहील, असा इशाराही महानगरपालिका प्रशासनाने दिला आहे.

वारंवार लागणाऱ्या आगीच्या घटनांमुळे सोसायटीधारक, स्थानिक नागरिक यांच्या सुरक्षेच्या प्रश्न निर्माण झाला होता. यासह बेकायदेशीरपणे भंगार जाळून रसायनमिश्रीत पाणी इंद्रायणी नदी पात्रात सोडल्यामुळे नदी प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यासह आगीच्या घटना, बेकायदेशीर भंगार साठवणूक यामुळे या भागात असुरक्षितता, अस्वच्छता आणि पर्यावरणाची हानी होत आहे. विशेष म्हणजे, बांगलादेशमधून बनावट कागदपत्रांच्या आधारे पिंपरी-चिंचवडमध्ये वास्तव्य करणारे बांगलादेशी आणि रोहिंग्या बहुतेक करुन भंगार, रद्दी दुकानांमध्ये काम करीत आहेत. ही बाब पोलीस प्रशासनाने केलेल्या कारवाईमध्ये समोर आली आहे. त्यामुळे या कारवाईचे स्थानिक नागरिकांमधून स्वागत होत आहे.





> पिंपरी-चिंचवडसह देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अवैधपणे वास्तव्य करणारे बांगलादेशी आणि रोहिंगे यांना प्रतिबंध करणे काळाची गरज आहे. विशिष्ठ समाजाचे लांगुलचालन करण्यासाठी यापूर्वीच्या काळात प्रशासन आणि राजकीय दबाव निर्माण केला जात होता. मात्र, महायुतीच्या सत्ताकाळात कोणत्याही परिस्थितीमध्ये देशविघात कृत्यांचे समर्थन केले जाणार नाही. अनधिकृत भंगार दुकाने आणि बेकायदेशीर व्यावसायिकांवर कारवाईची मोहीम सुरू राहणार आहे. स्थानिक नागरिक आणि पिंपरी-चिंचवडकरांनी सहकार्य करावे. तसेच, पोलीस प्रशासनाने कोणताही अनूचित प्रकार घडणार नाही. याची पूर्णत: काळजी घ्यावी.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भोसरी, विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# गीता जयंती एकादशी दिनी इंद्रायणीची आरती



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** माऊली मंदिरात परंपरेने हरीनाम गजरात गीता जयंती, एकादशी विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरी झाली. गीताजयंती आणि नित्यनैमित्तिक एकादशी दिनी होणारी इंद्रायणी आरती हरिनाम जय घोषात झाली. इंद्रायणी नदी घाटावर आळंदी ग्रामस्थ, इंद्रायणी आरती ग्रुप, राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान, आळंदी जनहित फाउंडेशन, महिला बचत गट सदस्य, पदाधिकारी, महिला मंडळ तसेच आळंदी ग्रामस्थ यांचे वतीने इंद्रायणी नदी घाटावर स्वच्छता करीत इंद्रायणीची आरती हरिनाम गजरात झाली.

मोक्षदा एकादशी दिनी इंद्रायणीची आरती करून स्वच्छता करीत सामाजिक बांधिलकी जोपासण्यात आली. यावेळी महिला भाविक, वारकरी यांची गर्दी झाली होती. आळंदी मंदिरात भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली होती.श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात परंपरेने एकादशी आणि गीता जयंती धार्मिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी देवस्थानचे विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, व्यवस्थापक माऊली वीर, तुकाराम माने आदी उपस्थित होते.

वारकरी शिक्षण संस्थेचे वतीने प्रवचन सेवा तसेच संतोष मोझे सरकार यांचे तर्फे परंपरेने हरिजागर सेवा रुजू होते. श्रींचे दर्शनास भाविकांनी हरिनाम गजरात गर्दी केली. हरिनाम गजरात ग्राम प्रदक्षिणा, मंदिर प्रदक्षिणा करीत एकादशी साजरी केली.

इंद्रायणी आरतीस राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अनिता झुजम यांचे मार्गदर्शनात उपक्रम राबविण्यात आला. यावेळी राणी वाघ, पुष्पा लेंडघरे, विद्या आढाव, तेजल झुजम, शोभा कुलकर्णी, उषा ननवरे, माझी नगरसेविका उषा नरके, शाळां होनावळे, ताई देवरे, साक्षी भांबरे माऊलींचे मानकरी गणपतराव कुऱ्हाडे, आळंदी जनहित फाउंडेशनचे कार्याध्यक्ष संयोजक अर्जुन मेदनकर आदींसह मोठ्या संख्येने महिला, ग्रामस्थ उपस्थित होते.

- इंद्रायणी नदीचे पावित्र्य जोपासण्याचे आवाहन करीत इंद्रायणी नदी घाटावर आरती उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, इंद्रायणी नदीचे प्रदूषण दूर करण्यासाठी उपाय योजनेस पाऊले उचलण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. आळंदी ग्रामस्थ, इंद्रायणी आरती ग्रुपचे वतीने राणी वाघ, माजी नगरसेविका उषा नरके अनिता झुजम, अर्जुन मेदनकर यांनी संयोजन केले. विविध मान्यवरांचे हस्ते इंद्रायणीची आरती झाली. यावेळी पसायदानाने उपक्रमाची सांगता झाली.

# डी.पी.रस्त्याच्या कामाची नाना काटे यांच्याकडून पहाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळे सौदागर :** येथील संरक्षण खात्याच्या ताब्यात असलेल्या क्रिस्टल हॉटेल, ट्राइज सोसायटी ते नॅचरल आइस्क्रीम कॉर्नर जोडला जाणाऱ्या रस्त्याच्या संरक्षण भिंतीच्या कामाला सुरुवात करण्यात आली. मा.विरोधी पक्षनेता विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी महानगरपालिके कडे या कामासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला.



या कामाची आज महापालिकेचे संबंधित अधिकारी स्थापत्य विभागाचे डेप्युटी सुनील शिंदे साहेब, क्लीम्सी कन्स्ट्रक्शन चे हबीब ,सल्लागार प्रतिनिधी यांच्यासोबत पहाणी केली. हा रस्ता १८ मीटर रुंद आणि ९२० मीटर लांबीच्या 'डीपी' रस्ता आहे. या रस्त्याच्या निर्मितीसाठी १४ कोटी ८२ लाख ८९ हजार रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली आहे. संरक्षण खात्याच्या ताब्यात असलेल्या जागेचे महापालिकेकडे हस्तांतरण झाले असून दोन्ही बाजूंच्या समन्वयामधून हे काम शक्य झाले आहे.

या रस्त्यामुळे नाशिक फाटा ते जगताप डेअरी या बीआरटी मार्गालगतच्या स्वराज गार्डन, क्रिस्टल हॉटेल, योगा पार्क, आणि ट्राइज सोसायटीकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होणार आहे. हा रस्ता नाशिक फाट्याकडून कोकणे चौकाकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करणारा आहे. तसेच काटे वस्ती, गोविंद गार्डन आणि ट्राइज सोसायटीकडे वाहने सहज जाऊ शकतील त्यामुळे वाहतूक सुरळीत होईल आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.

या रस्त्यामुळे परिसरातील सुमारे पंचवीस हजार नागरिकांना लाभ होणार आहे. नाशिक फाटा, कोकणे चौक आणि गोविंद गार्डन परिसरातील वाहतूक कोंडी कमी होणार आहे.

हिंजवडी आणि वाकडकडे जाणाऱ्या वाहनांसाठी एक सोयीचा मार्ग ठरणार. प्रवासाच्या वेळेत बचत होणार आहे. रस्त्याचे काँक्रिटीकरण १० मीटर रुंदीचे राहणार. वाहन चालकांना सुकर प्रवास अनुभवता येईल

तसेच पादचारी आणि सायकलस्वारांच्या सुरक्षेचा विचार करून हा रस्ता बनविला गेला आहे, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना २ मीटर रुंद पदपथ आणि एका बाजूस १.५ मीटर रुंद सायकल ट्रॅक तयार करण्यात येणार आहे.त्यामुळे येथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# पिकअपची धडक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** दोन पिकअपची धडक होऊन झालेल्या अपघातात एक जण गंभीर जखमी झाला. खेड तालुक्यातील सोळू या गावात घडली. मारूफ मकबूल खान (वय 25, रा. चाकण तळेगाव रोड, चाकण, ता. खेड, जि. पुणे) असे जखमी झालेल्या पिकअप चालकाचे नाव आहे. पोलिसांनी दुसरा पिकअप एमएच १२ एसएफ 9000 वरील अज्ञात चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी खान हे आपल्या पिकअप घेऊन आळंदी मार्गे लोणीकंद, रांजणगाव येथे चालले होते. त्यावेळी मरकळ कडून आळंदीकडे जाणारा पिकअप हा भरधाव वेगात आला. त्याने फिर्यादी यांच्या पिकअपला जोरदार धडक दिली. यामध्ये मारूफ खान हे गंभीर जखमी झाले. आळंदी पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

# तळेगावात अखंड नाम जप यज्ञ सप्ताह उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव स्टेशन :** येथील श्री स्वामी समर्थ मंदिरासमोर अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी प्रणित) श्री दत्त जयंती निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन दिनांक ९ ते १६ डिसेंबर या दरम्यान करण्यात आले होते.

तळेगाव दाभाडे नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष व सिद्धिविनायक प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश मोहनराव काकडे यांच्या सहकार्याने हा सोहळा आयोजित केला होता. गणेश काकडे तसेच त्यांच्या पत्नी सारिका काकडे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांची आरती झाली.



आरतीनंतर काकडे यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले.आनंदी आणि यशस्वी जीवन जगण्यासाठी स्वामी सेवेचे महत्त्व काकडे यांनी सांगितले. अखेरीस सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते. परिसरातील हजारो भाविक उत्सवात सहभागी झाले होते. यात महिलांची संख्या लक्षणीय होती.

# “सौर यंत्रणे” नवनाथ ढवळे यांच्या शुभहस्ते उदघाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुनावळे :** ट्विन आर्क्स सी-विंग सोसायटी, पुनावळे ने भारतातील आघाडीच्या ऊर्जा पुरवठादारांपैकी एक असलेल्या TATA पॉवरकडून अत्याधुनिक ३४ kW रुफटॉप सोलर सिस्टीम बसवून टिकाऊपणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सोसायटी सदस्य आणि मान्यवरांच्या उपस्थितीत एका भव्य समारंभात या प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले.सदर प्रणालीचे उद्घाटन माननीय नवनाथ ढवळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले..

सोलर इन्स्टॉलेशनमुळे दरमहा सुमारे ४,००० युनिट वीज निर्माण होण्याचा अंदाज आहे, ज्यामुळे सोसायटीच्या ऊर्जेच्या ६०-७०% गरजांची पूर्तता होईल. सुमारे ६,००० युनिट्सचा सध्याचा मासिक वापर आणि ₹१.१ लाख ते ₹१.२ लाखांपर्यंतच्या वीज बिलांसह, हा उपक्रम समाजाची भरीव रक्कम वाचवण्यासाठी, हरित भविष्यासाठी योगदान देताना त्याचा आर्थिक भार कमी करण्यासाठी तयार आहे.

श्री नवनाथ ढवळेजी प्रमुख पाहुणे म्हणून, सोसायटीचे समर्पित समिती सदस्य, सक्रिय सदस्य आणि रहिवासी यांच्या उपस्थितीने उद्घाटन झाले.



**डॉ. विकास खरात उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२) व ३ नुसार जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्युची नोंद कारणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने **अर्जदार संभाजी नारायण बांदल रा.गवडी ता. भोर जि. पुणे** यांनी या कार्यालयाकडे जन्म- मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३(३) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार **आर्जदार यांची बहिण रेखा नारायण बांदल चा जन्म मौजे गवडी ता. भोर जि. पुणे येथे दि.०१/०६/१९६६ रोजी** झालेचे नमूद करुन सदर जन्माची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म मृत्यु नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलांमध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल.

आज दि. १७ /१०/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.

क्र. फौज/जन्म/एस. आर/९३७/२०२४
**दिनांक :-** १७/१०/२०२४
**ठिकाण :-** भोर

शिक्का

**सही**
**(डॉ. विकास खरात)**
उपविभागीय अधिकारी तथा
दंडाधिकारी भोर उपविभाग भोर

**जाहीर नोटीस**

मी **मनिषा मोहम्मद अन्सारी**, राहणार शिक्रापुर, ता. शिरूर, जि. पुणे, मोबाईल नं. **७४४७५०२३३४** यांनी दिनांक ०६/१२/२०१८ रोजी दु.निबंधक तळेगाव ढमढेरे नं. २ यांचे कार्यालयात रितसर नोंदणी करून घेतलेली आहे. सदर रजिस्टर साठेखत दस्त नं. ८२४७/२०१८ आणि रजिस्टर कुलमुखत्यारपत्र दस्त नं. ८२४६/२०१८ दस्ताची मुळ प्रत आमचे अशिलांकडून गहाळ झालेली आहे.

सदरचे दोन्ही मुळ दस्त हरविलेबाबत **मनिषा मोहम्मद अन्सारी**, यांनी शिक्रापुर पोलीस स्टेशनमध्ये ऑफलाईन तक्रार दिनांक १३/८/२०२४ रोजी रिपोर्ट नं. ७६९/२०२४ अन्वये रितसर दाखल केलेली आहे.

सदर मिळकत त्यांनी कोणत्याही जडजोखमीत गुंतवलेली नाहीत अथवा सदर मिळकत गहाण, दान, बक्षीस, लिन, लीज, देणे बाकी कोर्ट मनाई अशा स्वरूपाच्या कोणत्याही बोजाखाली नाही आणि सदर सबंधीत मालकांना आपल्या मिळकतीची विक्री करणेचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबध अगर अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ **(सात)** दिवसांत आमची कागदपत्रांसह खात्री करून द्यावी अन्यथा सदर मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध अगर अधिकार नाहीत असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार करतील व तदनंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

सदर मुळ दस्ताऐवज कोणाला मिळाले असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ **(सात)** दिवसांच्या आत माझ्या वरील फोन नंबर किंवा माझ्या पत्यावर संपर्क साधावा. पत्ता पुनर्वसन गावठाण शिक्रापुर पुणे ४१२२०२. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

**दिनांक :** २०/१२/२०२४,
**ठिकाण :** पुणे

**श्री.विपीन विजय पवार, ॲडव्होकेट**
पत्ता :- सर्वे नं. 34/5, चंद्राची कॉम्प्लेक्स, बी विंग,
ऑफीस नंबर - 5, फळेनगर, आंबेगाव बुद्रुक, पुणे - 411046.

# भुयारी मार्गामध्ये वारंवार मैलामिश्रित सांडपाणी

**विषय**

**मुंबई-बंगळुरु महामार्गावरील भूमकर चौक भुयारी मार्गामध्ये वारंवार मैलामिश्रित सांडपाणी रस्त्यावर साचते. त्यामुळे येणाऱ्या दुर्गंधीने वाहनचालक हैराण झाले आहेत. नरक यातनेचा अनुभव देणाऱ्या या असह्य दुर्गंधीमधून वाट काढताना पादचाऱ्यांची अक्षरशः घुसमट होत आहे. तर घाणीमधून मार्ग काढताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या समस्येवर कायम स्वरुपी उपाय योजना करण्याची मागणी होत आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाकड :** पिंपरी-चिंचवड शहरातून हिंजवडी आयटी पार्ककडे जाण्यासाठी अतिशय महत्वाचा असा भूमकर चौक आहे. याच परिसरात अनेक लहान-मोठी महाविद्यालये, शाळा आहेत. चौकाच्या पुढे एसटी स्थानक असल्याने येथून प्रवाशांची सतत ये-जा असते. याशिवाय भुयारी मार्गाच्यावर मुंबई- बंगळुरू महामार्ग असल्याने तेथून ये-जा करणाऱ्या प्रवासी वाहनांसह स्थानिक वाहनांची संख्याही मोठी असते. त्यामुळे, दिवस रात्र या चौकामधून शेकडो लोकांची वर्दळ असते. मात्र, हा चौक अनेक वर्षांपासून दुर्गंधी आणि अस्वच्छतेच्या विळख्यात सापडला आहे. त्याचा नाहक मन:स्ताप सर्वांना सहन करावा लागत आहे. इंदिरा महाविद्यालय व शनी मंदिराकडे जाणाऱ्या सेवा रस्त्यावरील मैला वाहिनीचे चेंबर गेल्या दोन वर्षांपासून वारंवार भरुन वाहत आहे. या चेंबरमधून मैला पाणी संपूर्ण भुयारी मार्गामध्ये व सेवा रस्त्यावर पसरत आहे.

**नागरिकांना होतोय त्रास**

- उन्हाळा असो वा पावसाळा भूमकर चौकात कायमच मैला पाण्याचा लोंढा
- अनेकदा मैला पाणी तेथे आठवडाभर साचलेले असते
- वाहतूकीची वारंवार कोंडीही होते. तेव्हा याच पाण्यात दुचाकीस्वारांना वाहने घेऊन उभे राहावे लागते.
- दुचाकी-चारचाकी जाताना इतरांच्या अंगावर घाण पाणी उडते
- चेंबर व पाण्यामुळे सर्व चौकात उग्र दुर्गंधी पसरली आहे
- अनेकदा वाहने घसरून किरकोळ अपघाताच्या घटना
- पादचाऱ्यांना नाकाला रुमाल लावून ये-जा करावी लागते

**पावसाळी वाहिनीचेही चेंबर ‘ओव्हर फ्लो’**

- काळाखडक, भूमकर चौक, शनि मंदिर येथून आलेली आणि विरुद्ध दिशेने आलेली जलनिस्सारण वाहिनी भुयारी मार्गाजवळ असलेल्या जंक्शनमध्ये एकत्र येते. त्यामध्ये, प्लॅस्टिक कचरा, राडारोडा अडकल्याने चेंबर वारंवार तुडूंब भरुन वाहत असतो. पावसाळ्यातही तीनही बाजूने उतार असल्यामुळे पावसाचे गुडघाभर पाणी भुयारी मार्गामध्ये साचते.
- त्यामुळे महापालिका प्रशासनाने गांभीर्याने लक्ष घालून ही समस्या कायमस्वरुपी मार्गी लावावी, अशी मागणी स्थानिकांसह वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

# महायुतीची नवी टीम

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर झाल्यानंतर सरकार स्थापनेची दीर्घकाळ रेंगाळलेली प्रक्रिया आता बऱ्याच अंशी पूर्ण झाली आहे. पहिल्यांदा मुख्यमंत्री पदावरून रंगलेले नाटक बरेच दिवस चालले. तो विषय रडतखडत हाता वेगळा केल्यानंतर मंत्रिपदांसाठी लॉबिंग सुरू झाले. नुकताच नागपुरात त्यावरही तोडगा निघाला आणि ३९ जणांचा राज्याच्या मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. हे ३९ चेहरे आणि मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री गृहीत धरता आता राज्य मंत्रिमंडळात केवळ एक मंत्रिपद रिक्त राहिले आहे. ते बहुदा भाजपच्याच वाट्याचे असावे असे वाटते. मंत्रिमंडळामध्ये अशा दोन–तीन जागा रिकाम्या ठेवण्याची पूर्वीपासूनची पद्धत आहे. सगळे मंत्रिमंडळ पूर्ण क्षमतेने भरले, की मग इच्छुकांमध्ये नाराजी उफाळून वर येते. त्यांना गाजर दाखवून शांत ठेवण्यासाठी अशा दोन–चार जागा नेहमीच रिक्त ठेवल्या जातात. पण या वेळेला मात्र एकच जागा रिकामी ठेवली गेली आहे आणि त्यातही ती महायुतीतील तीन पैकी कुठल्या पक्षाची आहे तेही जाहीर केले गेलेले नाही. त्यामुळे त्या एका जागेवर आपला कधी ना कधी नंबर लागेल असा तिन्ही पक्षातल्या इच्छुकांचा डोळा राहील व ते शांत राहतील अशी अटकळ यामागे असावी. या ३९ जणांमध्ये ३३ कॅबिनेट दर्जाचे मंत्री आणि सहा राज्यमंत्री आहेत. त्यापैकी निम्म्याहून अधिक नवे चेहरे आहेत. एकूण चार महिलांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे अशा स्वरूपाची ही महायुती सरकारची नवीन टीम आहे. नव्या जुन्यांचा संगम करून एक वेगळा पॅटर्न राबवण्याचा प्रयत्न महायुतीने केला असला, तरी ही रचना फार चमकदार आहे असे म्हणता येत नाही. वळसे पाटील, मुनगंटीवार आणि भुजबळ अशा ज्येष्ठांना नारळ देण्यात आला आहे. हे मात्र त्यांच्या त्यांच्या पक्षाच्या नेतृत्वाने दाखवलेले एक धाडस म्हणावे लागेल. डावलले गेलेले हे तिघेही जण शक्तिशाली आहेत हे खरे, पण ते आपापल्या पक्षात फार काही खळबळ वाजवण्याच्या मनःस्थितीत नाहीत किंबहुना त्यांची तेवढी आता ताकद उरलेली नाही असे स्पष्ट दिसते आहे. मंत्रिपदासाठी तीनही पक्षांमध्ये ज्या स्वरूपाचे लॉबिंग झाले होते ते पाहता ज्यांची मंत्रिमंडळात वर्णी लागलेली नाही त्यांच्याकडून भविष्यात काही आगळीक होऊ शकते याचा अंदाज बहुदा तिन्ही पक्षाच्या नेत्यांना आला असावा. म्हणून त्यावर तोडगा म्हणून ही मंत्रिपदे अडीच वर्षासाठीच दिली गेली आहेत, त्यानंतर पुन्हा त्यात फेरबदल होतील असे गाजर इच्छुकांना दाखवले गेले आहे. अशी अडीच वर्षाची मर्यादा ठेवणे मंत्र्यांच्या दृष्टीने सोयीचे नाही. त्याचे कारण असे की आपण कितीही चांगले काम केले तरी आपल्याला अडीच वर्षानी जर डच्चूच मिळणार असेल तर मिळालेल्या संधीचा स्वतःच्या फायद्यासाठी अधिकाधिक लाभ करून घेण्याकडेच यातील मंत्र्यांचा कल असेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मंत्रिपदे अडीच वर्षासाठीच आहेत असे सर्वच मंत्र्यांना सांगितले गेल्याने राज्याचे नुकसानच होऊ शकते. कारण मंत्रिमंडळामध्ये योग्य तो ताळमेळ किंवा टीमवर्क त्यातून कायम राखता येणे अवघड होऊन बसते. या मंत्रिमंडळ रचनेत अनेक जिल्ह्यांना मंत्रिपदापासून वंचित राहावे लागले आहे. यात सोलापूर, नांदेड, धुळे, सांगली, लातूर, धाराशिव, जालना अशा काही महत्त्वाच्या जिल्ह्यांचा समावेश आहे. पुणे जिल्ह्याला जेमतेम चारच मंत्रिपदे मिळाली आहेत. त्यातील चंद्रकांत पाटील, दत्तात्रय भरणे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे आधीचेच मंत्री पुन्हा रिपीट झाले आणि ते अपेक्षितच होते. पण पुण्याला माधुरी मिसाळ यांच्या रूपाने एक जादाचे राज्यमंत्रिपदही मिळाले. त्यामुळे पुणे शहराला राज्य मंत्रिमंडळात चंद्रकांत पाटील आणि माधुरी मिसाळ अशी दोन मंत्रिपदे आणि मुरलीधर मोहोळ यांच्या रूपाने एक केंद्रीय मंत्रिपद अशी एकूण तीन पदे मिळाली आहेत. त्यामुळे आता पुण्याच्या रखडलेल्या विकासकामांना गती मिळायला हरकत नसावी. मंत्रिपदांचे वाटप झाले, मात्र अजून खातेवाटप बाकी आहे. त्यातही अर्थ, गृह, महसूल आणि नगर विकास या महत्त्वाच्या खात्यांवरील तिन्ही पक्षांची दावेदारी पाहता आता यापुढील काही काळ त्या खात्यातील रस्सीखेचासाठी जाईल. त्यातूनही अनेक रुसवे–फुगवे पुढे येतील. प्रत्येक टप्प्यावर झालेले हे नाराजी नाट्य पाहता महायुतीची नवी टीम कितपत एकजिनसीपणाने काम करील याविषयीची साशंकता कायम राहणार आहे. अर्थात, हा सगळा घोळ दूर करून समर्थपणे राज्यकारभार हाकायला एकट्या फडणवीस यांचे नेतृत्व पुरेसे आहे. पण त्या महत्त्वाकांक्षेला धक्का बसलेले एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याकडून काही अडथळे येतील काय, हा धोका कायमच आहे.

दृश्य स्वरूपात आता राज्य सरकारचा कारभार नव्या मंत्रिमंडळ रचनेने पूर्ववत सुरू होईल अशी अपेक्षा असली तरी त्यांच्यापुढे सगळ्यात मोठे आव्हान आश्वासन पूर्तीचे असेल. राज्यावर सध्या आठ लाख कोटी रुपयांचा कर्जाचा बोजा झाला आहे असे म्हणतात. त्यात आता निवडणूक पूर्वकाळात जाहीर झालेल्या योजना आणि आश्वासनांचा खर्च लक्षात घेतला तर आणखी एक लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा सरकारच्या तिजोरीवर पडणार आहे. लाडकी बहीण योजनेचा अतिरिक्त खर्च आणि शेतकऱ्यांना दाखवण्यात आलेले कर्जमाफीचे गाजर या दोन मोठ्या खर्चाच्या बाजू आहेत. महायुतीला राज्यातील तब्बल २३७ जागा मिळाल्या असल्याने लोकांकडून या सरकारविषयीच्या अपेक्षाही प्रचंड वाढल्या आहेत. जितक्या प्रचंड लोकप्रियतेच्या लाटेवर हे सरकार स्वार झाले, त्या तुलनेत लोकांची अपेक्षापूर्ती किती कार्यक्षमपणे आणि किती अवधीत पूर्ण करते यावर या सरकारचे यश अवलंबून असेल.

अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकांमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयानंतर अमेरिकेच्या केंद्रीय बँकेने व्याजदरातील संभाव्य घट ही वेगाला ब्रेक लावू शकते, असे मत मांडले. कारण महाग ठरणाऱ्या आयातीमुळे अमेरिकेला नव्या महागाईला तोंड द्यावे लागेल. म्हणूनच ट्रम्प यांच्या आगमनानंतर डॉलर इंडेक्स दोन टक्के वाढला. चीनचे चलन युआन हे चार महिन्यांपासून किमान पातळीवर आहे आणि रुपया तर घसरणीचा विक्रम नोंदवत आहे. स्टेट बँकेने म्हटले, की ट्रम्प यांच्या चार वर्षाच्या कारकिर्दीत रुपया हा दहा टक्क्यांपर्यंत अधिक कमकुवत होऊ शकतो. युरो, येन, ऑस्ट्रेलियाचा डॉलर धाडकन कोसळत आहेत.

# डॉलरचा दबदबा घाम फोडणारा!



## डॉ. अंशुमन कुमार

अस्वस्थ आणि बैचेन विक्रम हा कसबसा झाडाखाली पोचला. इकडे तिकडे पाहत असतानाच वेताळ हा धाडकन विक्रमच्या खांद्यावर येऊन बसला. विक्रम म्हणाला, ऐक वेताळ आज तुझे तोंड बंद ठेव. काहीही बोलू नकोस. माझे डोके सुन्न झाले आहे. शेअर बाजार उच्चांकी पातळी गाठत आहे. दुसरीकडे कमकुवत होणारा रुपया म्हणजे आयात महाग आणि तेवढी बाजारात मागणी देखील नाही. अशा स्थितीत कोणते नुकसान वाचवू हे मला कळत नाही, म्हणून तू गप्प बस.

तरीही वेताळ बोलला. तो म्हणाला, तु सुद्धा मजबूत होणाऱ्या डॉलरला बळी ठरलास! ट्रम्प यांच्या विजयानंतर डॉलरची उंची का वाढत आहे? विक्रम पुटपुटला, तेच तर समजून घेण्याचा प्रयत्न करत आहे. रुपयाच्या घसरणीने मोठा फटका सहन करावा लागत आहे. परकी गुंतवणुकदारांनी देखील मागील महिन्यात भारतीय शेअर बाजारातून तीन लाख कोटी काढून घेतले. बिचारा बाजार तरी काय करणार? वेताळ म्हणाला, अमेरिकी डॉलर तर सर्वांनाच हवा हवासा आहे. परंतु तो महाग व्हावा, असे कोणालाच वाटत नाही.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकांमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय झाला तेव्हा डॉलर आणि अमेरिकेचा शेअर बाजार दोन्ही एकाचवेळी तेजीने विजयाला सलामी देऊ लागले. बाजाराला वाटले की आता ट्रम्प आले आहेत, सरकारचा खर्च वाढेल, व्याजदर कमी होण्याचे संकेत मिळतील.विकास परत येईल, कंपन्यांची देखील भरभराट होईल. पण सध्याची हवा वेगळीच आहे. जग आता शेअरपेक्षा अमेरिकी डॉलरकडे पाहत आहेत. अमेरिकी उद्योगांची क्षमता वाढविण्यासाठी आयात महाग करू असे आश्वासन देत ट्रम्प सत्तेवर आले आहेत. आयातीवर २५ टक्के शुल्क लावणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मागच्या कार्यकाळात त्यांनी असा प्रयोग केला. एकार्थाने हा निर्णय जगात अमेरिका विरुद्ध चीन, युरोप आणि कॅनडा यांच्यातील व्यापार युद्ध सुरू करेल. या देशांना अमेरिकेची आयात महागडी ठरणार आहे.

अमेरिकेची बाजारपेठ ही आयातीवर अवलंबून आहे. तो सर्वात मोठा आयातदार देश आहे. गेल्यावर्षी अमेरिकेची एकूण आयात ३२ खर्व डॉलर राहिली.ती भारताच्या परकी चलन साठ्याच्या (नोव्हेंबर २०२४) पाच पट अधिक आहे. आयात शुल्क वाढविल्याने देशात इम्पोर्टेड महागाई येईल. अर्थात ट्रम्प यांच्या विजयानंतर अमेरिकेच्या केंद्रीय बँकेने व्याजदरातील संभाव्य घट ही वेगाला ब्रेक लावू शकते, असे मत मांडले. कारण महाग ठरणाऱ्या आयातीमुळे अमेरिकेला नव्या महागाईला तोंड द्यावे लागेल. म्हणूनच ट्रम्प यांच्या आगमनानंतर डॉलर इंडेक्स दोन टक्के वाढला. चीनचे चलन युआन हे चार महिन्यांपासून किमान पातळीवर आहे आणि रुपया तर घसरणीचा विक्रम नोंदवत आहे. स्टेट बँकेने म्हटले, की ट्रम्प यांच्या चार वर्षाच्या कारकिर्दीत रुपया हा दहा टक्क्यांपर्यंत अधिक कमकुवत होऊ शकतो. युरो, येन, ऑस्ट्रेलियाचा डॉलर धाडकन कोसळत आहेत. विक्रम म्हणाला, अमेरिकेच्या महागाईने जगाचा जीव का तळमळतो? वेताळ म्हणाला, जगातील बँका आणि सरकार आता एकच हिशोब करत आहेत आणि तो म्हणजे आगामी काळात ट्रम्पच्या राजनैतिक निर्णयाचे पारडे जड राहिल की डॉलरची शक्ती.

अमेरिकेत महागाई वाढण्याचा अर्थ डॉलर आणखी सक्षम होणे. मजबूत डॉलर म्हणजे जगावरचे संकट. जगातील ४० टक्के व्यापार आणि उलाढाल अमेरिकी डॉलरमध्ये होतो. यात अमेरिकेतून होणाऱ्या व्यापाराचा समावेश नाही. सक्षम डॉलरमुळे आयात महाग होते आणि मागणीची साखळी तुटते. डॉलर एक टक्के महाग होत असेल तर जगातील देशांच्या व्यापारात सुमारे ०.६ टक्के घट होऊ शकते. महाग डॉलर हा जगातील मंदीचे कारण ठरू शकतो. दुसरीकडे परकी गुंतवणुकदारांना अमेरिकी बाँडमध्ये अधिक परतावा मिळत आहे. तेव्हा ते विकसनशील बाजारातून बाहेर पडतात. भारतीय बाजारातील परकी गुंतवणुकदारांकडून विक्रीचा मारा होण्यामागे हेच कारण आहे. विक्रम अचानक बोलला, वेताळ गुरू जगाची तर वाट लागत आहे, परंतु नियोजित अध्यक्ष ट्रम्प तर अमेरिकी डॉलरच्या मजबुतीने आनंदी होत असतील. मग अमेरिका खरोखरच महान देश होईल? तेवढ्यात वेताळ बोलला, हा प्रश्न तुला बरा सुचला. ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली अमेरिका सध्या मोठ्या ऐतिहासिक द्विधा मनस्थितीत आहे. डॉलर मजबूत होणे म्हणजे अन्य देशांचे चलन कमकुवत होणे आणि निर्यातीत स्पर्धा वाढणे. परिणामी चीन, कोरिया, जपान, तैवान, मेक्सिको, कॅनाडा, जर्मनी, ऑस्ट्रेलियासारख्या निर्यात आधारित अर्थव्यवस्था बाजारात आघाडी घेऊ शकतात. शेवटी ट्रम्प अमेरिकेच्या देशांर्तगत उद्योगाला जगातील बाजारात पुढे चाल देण्यासाठी मजबूत करत आहेत. त्यामुळे ते आयात थांबवत आहेत. परंतु हे धोरण कदाचित अंगलट येण्याची शक्यता आहे. कंपन्यांत अस्वस्थता आहे. आयात शुल्क वाढल्याने त्यांचा कच्चा माल महाग होईल. दुसरीकडे जगातील बाजारातील त्यांचे स्थान संकुचित होतील. या वेळी वेताळने एक गौप्यस्फोट केला. उपाध्यक्ष जेडी वेन्स हे बऱ्याच काळापासून कमकुवत डॉलरला पाठबळ देत असल्याचे वेताळने सांगितले. त्यांच्या मते, मजबूत डॉलरमुळे अमेरिकी कामगारांच्या मागणीत घट होते. यावर्षी निवडणूक प्रचारात ट्रम्प यांनी देखील डेट्राईट शहरात बोलताना बायडेन यांनी त्यांच्या कार्यकाळात डॉलरची मजबुती वाढवत अमेरिकी अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडल्याचा आरोप केला. म्हणून स्थिती अशीच राहिली तर कंपन्या अन्य देशांत जातील.

विक्रम आपला हात केसावरून फिरवू लागला. अरे हे काय चालले आहे? असे तो बोलला. ट्रम्प जर अमेरिकेला ग्रेट करू इच्छित आहेत तर आयात महाग करत डॉलर महाग का करत आहे? वेताळ म्हणाला, पुढची चार वर्षे ट्रम्पसमवेत कसे जातील, हे जगालाच ठाऊक नाही. पण एक जुना किस्सा ऐकून त्याबाबत भविष्यातील अंदाज बांधता येऊ शकतो, असे तो म्हणाला. वेताळने विक्रमाच्या डोळ्यासमोर हात फिरवला आणि विक्रम स्वत: १९८० च्या दशकांत पोचला. याच काळात फेडरल बँकेचे प्रमुख पॉल वोल्कर यांनी व्याजदर वाढवून महागाईला चाप बसविला होता. १९८०–८४ या काळात अमेरिकेच्या डॉलरची किंमत २६ टक्क्यांनी वाढली होती. मेक्सिको, अर्जेटिनाचे चलन एवढे ढासळले की परकी कर्जबाजारीपणा आला. महागड्या कर्जासह अमेरिका मंदीच्या गाळात अडकला.

डॉलरला बळकटी मिळण्याची स्थिती ही तत्कालिन अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांच्या राजकारणावर विपरित परिणाम करणारी ठरली. कुटनिती पातळीवर अनेक काथ्याकुट झाल्यानंतर २२ सप्टेंबर १९८५ मध्ये जी–५ मधील (अमेरिका, पश्चिम जर्मनी, ब्रिटन, जपान अणि फ्रान्स) पाच देशांत ऐतिहासिक करार झाला. रेगन यांनी अमेरिकेच्या डॉलरच्या ५० टक्के अवमूल्यन केले. जपान, फ्रान्स, ब्रिटन आणि जर्मनीच्या चलनाचे मूल्य त्या प्रमाणात वाढले. या कराराला जागतिकीकरणाची सुरुवात मानले जाते, अर्थात हा करार जपानसाठी अडचणीचा ठरला. त्यानंतर जपान दीर्घकाळ मंदी आणि कुर्मगतीत अडकला. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी प्रचारात आयात शुल्क वाढविण्याबाबत दिलेल्या आश्वासनाला बगल देतील का किंवा रेगन यांचे दिवस पुन्हा येतील का? हे विक्रमने उपस्थित केलेले प्रश्न हवेतच विरले. आता पाठीवर वेताळ नव्हता, केवळ एक किंकाळी होती.

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर २०२४,** मार्गशीर्ष कृ. ५, मघा, श्री शके १९४६,विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू. संत गाडगेबाबा पुण्यतिथी. **नक्षत्र :** मघा, योग : विष्कंभ, करण : गरज. सूर्योदय : स.०६.४८ **सूर्यास्त** : सायं.०५.३५ वा. **राहू काळ : दुपारी : १:३० ते ३:००**

**दिनविशेष**

▶१८९०: किरणोत्सर्जनाच्या साह्याने गुणसूत्रात बदल घडवून आणता येतो, हे सिद्ध केल्यामुळे १८४६ चा नोबेल पुरस्कार मिळविणाऱ्या हर्मन म्युलर यांचा जन्म. ▶१९०९: अनंत कान्हेरे व त्याच्या साथीदारांनी नाशिकच्या नाट्यगृहात कलेक्टर जॅक्सनला गोळ्या घालून मारले. ▶१९३५: बालसाहित्यिक दत्ता टोळ यांचा जन्म. ▶१९६६: सुमारे १६०० किलोंचे चांद्रयान चंद्रावर उरिले. या रशियन यानाने चंद्रपृष्ठाची छायाचित्रे व मातीच्या तपासणीचे निष्कर्ष पृथ्वीवर पाठविले. ▶१९७९: इतिहास संशोधक न. र. फाटक यांचे निधन. ▶१९९३: ज्येष्ठ पत्रकार व स्वातंत्र्यसैनिक मल्हार रंगनाथ उर्फ राजाभाऊ कुलकर्णी यांचे निध ▶१९९७: निवृत्तीनाथ रामजी पाटील तथा पी. सावळाराम यांचे निधन सनईवादक पं. प्रभाशंकर गायकवाड यांचे निधन. ▶२००२: माजी राष्ट्रीय कबड्डीपटू आणि पुणे विद्यापीठ कबड्डी संघाचे प्रशिक्षक रत्नाकर माधव सावंत यांचे निधन. ▶२००३: हॉकीप्रमाणेच क्रिकेट जगातील बुजुर्ग खेळाडू एम. जे. गोपालन यांचे निधन.

**राशीभविष्य**

▲ **मेष :** चांगली संधी लाभेल. ▲ **वृषभ :** स्पर्धकांचा अंदाज घ्या. ▲ **मिथुन :** धार्मिक कामात लक्ष घालाल. ▲ **कर्क :** सकाळ घाईगडबडीचीच राहील. ▲ **सिंह :** कुटुंबातील गरजा भागवाल. ▲ **कन्या :** घरातील वृद्धांची काळजी घ्या. ▲ **तुळ :** स्वत:कडे लक्ष द्या. ▲ **वृश्चिक :** प्रतिष्ठा सांभाळा. ▲ **धनु :** घरातील कर्तव्याकडे लक्ष द्याल. ▲ **मकर :** कर्तव्याची जाणीव राहील. ▲ **कुंभ :** भावंडांशी संपर्क होऊ शकेल. ▲ **मीन :** मनोबल कमी राहील.

**चिंतन**

मनाचे दरवाजे उघडे ठेवल्यास दहाही दिशांनी नव्या विचारांच्या वाऱ्याचा स्पर्श अनुभवास येतो. नि:स्वार्थ प्रेमाच्या शीतल शिडकाव्याचा आल्हाददायक अनुभव येतो, अवघी जीवनदृष्टी बदलते. दुखःकडे पाहाण्याचा दृष्टिकोन बदलतो. जीवन दृष्टी विधायक बनते.

– रवींद्रनाथ टागोर

**व्यक्तीविशेष**

## संत गाडगे महाराज

संत गाडगेबाबा किंवा गाडगे महाराज यांचा आज स्मृतिदीन. १३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेडगाव या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर. त्यांच्या वडिलांचा धोब्याचा व्यवसाय होता. संत गाडगे महाराजांनी आपले सगळे आयुष्य समाजसुधारणेत व्यतित केले. खेड्यापाड्यांत त्यांनी स्वच्छतेचे महत्त्व लोकांना पटवून दिले. हातात झाडू आणि वागडा घेऊन ते खेडोपाडी जात. गावात गेल्या रस्ता झाडायला सुरुवात करत. गटाचे साफ करायला सुरुवात करत. भेटायला आलेल्या लोकांना बाजूला उभे रहायला सांगत. गाडगेबाबा जे काम करत त्याबदल्यात लोक त्यांना पैसे देऊ करत. पैशातून गाडगेबाबांनी शाळा, धर्मशाळा, इस्पितळे आणि जनावरांचे गोठे बांधले. लोकांना ते कीर्तनातून उपदेश करत. अंधश्रद्धा आणि कर्मकांड त्यांना अजिबात रुचत नसे. लौकिकार्थाने गाडगेबाबांचे शिक्षण झाले नव्हते; पण समाजातील जुन्या चालीरीती आणि कर्मकांड यातील खोटेपणा त्यांना अजिबाब सहन होत नसे. भुकेलेल्याला अन्य द्या, निराश्रिताला आश्रय द्या, गरीबाला कपडे द्या, प्राण्यांचे आणि वृक्षांचे संरक्षण करा आणि मुलींच्या लग्नासाठी मदत करा, हा त्यांचा उपदेश असे. स्वच्छ आणि साधेपणाने रहा, व्यसनापासून दूर रहा आणि पर्यावणाची काळजी घ्या असे ते कळकळीने सांगत. २० डिसेंबर १९५६ रोजी वळगावजळील पेढी नदीच्या काठी त्यांचे निधन झाले.

**बोधकथा**

## शेतकऱ्यानं दिला धडा

पण तुझ्यासारख्या सुशिक्षित माणसाला मी काय सांगणार? पण माझा अनुभव सांगतो की, जगात पैसा म्हणजेच सर्वस्व नसतं. माणसाला स्वतःच्या मनानं जगता येणंही तेवढंच महत्त्वाचं असतं.' त्यावर मोहन म्हणाला, 'अरे वा, पण पैसाच नसेल तर मोठ्या मनानं जगायचं कसं?' त्यावर शेतकरी म्हणाला, 'मन शांत असेल, समाधानी असेल तर पैशाची कमतरता भासत नाही. मी शेतात राबून प्रसंगी मोलमजुरी करून आणि तेही काम नसेल तर गवत विकून पैसा मिळवतो. माझ्या शेतात मी स्वतःच विहीर खोदली. त्यामुळे त्याचेही पैसे मी वाचवले.' हे ऐकून मोहनच्या मनात प्रकाश पडला. तो म्हणाला,' मी एवढा शिकलो आहे; पण तरीही दुसरा कोणीतरी मला नोकरी देईल या अपेक्षेने दुसऱ्यावर अवलंबून आहे. माझ्यापेक्षा हा अशिक्षित शेतकरी बरा.' तेव्हापासून मोहनने लगेचच नोकरीचा शोध थांबवला आणि अशिक्षित मुला–मुलींना शिकवण्याचं काम सुरू केलं. त्यांच्याकडून मिळणाऱ्या गुरुदक्षिणेवर त्याची गुजराण चांगली होऊ लागली. **(उत्तरार्ध)**

**जिज्ञासा**

## अशी तयार झाली मशीनची सुई

शिवणयंत्रातल्या सुईची मांडणी कशी करायची हाच विचार एकसारखा एलियासच्या मनात घर करून बसला होता. त्याला स्वप्नातसुद्धा यंत्रेच दिसू लागली. यंत्रामध्ये सुईची मांडणी कशी करायची या विचाराने खिन्न होऊन एक दिवस रात्री झोपला आणि त्याला एक वेगळेच स्वप्न पडले. एका राजाने त्याला शिवणयंत्र तयार करण्याची आज्ञा दिली आणि ते २४ तासांच्या आतच तयार करावे अन्यथा मरण पत्करावे, असे फर्मान सोडले. यानंतर एलियास वेगाने कामाला लागला. पण २४ तासांत त्याला काही यंत्र तयार करता आले नाही. राजाचे शिपाई एलियासच्या घरी येऊन त्याला मारण्यास सज्ज झाले. शिपायांनी हातातला भाला एलियासच्या डोक्यावर रोखला आणि भाल्याचे टोक डोक्यात खुपसले जात आहे असा भास होऊन एलियास झोपेतून घाबरून जागा झाला. जागा होताच त्याला सुईच्या मांडणीचे कोडे उलगडले होते. आपल्या यंत्राकडे जावून त्याने सुईची मांडणी केली. सुईच्या टोकाकडील बाजूलाच त्याने दोरा ओवण्याच्या सुईचे नाक ठेवले. त्यामुळे सबंध सुई पूर्णपणे कापडात घालावी लागणार नव्हती. या कल्पनेतून त्याने नवी सुई तयार केली. या सुईला कापडाशी ९० अंशाच्या कोनात ठेवून एलियासचे शिवणयंत्र तयार झाल होते. **(उत्तरार्ध)**

**आरोग्यवेध**

# रोबोटिक नी रिप्लेसमेंट का फायद्याची?

बदललेली जीवनशैली, व्यायामाचा अभाव, सतत लिफ्टचा वापर, दीर्घकाळ नियमित गाडीवर फिरणे, पोषणतत्वरहीत आहाराचे दीर्घकाळ सेवन, लठ्ठपणा यांसारख्या अनेक कारणांमुळे अलीकडील काळात सांधेदुखीची समस्या भेडसावणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. विशेषतः आपल्याकडे महिलांना स्वयंपाकादी कामांसाठी आयुष्यातील अनेक वर्षे दररोज ओट्यापुढे बरेच तास उभे राहावे लागते. तसेच घरातील कष्टाची कामे करावी लागतात. तरुणपणात या सर्वांचे परिणाम जाणवत नाहीत; मात्र शरीर वृद्धत्वाकडे झुकू लागले की सांधेदुखीसारख्या त्रासाच्या रुपातून हे परिणाम दिसू लागतात.



सांधेदुखीमध्ये गुडघ्यामध्ये होणाऱ्या वेदना असह्य स्वरुपाच्या असतात. अनेकदा पाय घसरून पडल्यामुळे, अपघातामुळे किंवा अन्य काही कारणांमुळे गुडघा फ्रॅक्चर होतो. गुडघ्यातील गुडघा फ्रॅक्चर झाल्यास वा दुखणे वाढल्यास रुग्णाला तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि उपचार करणे आवश्यक ठरते. काही वेळा गुडघ्यातील सांध्यांची झीज इतकी झालेली असते की तो बदलण्याशिवाय पर्याय नसतो. पूर्वीच्या काळी गुडघेबदलाची शस्त्रक्रिया ही प्रचंड वेदनादायी असल्यामुळे आणि तसेच दीर्घकाळ त्याचे परिणाम जाणवत असल्याने अनेक रुग्ण दुखणाऱ्या गुडघ्यासह आयुष्य व्यतीत करायचे. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानामुळे वैद्यकीय उपचारप्रणालींमध्ये क्रांतिकारक बदल झाले आहेत. विशेषतः सध्या जगभरात चर्चेत असणाऱ्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे आणि त्याआधारे कार्य करणाऱ्या रोबोटस्मुळे रोगनिदानांपासून अवघड व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांमध्ये थक्क करणारे परिणाम दिसत आहेत. भारतामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये कृत्रिम सांधेरोपणामध्ये रोबोटिक नी रिप्लेसमेंट सर्जरी करुन घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे.

रोबोटिक शस्त्रक्रियेमध्ये शरीरावर कमीतकमी आणि अचूकपणाने काप घेतला जातो. यामुळे आसपासच्या ऊतींना कमी नुकसान होते. याशिवाय शरीरावरील चट्टेही कमी दिसतात आणि जखमाही लवकर बऱ्या होतात. रोबोटिक सिस्टीमच्या वापरामुळे ऑपरेशन आधी कॉम्प्युटरवर त्याची रचना कशी असेल हे दिसून येते. रोबोटिक आर्म सर्जनला सबमिलीमीटर अचूकतेसह नियोजन करण्यास मदत करतो. यामुळे मानवी चुकांचा धोका कमी होतो. या पद्धतीमुळे ऑपरेशन १०० टक्के यशस्वी होण्याची आणि रुग्ण लवकर बरा होण्याची शक्यता वाढलेली आहे.

यासंदर्भात करण्यात आलेल्या अनेक अभ्यासातून आणि व्यक्तिशः मी केलेल्या शस्त्रक्रियांमधून असे दिसून आले आहे की रोबोटीक हँडच्या साहाय्याने केलेल्या गुडघेबदल शस्त्रक्रियेमध्ये रुग्णांचे रुग्णालयात दाखल होण्याचे कमी दिवस होतात. तसेच वेदनाही कमी होतात. त्यामुळे व्यस्त जीवनशैली असणाऱ्या रुग्णांसाठी तसेच वेदना सहन करण्याची क्षमता कमी असणाऱ्यांसाठी ही शस्त्रक्रिया वरदान ठरत आहे. अशा व्यक्ती अवघ्या काही दिवसांमध्ये कामावर परतू शकतात. काही रुग्णांमध्ये दोन्हीही गुडघ्यांची झीज झालेली असते. अशा वेळी ते एकदमच बदलणे फायदेशीर ठरते. कारण यामुळे जंतूसंसर्गाचा धोका कमी होतो. तसेच शस्त्रक्रियेसाठीचा खर्च तुलनेने कमी होतो.

रोबोटिक नी रिप्लेसमेंटची शस्त्रक्रिया करताना गुडघेदुखीची तीव्रता आणि ते दुखणे किती जुने आहे, या गोष्टी तपासल्या जातात. कृत्रिम गुडघारोपणाची शस्त्रक्रिया झाल्यावर दोन–तीन दिवसात रुग्ण चालू शकतो. त्याला टप्प्याटप्प्याने फिजिओथेरपीचे व्यायामही सांगितले जातात. या शस्त्रक्रियेनंतर चालणे–फिरणे, वाहन चालवणे, जिने चढणे–उतरणे, मांडी घालून बसणे या हालचाली करताना व्यक्तीला काहीही अडचण येत नाही. दुखण्यामुळे जे रुग्ण चालूही शकत नाहीत, त्यांचे रोजचे जीवन नक्कीच सुकर होते. अर्थात शस्त्रक्रियेनंतर वृद्ध लोकांनी घरी आणि बाथरूममध्ये पडण्याच्या धोक्यापासून स्वतःचे संरक्षण करणे गरजेचे आहे. यासाठी रात्रीच्या वेळी घरात पुरेशी प्रकाश व्यवस्था ठेवावी. शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच व्यायाम करावा.



**– डॉ. सुहास शहा**
(लेखक प्रख्यात अस्थिरोगतज्ज्ञ आहेत.)
संपर्क : ९३२२२३५०४२

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी धोरण ठरवा!



## भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांची मागणी; नागपूर हिवाळी अधिवेशनामध्ये लक्ष वेधले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-चिंचवड :** महाराष्ट्रातील मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी शास्त्रीय निकषांवर आधारित तर्कशुद्ध आणि न्याय्य धोरण अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रात "झीरो बाय ३०" चे उद्दीष्ट साध्य करायचे असेल, तर अँटिरेबीज लस आणि रेबीज एँटीसिरमच्या उपलब्धतेची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचली पाहिजे, अशी आग्रही मागणी महायुती सरकारकडे केली आहे. यावर निश्चितपणे सकारात्मक पावले उचलावीत, अशी मागणी भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांनी केली.

**हिवाळी अधिवेशन**

नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये पिंपरी-चिंचवडसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये भेडसावणारा मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नाकडे आमदार लांडगे यांनी महायुती सरकारचे लक्ष वेधले.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पुणे, पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण महाराष्ट्र किंबहुना भारतात मोकाट कुत्र्यांची समस्या गंभीर होत आहे. एका सर्व्हेक्षणानुसार, भारतात दरवर्षी 'रेबीज'मुळे २० हजार नागरिकांचा मृत्यू होतो. म्हणजे दर अर्ध्या तासाला एका व्यक्तीला रेबीजमुळे आपला जीव गमवावा लागतो. रेबीज व्यतिरिक्त इतर अनेक प्राणिजन्य (झुनोटिक) रोगांचा प्रसारही मोकाट कुत्र्यांमुळे होतो आहे.

त्यामुळे शहरी, निमशहरी आणि ग्रामीण भागांमध्ये मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी एकच ढोबळ धोरण असून चालणार नाही. इकॉलॉजी, सार्वजनिक आरोग्य शास्त्र, समाजशास्त्र इत्यादी विषयांतील तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हे धोरण ठरवले पाहिजे. यासाठी आवश्यक संशोधन प्रकल्प राबवले पाहिजे, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे. यावर राज्य शासनाकडून ठोस उपाययोजना केल्या जातील, अशी अपेक्षा आहे.



**तर्कशुद्ध आणि न्याय्य धोरण अत्यावश्यक**

● महाराष्ट्रात "झीरो बाय ३०" चे उद्दीष्ट साध्य करायचे असेल, तर अँटिरेबीज लस आणि रेबीज एँटीसिरमच्या उपलब्धतेची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचली पाहिजे, अशी आग्रही मागणी महायुती सरकारकडे केली आहे.

> आगामी २०३० पर्यंत जगभरात डॉग स्ट्रेंन रेबीजमुळे मरणाऱ्या लोकांची संख्या शून्यावर आणण्याचा दृढ निश्चय जागतिक आरोग्य संघटनेने केला आहे. त्यासाठी भारतात "झीरो बाय ३०" चे उद्दिष्ट यशस्वी होणे आवश्यक आहे. सध्यस्थितीला भारतात दरवर्षी २ कोटी लोकांना मोकाट कुत्रे चावतात. त्यापैकी २० हजार लोक रेबीजच्या संसर्गाने जीव गमावतात. रेबीज १०० टक्के प्राणघातक आहे. जोपर्यंत मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रणात येत नाही. तोपर्यंत भारतात डॉग- स्ट्रेन रेबीजचा प्रादुर्भाव रोखणे शक्य नाही. त्यामुळे राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी विधानसभा सभागृहात केली. त्यावर सकारात्मक कार्यवाही होईल, अशी अपेक्षा आहे.
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

**At a Glance**

### १२ वर्षांपासून तुटपुंज्या वेतनावर राबताहेत आरोग्य मित्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेचे काम करताना पंतप्रधान जनआरोग्य या आरोग्य योजनेअंतर्गत काम करणाऱ्या आरोग्य मित्र मागील १२ वर्षांपासून तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत. आता तर चार वर्षांपासून एक रुपयासुद्धा पगार वाढ झाली नसल्याची कैफियत शहरातील आरोग्य मित्रांनी मांडली. एमडी इंडिया इन्शुरन्स प्रा. लि.च्या माध्यमातून महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य (एकत्रित आयुष्यमान भारत फुले जन आरोग्य योजना) योजनेचे काम २०१२ पासून सुरू आहे. महाराष्ट्र शासन राज्य आरोग्य हमी सोसायटीअंतर्गत साहाय्य संस्था अंतर्गत कार्य या योजनेचे काम आरोग्य मित्रांतर्फे करण्यात येत आहे. यानंतर पंतप्रधान जनआरोग्य योजनेचे अतिरिक्त काम आरोग्य मित्रांकडून करून घेण्यात येत आहे. पंतप्रधान जनआरोग्य योजनेचे काम विनावेतन केले जात असल्याचे आरोग्य मित्रांचे म्हणणे आहे. या अनुषंगाने २६ हजार रुपये मासिक वेतन द्यावे, अशी मागणी महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेच्या जिल्हा प्रमुखांकडे करण्यात आली आहे.

# पालिकेच्या वतीने 'पेन्शनर्स डे' साजरा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेने आयोजित केलेल्या अखिल भारतीय सेवानिवृत्त वेतनधारक दिनाच्या कार्यक्रमासाठी केंद्र शासन, राज्य शासन, रेल्वे, पोस्ट, पोलीस संघटना, जिल्हा परिषद, बँक, महापालिका आदी सेवानिवृत्त संघटनांचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या अडी अडचणी, समस्या व मागण्या यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत, असे मत अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी व्यक्त करून पेन्शनर्स डे चे औचित्य साधून उपस्थित सेवानिवृत्तांना त्यांनी मार्गदर्शन केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज सेवा निवृत्ती धारक दिन अर्थात पेन्शनर्स डे साजरा करण्यात आला. संत तुकारामनगर, पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे झालेल्या कार्यक्रमात उपस्थित सेवा निवृत्ती धारकांशी संवाद साधताना ते बोलत होते.

वसंतराव वाबळे यांनी पेन्शनर्सच्या आयुष्यात येणाऱ्या अडी- अडचणींमध्ये महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन मदत करते. पेन्शनर्सची देखील काही कर्तव्य आणि जबाबदाऱ्या असून त्या त्यांनी पार पाडणे आवश्यक असल्याचे सांगितले.

> सेवानिवृत्तांच्या अडी- अडचणी सोडविण्यासाठी तसेच मागण्यांसाठी सर्व सभासदांनी संघटित होणे गरजेचे आहे. पेन्शनर्सने सेवानिवृत्तांच्या समस्या, शासनाचे पेन्शनविषयक धोरण यासारख्या विषयांवर स्वतःच्या हक्कासाठी लढले पाहिजे. पेन्शनर्सनी समाजासाठी आयुष्य सार्थकी लावावे, ज्येष्ठ नागरिक संघाच्या माध्यमातून कार्यरत रहावे यासाठी चांगले मित्र जपावेत. आवडत्या ठिकाणी भटकंती करावी. **— एन.डी.मारणे**

## हजारो भक्तांच्या उपस्थितीत अथर्वशीर्ष पठण

**चिंचवड :** ओम नमस्ते गणपतये... ओम गणपतये नमः ... 'मोरया, मोरया'च्या जयघोषाने हजारो मोरया भक्तांनी पहाटे एकत्र येत अथर्वशीर्ष पठणातून गणरायाला नमन केले. श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी महाराज यांच्या ४६३ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त सामूहिक अथर्वशीर्ष पठण भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. चिंचवड देवस्थान ट्रस्ट, संस्कृती संवर्धन विकास महासंघ व स्थानिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने या अथर्वशीर्ष पठणचे आयोजन करण्यात आले होते. गणेश नामाचा जयघोष करीत महिलांनी व अनेक शाळकरी मुलांनी सकाळच्या मंगल समयी प्रसन्नतेची अनुभूती दिली.

# प्राधिकरण सदनिका; सव्वातीन हजार अर्ज

**पिंपरी :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) पेठ क्रमांक १२, ३० व ३२ येथील एक हजार ३३७ सदनिकांसाठी १५ डिसेंबरपर्यंत अर्ज मागवले होते. त्यानुसार तीन हजार २७१ अर्ज अनामत रकमेसह प्राप्त झाले आहेत. पेठ १२ मधील पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) ४७ व अल्पउत्पन्न गट (एलआयजी) प्रवर्गासाठी ६१४ सदनिका आहेत. पेठ क्रमांक ३०-३२ मध्ये ईडब्ल्यूएस (वन आरके) प्रवर्गासाठी ३४७ व एलआयजी (वन बीएचके) प्रवर्गासाठी ३२९ सदनिका शिल्लक आहेत. त्यांच्या सोडतीची प्रारूप यादी एक जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यावर दोन जानेवारीपर्यंत आक्षेप घेता येईल. १३ जानेवारीला सोडतीसाठी स्वीकृत अर्जाची अंतिम यादी प्रसिद्ध होईल. २२ जानेवारीला अंतिम सोडत काढली जाईल.

पान १ वरून

## आमदार निवासात निकृष्ट दर्जाचे जेवण

दिवसांपासून आमदार निवासातील जेवणाबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत असल्याच्या समोर आले आहे.सकाळच्या नाष्ट्यात कच्चं जेवण, कच्चा उपमा दिल्या जात असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. तर दुपार आणि रात्रीच्या जेवणात वरणात पाणी टाकून जेवण दिलं जात आहे. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला राज्यभरातून आमदार त्यांचे पीए कार्यकर्ते मोठ्या संख्येने आमदार निवासमध्ये राहत असतात. मात्र अशा पद्धतीने जेवणाची गैरसोय होत असल्याचं आमदार प्रवीण स्वामी यांनी समोर आणला आहे.

# अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** अल्पसंख्यांक बांधवांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म आणि परंपरांचे संवर्धन करता यावे यासाठी महापालिकेच्या वतीने शिक्षण विभागामार्फत विद्यार्थी, पालकांसमवेत नागरिकांमध्येही अल्पसंख्यांक हक्क दिवसाची जागृती करण्यात आली. त्या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांच्या चित्रकला, निबंध व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून अशा उपक्रमातून अल्पसंख्यांक बांधवांच्या हक्कांचे संवर्धन करण्यात येत आहे असे प्रतिपादन शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांनी केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने थेरगाव येथील यशवंतराव चव्हाण उर्दू प्राथमिक शाळेमध्ये अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करण्यात आला.

'कभी खुशियो से, तो कभी गमो से मुलाकात हुई है, ऐसे लम्हो से ही जिंदगी लाजवाब हुई है' अशा शेरोशायरी करून विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला. तसेच अल्पसंख्यांक हक्क दिन, मायनारिटी राईटस डे अशा आशयाची सुबक चित्रे देखील विद्यार्थ्यांनी रेखाटले होते.



> शालेय विद्यार्थ्यांनी चित्रकला, निबंध व वक्तृत्व स्पर्धांमध्ये भाग घेऊन सहभाग नोंदवला होता. यामधील उत्कृष्ट विद्यार्थ्यांचा सत्कार सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांच्या हस्ते करण्यात आला.
> **— विजयकुमार थोरात, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त**

पान १ वरून

## अखेर महायुतीचे खाते वाटप ठरले

गृहखाते भाजपकडे, तर नगरविकास शिवसेनेकडेच राहणार आहे. तर अजित पवार गटाला अर्थ खाते मिळाले आहे. महसूल, सार्वजनिक बांधकाम, पर्यटन, ऊर्जा भाजपच्या ताब्यात राहणार. तर शिवसेनेचे उत्पादन शुल्क खाते राष्ट्रवादीला दिले आहे. विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर महायुतीचा घवघवीत यशानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री कोण होणार यासाठी बऱ्याच काळ सर्वांनी वाट पाहिली. त्यानंतर मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस तर उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी शपथ घेतली. त्यानंतर हिवाळी अधिवेशन सुरु होण्याच्या आदल्या दिवशी रविवारी १५ डिसेंबरला ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली. पण कोणत्या मंत्र्यांला कोणती जबाबदारी हे अद्याप ठरले नव्हते. परंतु आज झालेल्या खातेवाटपा नंतर चर्चेला आता पुर्ण विराम मिळाला आहे.

**राज्यमंत्री व त्यांचे खाते**

- **माधुरी मिसाळ** — **कृषी व संशोधन विभाग**
- **आशिष जयस्वाल** — **ऊर्जा विभाग**
- **पंकज भोयर** — **नगरविकास विभाग**
- **मेघना बोर्डीकर साकोरे** — **जलसंपदा विभाग**
- **इंद्रनील नाईक** — **शालेय शिक्षण विभाग**
- **योगेश कदम** — **पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभाग**

## डॉ. संतोष तेली यांना सुवर्णपदक

मानपत्र व सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले. नवी पेठेतील पत्रकार भवनात झालेल्या कार्यक्रमात कुराश असोसिएशनचे अध्यक्ष अंकुश नागर, सचिव शिवाजी साळुंखे, खजिनदार सोनाली नागर, डॉ. नंदिनी तेली, करणसिंह मोहिते आदी उपस्थित होते. व्यवसायाने अस्थिरोगतज्ज्ञ असलेल्या डॉ. तेली यांनी वरिष्ठ, ६५ किलो वजनी गटात ही चमकदार कामगिरी केली. विविध फेऱ्यांमध्ये उत्कृष्ट खेळ करीत अंतिम फेरी गाठल्यानंतर डॉ. तेली यांनी राजस्थान येथील धर्मेंद्र कुमार या भारतीय खेळाडूला मात देत सुवर्णपदकाला गवसणी घातली. त्वचारोग व कॉस्मेटोलॉजी तज्ज्ञ डॉ. नंदिनी तेली यांनी त्यांच्या डायट व तंदुरुस्तीची देखभाल केली. या स्पर्धेत एकूण ३४ देश सहभागी झाले होते. कनिष्ठ (१७ वर्षाखालील), कॅडेट (१८ वर्षांवरील) व वरिष्ठ (४० वर्षावरील) अशा तीन गटात ही स्पर्धा झाली. डॉ. संतोष तेली म्हणाले, "जागतिक स्तरावरील स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणे आणि त्यात सुवर्णपदक जिंकून येणे ही अभिमानाची गोष्ट आहे. कुराश हा खेळ कौशल्याने खेळण्याचा असून, त्यासाठी शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती महत्त्वाची असते.

## सभापतीपदी राम शिंदे यांची एकमताने निवड

सभापतीपद आपल्याला मिळावे, यासाठी शिवसेनेने जोरदार प्रयत्न केले होते. मात्र सभागृहातील संख्याबळामुळे भाजपने स्वत:कडे सभापतीपद ठेवत शिवसेनेला धक्का दिला आहे. राम शिंदे यांना देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जाते. ते २०१४ मध्ये विधानसभेवर निवडून आले, त्यांनी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात मंत्रिपदाची जबाबदारी पार पाडली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत कर्जत जामखेड मतदारसंघातून राष्ट्रवादीचे (शरद पवार) उमेदवार रोहित पवार यांच्याकडून राम शिंदे यांचा पराभव झाला. त्यानंतर त्यांना भाजपाकडून विधानपरिषद सदस्यपदी निवड करण्यात आली. नुकत्याच झालेल्या विधानसभा २०२४ च्या निवडणुकीत पुन्हा एकदा रोहित पवार यांच्याकडून त्यांचा अवघ्या १२०० मतांनी त्यांचा पराभव झाला.

## १७ कोटींचे बिल 'महापॉवर-पे'ला

दुकानदार, बचत गट, विद्यार्थी, महावितरणचे वीजबिल वाटप एजन्सी व मीटर वाचन करणाऱ्या संस्था वॉलेटधारक होऊ शकतात. एखाद्या ग्राहकाला वीजबिल भरायचे असल्यास या वॉलेटधारकाला देता येते. त्यानंतर वॉलेटधारक आपल्या वॉलेटमधून वीजबिल भरतो. त्यासाठी वॉलेटधारकास प्रतिपावती पाच रुपये कमिशन देण्यात येते. वॉलेटधारक होण्यासाठी इच्छुकांनी महावितरणच्या विभागीय , उपविभागीय कार्यालयांशी संपर्क साधावा, असे आवाहन पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे यांनी केले आहे.महावितरणच्या 'महापॉवर-पे' पेमेंट वॉलेटला पुणे विभागात चांगला प्रतिसाद मिळाला आहे. गेल्या सहा महिन्यांत १६ लाख ६ हजार ६६२ वीजग्राहकांनी १७७ कोटी ४२ लाख रुपयांच्या वीजबिलांचा वॉलेटद्वारे भरणा केला आहे

## लाडक्या बहिणींची संक्रांत गोड!

खात्यात जमा झालेला नाही. त्यामुळे डिसेंबर महिन्याचा हप्ता कधी मिळणार असा प्रश्न महिलांना पडला आहे. लाडकी बहीण योजना सुरू केलेली बंद होऊ देणार नाही. या योजनेसाठी कोणतेही निकष बदलण्यात आलेले नाहीत. पण ज्यांनी चार-चार खाती उघडली आहेत. त्यामुळे लाडक्या बहिणींचा पैसा योग्य प्रकारे गेला पाहिजे, कारण तो आपला, जनतेचा पैसा आहे. त्याचा गैरवापर किंवा योजनेचा चुकीचा वापर होत असेल तर ते समोर आले पाहिजे, लाडक्या बहिणींच्या खात्यात अधिवेशन संपल्यानंतर लाडकी बहीण योजनेचा डिसेंबर महिन्याचा हप्ता टाकण्यात येणार आहे.', असे वक्तव्य करत देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला आश्वस्त केले.

## स्पर्धा परीक्षांसाठी '2RE' चा 'स्मार्ट' उपाय

सरकारी रोजगार वाढत नसल्यामुळे, अशा पदांसाठी फक्त ०.२०% अर्जदार निवडले जातात आणि हा आकडा वाढण्याची शक्यता नाही, या विचारांनी पछाडलेल्या झेर्टोन एज्युकेशन टेक्नॉलॉजीचे सह-संस्थापक सुजित चणखोरे आणि ऐश्वर्या पाटील यांनी 'Listen2RE' हे ऑडिओ प्लॅटफॉर्म सुरू केले. 2RE ॲप च्या फ्लॅटफार्म माध्यमातून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तके वाचणे, उजळणी करणे आणि संग्रह लक्षात ठेवण्याचे ओझे कमी करण्यास आणि संपूर्ण दैनंदिन दिनचर्या आखण्यास मदत करते.

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
दुरध्वनी : ०२०-२६१२५७७९, ईमेल: ddrpunegramin@gmail.com

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक ५६/२०२४-२५
पुणे, दिनांक : ०९/१२/२०२४/६९०

**अर्जदार**
अभियोग प्लाझा सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: स.नं. ६२/१ (नवा), (जुना ४५/१+२) प्लॉट नं. २ राजगुरुनगर, ता. खेड, जि.पुणे-४१०५०५.
तर्फे, अध्यक्षः श्री. अमोल काशिनाथ बोरकर,
सचिवः श्री. प्रवीण मुकुंद बोंबले

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक / जागा मालक / जाब देणार १. अ. श्री. एकनाथ सिताराम सांडभोर, ब. श्री. यशवंत सबाजी घुमटकर, जाब देणार नं.१ अ व व. राहणार, पत्ता- राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे- ४१०५०५ **जाबदेणार**

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार क्रमांक ०१ यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक २३/१२/२०२४ रोजी दुपारी ३.३० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक ०९/१२/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

शिक्का

सही/-
**प्रकाश ल. जगताप**
सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
दुरध्वनी : ०२०-२६१२५७७९, ईमेल: ddrpunegramin@gmail.com

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक ५६/२०२४-२५
पुणे, दिनांक : ०९/१२/२०२४/६८६

**अर्जदार**
सिल्वर ट्रेझर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: स. नं. २८४/१ (पैकी), वडगाव, ता. मावळ, जि. पुणे- ४१२१०६. तर्फे,
अध्यक्षः श्री. नंदकिशोर हेमराज जुगसनिया, सचिवः श्री. लियाकत पैगंबर मुलाणी

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
१. मार्क बिल्डकॉन तर्फे भागीदार, अ. श्री. किशोर शंकर गारवे,
ब. श्री. विनायक किशोर गारवे, क. श्री. मिलींद भागवत पोखरकर
ऑफिस पत्ता- १३६/१ अ/६, दुसरा मजला, गारवे मोटर्स,
मुंबई बेंगलोर हायवे, वाकड, सयाजी हॉटेल च्या समोर, **जाबदेणार**
ता. हवेली, जि. पुणे- ४११०५७.
२. मार्क बिल्डकॉन, तर्फे भागीदार,
अ. श्री. मिलींद भागवत पोखरकर,
ब. श्री. विनायक किशोर गारवे
ऑफिस पत्ता- १३६/१अ/६, दुसरा मजला, गारवे मोटर्स, मुंबई बेंगलोर हायवे, वाकड, सयाजी हॉटेल च्या समोर, ता. हवेली, जि. पुणे- ४११०५७.
इतर इमारत
३. इमारत ए - पत्ता : स. नं. २८४/१, वडगाव, ता. मावळ, जि. पुणे- ४१२१०६

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार क्रमांक ०१ ते ३ यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक २३/१२/२०२४ रोजी दुपारी ३.३० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५. बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक ०९/१२/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

शिक्का

सही/-
**प्रकाश ल. जगताप**
सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
दुरध्वनी : ०२०-२६१२५७७९, ईमेल: ddrpunegramin@gmail.com

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक ५६/२०२४-२५
पुणे, दिनांक : ०९/१२/२०२४/६९१

**अर्जदार**
नियोजित ड्रीमसिटी बी व सी विंगसहकारी गृहरचना संस्था मर्या.
तर्फे मुख्य प्रवर्तक श्री. गणेश दत्तात्रय पोखरकर,
स. नं. १५१/१, सातकरवाडी, ता. खेड, जि.पुणे-४१०५०५

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
मे. अरिहंत बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स भागीदारी संस्था तर्फे भागीदार,
१) अ) श्री सुशिल संपतलाल शिंगवी
ब) श्री जयंत काशिनाथ घोरपडे,
रा.राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.
२) श्री सुशिल संपतलाल शिंगवी,
३) श्री छगन बबनलाल रिठे,
४) श्री राम कोंडीराम कडुसकर,
वरील २ ते ४ रा. राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.
५) श्री रविंद्र गिरधारीलाल कटारिया,
रा. भोसरी, ता. हवेली, जि. पुणे. **जाबदेणार**

वरील नमूद अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने वरील नमूद मुख्य प्रवर्तक यांनी संस्थेच्या नोंदणीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर नियोजित संस्थेच्या नोंदणी प्रस्तावाबाबत त्यांचे काही म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक २३/१२/२०२४ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५. बी. जे. रोड, पुणे १ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
**प्रकाश ल. जगताप**
सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
दुरध्वनी : ०२०-२६१२५७७९, ईमेल: ddrpunegramin@gmail.com

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक ५६/२०२४-२५
पुणे, दिनांक : ०९/१२/२०२४/६८९

**अर्जदार**
अमृतयोग होम्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता:स.नं.१/३/४/३/५, मौजे- मारूंजी, ता. मुळशी, जि. पुणे- ४११०५७. तर्फे, अध्यक्षः श्री. मीसुदास मेवादास वैष्णव, सचिवः श्री. प्रदीप चौधरी

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
१) मे. दर्वेश असोसिएट्स, नोंदणीकृत भागीदारी संस्था, तर्फे भागीदार,
अ. संदीप हनुमंत पवार, ब. श्री. चंदू इशरफील मंडले
ऑफिस पत्ता- फ्लॅट नं. १०९/३, साई विहार अपार्टमेंट, विजय नगर,
काळेवाडी, ता. हवेली जि. पुणे- ४११०१७.
२) जागा मालक / मान्यता देणार / जाब देणार नं. २ **जाबदेणार**
ई. पुजा विलास बुचडे, एफ. श्री. देविदास अनंतराव बुचडे,
जी. सौ. छाया देविदास बुचडे, एच. श्री. गौरव देविदास बुचडे,
२. ए. श्री. अनंतराव गणपत बुचडे, बी. सौ. सुभदा अनंतराव बुचडे,
सी. श्रीमती प्रमिला विलास बुचडे, डी. श्री. आकाश विलास बुचडे,
एम. आकांक्षा विश्वास बुचडे, एन. मंगेश विश्वास बुचडे,
आय. वैष्णवी देविदास बुचडे, जे. श्री. विश्वास अनंतराव बुचडे,
के. सौ. ज्योती विश्वास बुचडे, एल. प्रतिज्ञा विश्वास बुचडे,
जाब देणार नं. २ अ ते एन सर्व रा. मु. पो. मारूंजी, ता. मुळशी जि. पुणे- ४११०५७.
(जा. देणार नं. २ तर्फ कु.मु. धारक म्हणुन जा. देणार नं.१)

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार क्रमांक ०१ व २ यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काहो म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक २३/१२/२०२४ रोजी दुपारी ३.३० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५. बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक ०९/१२/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

शिक्का

सही/-
**प्रकाश ल. जगताप**
सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मागणी

# कांदा निर्यातीवरचे २० टक्के शुल्क रद्द करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई** : केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर लावलेले २०% शुल्क तातडीने रद्द करण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय व्यापार व उद्योगमंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहून केली आहे. श्रीलंका सरकारने कांद्यावरील आयातशुल्क २० टक्क्यांनी कमी करुन अधिकाधिक कांदा आयातीचे प्रयत्न सुरु केले असल्याने नाशिकसह राज्यातील शेतकऱ्यांना त्यांचा लाल कांदा श्रीलंकेसह परदेशांमध्ये निर्यात करता यावा, कांद्याला खर्चावर आधारीत चांगला दर मिळावा यासाठी केंद्र सरकारने कांद्यावरील २०% निर्यातशुल्क तातडीने रद्द करणे आवश्यक असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांना लिहिलेल्या पत्रात लिहिले आहे.

राज्यातील आमदार नितीन अर्जुन पवार, दिलीपराव बनकर, हिरामण खोसकर, सरोजताई अहिरे आदी लोकप्रतिनिधींनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पत्र लिहून याप्रश्नी लक्ष घालण्याची तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली होती. या लोकप्रतिनिधींच्या मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय व्यापार मंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहून कांद्यावरील २०% निर्यातशुल्क तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे.

केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांना लिहिलेल्या पत्रात उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणतात की, राज्यात विशेष करुन नाशिक जिल्ह्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. या शेतकऱ्यांकडून परदेशात मोठ्या प्रमाणावर कांदा निर्यात केली जाते. आजमितीस उन्हाळी कांदा संपलेला असून नवीन लाल कांदा मोठ्या प्रमाणावर बाजारात विक्रीसाठी आला आहे. राज्यातील शेतकऱ्यांनी नैसर्गिक संकटाशी लढत कांद्याचे उत्पादन घेतलेले आहे. अवेळी पाऊस व बदलत्या हवामानानुसार त्यांच्या कांद्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उर्वरीत चांगल्या कांद्यास खर्चावर आधारीत चांगला भाव मिळणे गरजेचे असतांना बाजारभावात दिवसेंदिवस घसरण होत आहे.

सद्यस्थितीत राज्यातील लाल कांद्याला प्रति क्विंटल सरासरी २,४०० रुपये अत्यल्प दर मिळत असून शेतकऱ्यांचे होणारे नुकसान मोठे आहे. लाल कांदा टिकाऊ नसल्याने शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना तात्काळ विक्री करावे लागत आहे, हे सुद्धा नुकसानीचे महत्वाचे कारण आहे. हे नुकसान टाळण्यासाठी, राज्यातील शेतकऱ्यांच्या कांद्याला चांगला भाव मिळण्यासाठी राज्यात उत्पादित लाल कांद्याची परदेशात जास्तीत जास्त निर्यात होणे आवश्यक आहे.

त्यासाठी केंद्र सरकारने २०% निर्यात शुल्क हटविणे गरजेचे आहे. जेणेकरून लांल कांद्याचे दर टिकुन राहतील व कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारीत चांगले दर मिळतील, असे उपमुख्यमंत्र्यांनी केंद्रीय व्यापार मंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट केले असून २०% निर्यातशुल्क रद्द करण्याची मागणी केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्राच्या अनुषंगाने केंद्र सरकारकडून तातडीने सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे.

# शेअर बाजारात सलग घसरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

### गुंतवणूकदारांचे २.६२ लाख कोटी उडाले

● आजच्या १९ डिसेंबरच्या ट्रेडिंग सत्रात बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल २.६२ लाख कोटी रुपयांनी कमी होऊन ४४९.९८ लाख कोटींवर आले. १८ डिसेंबर रोजी बाजार भांडवल ४५२.६० लाख कोटी रुपयांवर होते.



**मुंबई** : कमकुवत संकेत आणि अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने व्याजदराबाबत केलेल्या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय शेअर बाजारात गुरुवारी (दि. १९) सलग चौथ्या दिवशी घसरण कायम राहिली. सेन्सेक्स ९६४ अंकांनी घसरून ७९,२१८ वर बंद झाला. तर निफ्टी २४७ अंकांच्या घसरणीसह २३,९५१ वर स्थिरावला. आजच्या सत्रात आयटी आणि बँकिंग शेअर्सना मोठा फटका बसला. सेन्सेक्स या आठवड्यात सुमारे ३ टक्के खाली आला आहे. यामुळे गुंतवणूकदारांचे सुमारे १०.५ लाख कोटींचे नुकसान झाले आहे.

आजच्या ट्रेडिंग सत्रात सेन्सेक्स १ हजार अंकांनी खाली आला. निफ्टी २३,९०० च्या खाली घसरला. निफ्टी बँक आणि निफ्टी आयटी प्रत्येकी १ टक्के घसरले. विदेशी गुंतवणूकदारांकडून विक्री आणि डॉलरच्या तुलनेत कमकुवत झालेल्या रुपयाचाही फटका बाजाराला बसला. सर्वाधिक घसरण आयटी शेअर्समध्ये दिसून आली. त्याशिवाय बँकिंग, कन्झ्यूमर ड्यूरेबवल्स शेअर्समध्ये प्रॉफिट बुकिंग झाले.

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने बुधवारी व्याजदरात २५ बेसिस पॉइंट्सची कपातची घोषणा केली. या २५ बेसिस पॉइंट्सच्या कपातीमुळे फेडरल रिझर्व्ह या मध्यवर्ती बँकेचा बेंचमार्क पॉलिसी रेट ४.२५ टक्के ते ४.५० टक्के श्रेणीत आला आहे. दरम्यान, फेड रिझर्व्हने २०२५ मध्ये व्याजदरात कमी प्रमाणात कपात होईल, असा अंदाजही व्यक्त केला आहे. याचे पडसाद अमेरिकेसह भारतीय शेअर बाजारात उमटले आणि सेन्सेक्स-निफ्टी धडाम झाले. फेड रिझर्व्हच्या अंदाजानंतर अमेरिकेतील शेअर बाजारात मोठी घसरण झाली.

## उत्तर प्रदेशात काँग्रेस कार्यकर्त्याचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनौ** : उत्तर प्रदेशातील योगी सरकारचा निषेध करण्यासाठी निदर्शने करत असताना नॅशनल स्टुडंट्स युनियनचा कार्यकर्ता प्रभात पांडे (वय ३१) याचा मृत्यु झाला. त्या निषेधार्थ काँग्रेस कार्यकर्ते आणि नेत्यांनी सरकारचा धिक्कार केला आणि राज्य सरकारविरोधात संताप व्यक्त केला. त्यांनी पक्ष कार्यालयाच्या मुख्य गेटवर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या पुतळ्याचे दहन केले.

काँग्रेसजनांनी पक्षाच्या मुख्यालयात श्रद्धांजली सभेचे आयोजन केले होते. या शोकसभेत राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश पांडे, माजी खासदार आणि प्रदेश काँग्रेस अध्यक्ष अजय राय - माजी मंत्री, खासदार, आमदार आणि राजकीय नेते सहभागी झाले होते. तत्पूर्वी, या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलिसांचे पथक गुरुवारी सकाळी काँग्रेस कार्यालयात पोहोचले.

# नवीन वर्षाचे स्वागत होणार कडाक्याच्या थंडीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई** : यंदाच्या वर्षी राज्यात थंडीनं काहीशी उशिरानंच पकड मजबूत केली. असं असलं तरीही ऑक्टोबरनंतर मात्र या थंडीनं दडी मारली आणि पुन्हा राज्यात तापमानवाढीचं चित्र पाहायला मिळालं. इथं ही स्थिती असतानाच मागील दोन ते तीन आठवड्यांपासून सातत्यानं महाराष्ट्रातील किमान आणि कमाल तापमानात घट होत असल्यामुळं हवामान विभागानं सरत्या वर्षाच्या शेवटासोबतच नव्या वर्षाचं स्वागतही कडाक्याच्या थंडीनं होईल असा अंदाज वर्तवला आहे.

देशाच्या उत्तरेकडे असणाऱ्या राज्यांमध्ये थंडीचा कडाका वाढत असून, अतीव उत्तरेकडून येणाऱ्या शीतलहरी आणि पाकिस्तान, अफगाणिस्तानच्या पर्वतरांगेकडून येणाऱ्या कोरड्या वाऱ्यांचा थेट प्रभाव भारतातील हवामानावर दिसत आहे. ज्यामुळं पर्वतीय भागासह मैदानी क्षेत्रामध्येही तापमानात घट नोंदवली जात असून, दक्षिण भारत वगळता उर्वरित देशामध्येही याचा परिणाम पाहायला मिळत आहे.

महाराष्ट्रात धुळे, नाशिक, परभणी, जेऊर इथं निच्चांकी तापमानाची नोंद करण्यात येत असून, या भागांमध्ये तापमानाचा आकडा ४ ते ५ अंशांदरम्यान असल्याची माहिती मिळत आहे. तर, जळगाव, नागपूर, गोंदियासह राज्यातील कोकण किनारपट्टी क्षेत्रामध्येही गारठा जाणवू लागला आहे. गुरुवारी निफाडचा पारा ६ अंशांवर असून, इथं कमाल तापमान २८ अंश असल्याची नोंद करण्यात आली.

## Selected

### कुलगाम येथे चकमक

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यात लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. कुलगाम जिल्ह्यातील कद्दर भागात झालेल्या चकमकीत पाच दहशतवाद्यांना भारतीय जवानांनी कंठस्नान घातले आहे. या गोळीबारात दोन जवानही जखमी झाले आहेत. पोलीस आणि सुरक्षा दल दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर देत आहेत. दहशतवाद्यांच्या उपस्थितीबाबत विशिष्ट गुप्तचर माहितीच्या आधारे भारतीय लष्कर आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी कादर, कुलगाम येथे संयुक्त ऑपरेशन सुरू केले. दक्ष जवानांनी संशयास्पद हालचाली पाहिल्या आणि त्यांना आव्हान दिल्यावर दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. याला सैन्याने प्रभावीपणे प्रत्युत्तर दिले. या चकमकीत ५ दहशतवाद्यांचा खात्मा झाला.

### कांद्याच्या दरात अभूतपूर्व घसरण

**सोलापूर** : कृषी उत्पन्न बाजार समितीत १०-१५ दिवसांपूर्वी कांद्याला प्रतिक्विंटल साडेतीन हजार रुपयांचा सरासरी दर होता. उच्चांकी दर सात हजारांपर्यंत मिळत होता. पण, आता आवक तेवढीच असताना देखील कांद्याचे सरासरी दर तब्बल दोन हजार रुपयांनी घसरल्याची स्थिती पहायला मिळत आहे. कांद्याला १८०० रुपयांचा सरासरी दर मिळाला. सोलापूर बाजार समितीत ४३० गाड्या कांद्याची आवक होती. ४३ हजार ७७ क्विंटल कांद्यापैकी अवघा पाच क्विंटल कांदा चार हजार ६०० रुपये प्रतिक्विंटल दराने विकला गेला. उर्वरित ४३ हजार ६८ क्विंटल कांद्याला सरासरी दर अठराशे रुपयांपर्यंतच मिळाल्याचे दिसून आले. बाजार समितीत कांद्याच्या विक्रीतून पावणेआठ कोटींची उलाढाल झाली. एवढीच आवक असताना मागील दहा दिवसांपूर्वी ११ कोटींपर्यंत उलाढाल होती. दरात मोठी घसरण झाल्याने, शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पावसाळ्यात जागेवरच खराब झालेला कांदा काढून शेतकऱ्यांनी नवीन कांद्याची लागवड केली. त्यातून चार पैसे हाती पडतील, नुकसान भरून निघेल हा त्यामागील हेतू आहे.

### जगदीप धनखड यांच्या विरोधातील ठराव फेटाळला

**नवी दिल्ली** : उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड़ यांच्याविरोधात विरोधकांनी मांडलेली अविश्वास प्रस्तावाची नोटीस फेटाळण्यात आली आहे. यामागचे कारण म्हणजे किमान १४ दिवसांपूर्वी अविश्वास ठरावाची नोटीस आणायला हवी होती, ती झाली नाही. त्यामुळे राज्यसभेच्या उपसभापतींनी तांत्रिक कारणास्तव विरोधकांचा हा प्रस्ताव फेटाळून लावला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रस्ताव मांडण्यासाठी बंधनकारक असलेली १४ दिवसांची नोटीस देण्यात आली नसल्याचे उपसभापती हरिवंश यांनी फेटाळण्याचे कारण स्पष्ट केले. जगदीप धनखड़ यांच्या नावाचाही योग्य उच्चार करण्यात आलेला नाही. उपराष्ट्रपती जगदीप धनखड़ यांना पदावरून हटवण्याच्या प्रस्तावावरून गेल्या आठवड्यात राज्यसभेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार चकमक उडाली होती, ज्यामुळे राज्यसभेचे कामकाज शुक्रवारी दिवसभरासाठी तहकूब करावे लागले होते. आपण शेतकऱ्याचे पुत्र असून, ते कधीही कमकुवत होणार नाहीत, असे म्हणत धनखड़ यांनी विरोधक दिवसरात्र त्यांच्याविरोधात अपप्रचार करत असल्याचा आरोप केला होता.

## झेडपी शाळांत शिक्षक भरती देखील नाहीच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई** : जिल्हा परिषदेच्या ज्या शाळांचा पट १ ते २० पर्यंत आहे, अशा शाळांवर सेवानिवृत्त शिक्षक नेमण्याचा शासन निर्णय निघाला. त्यानंतर त्या निर्णयात बदल करून दहापर्यंत पटसंख्या असलेल्या शाळांवर कंत्राटी शिक्षक (डीएड, बीएडधारक सुशिक्षित तरुण-तरुणी) नेमण्याचा निर्णय झाला. आता पुन्हा तो निर्णय थांबविण्यात आला असून कमी पटसंख्येच्या झेडपी शाळांवरील शिक्षकांचा प्रश्न 'जैसे थे'च आहे. शालेय शिक्षण विभागाला यासंदर्भात आता नूतन शिक्षणमंत्र्यांच्या आदेशाची प्रतीक्षा आहे.

राज्यातील १४ हजार ७८३ शाळांमधील पटसंख्या १ ते २० पर्यंत असून त्यात सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २७६६ पैकी जवळपास दीडशे शाळा आहेत. त्यात ५३ शाळांचा पट दहापेक्षा कमी आहे. या शाळांवर कंत्राटी शिक्षक घेण्याचा निर्णय झाला होता. पण, त्याची कार्यवाही थांबल्याने शासनाच्या धरसोड भूमिकेवर डीएड-बीएडधारक तरुण-तरुणी वैतागले आहेत.

राज्यात ३० ते ३२ हजार शिक्षकांची भरती केली जाईल, अशी ग्वाही तत्कालीन शिक्षणमंत्र्यांनी दिली होती. मात्र, अजूनही जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये सात हजारांवर शिक्षक कमीच आहेत.

## एक है तो सेफ है...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**नागपुर :** नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशन- २०२४ निमित्त आज विधिमंडळातील सदस्यांचे समूह छायाचित्र काढण्यात आले.

# श्री साईंच्या मूर्तीचे आज थ्रीडी स्कॅनिंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिर्डी** : जगभर नावलौकिक असलेल्या शिर्डी साईबाबा समाधी मंदिरात असलेल्या साईंच्या संगमरवरी मूर्तीची प्रतिकृती तयार करण्याकरिता थ्रीडी स्कॅनिंग करण्यात येणार आहे. तसंच गेल्या सत्तर वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेल्या इटालियन मार्बलमध्ये घडविण्यात आलेल्या या मूर्तीची सद्यपरस्थिती काय आहे, याचा नेमका अंदाज यावा यासाठी थ्रीडी स्कॅनिंग २० डिसेंबर रोजी केलं जाणार असल्याची माहिती साईबाबा संस्थानच्या वतीनं देण्यात आलीय.

साईबाबांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आल्यानंतर प्रारंभीच्या काळात मूर्तीला दूध आणि पाण्यानं अंघोळ घातली जात होती. मात्र, त्यामुळं मूर्तीची हळूहळू झीज होऊ लागल्याचं निदर्शनास आलं. मार्बल हे नैसर्गिकदृष्ट्या थंड गुणधर्माचं असल्यानं गरम पाणी आणि दही-दुधामुळं त्याला हानी पोहोचते, असं तज्ञांनी स्पष्ट केलं. याची पाहणी केल्यानंतर तज्ञांनी काही सूचना केल्या आहेत. त्यानुसार काळजी घेण्यात येऊ लागली. मात्र, काळानुरुप मूर्तीची झीज सुरूच असल्याचं पुढं आलंय. त्यामुळं या मूर्तीचं थ्रीडी स्कॅनिंग करून तो डाटा संरक्षित झाला तरच भविष्यात सध्याच्या मूर्तीप्रमाणं भविष्यातदेखील मूर्ती पाहता येईल. तसंच हा डेटा वापरून तशीच हुबेहूब मूर्ती तयार करता येऊ शकेल, अशी संकल्पना पुढं आली आहे.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयातील तज्ञांमार्फत साईबाबा समाधी मंदिरातील साईबाबांच्या संगमरवरी मूर्तीचा थ्रीडी स्कॅनिंगद्वारे डाटा संरक्षित केला जाणार आहे.

# समाजवादी पक्षाच्या खासदारावर वीजचोरीचा आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**संभल** : उत्तर प्रदेशातील संभल येथील समाजवादी पक्षाचे खासदार झियाउर रहमान बुर्के यांच्या घराची झाडाझडती घेण्यात आली होती. त्यावेळी बुर्के यांच्या कुटुंबीयांनी संबंधित पथकाला वीज मीटर तपासणीपासून विरोध केला. याप्रकरणी कनिष्ठ अभियंत्याला धमकी दिल्याप्रकरणी समाजवादी पक्षाच्या नेत्यावर एफआरआय लागू करण्यात आल्याचे वृत्त आहे. मोठ्या संख्येने पोलीस रॅपिड ॲक्शन फोर्स आणि पीएसी कर्मचारीही या पथकासोबत उपस्थित होती असे वृत्त आहे. ही घटना १९ डिसेंबर रोजी घडली होती.

उत्तर प्रदेश वीज अभियंता डीके गुप्ता म्हणाले की, दोन जेई आणि दोन एसडीओसह पाच जणांचे पथक सकाळी झियाउर रहमान बुर्के यांच्या घरी गेले होते. नेत्याचे कुटुंबीय अधिकाऱ्याला वीज तपासून देत नव्हते. मात्र नंतर कनिष्ठ अभियंता यांनी कुलूप उघडले असता त्याला धमकी देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. याप्रकरणी आता एफआरआय दाखल करण्यात आल्याचे वृत्त आहे.

याप्रकरणावर आता वरिष्ठ अभियंता डीके गुप्ता म्हणाले की, "एकूण १६.५ किलोवॅटचा भर एकूण थकबाजी नोंदवण्यात आली होती. प्रत्येकी २ किलोवॅटचे दोन कनेक्शन होते. यातील एक झियाउर रहमान बुर्के यांच्या नावावर आहे. तर दुसरे त्यांच्या आजोबांच्या म्हणजे शफीकुर रहमान बुर्के यांच्या नावावर असणे गरजेचे आहे.

# पंजाबमध्ये शेतकऱ्यांचे आंदोलन, रेल्वे विस्कळीत

**नवी दिल्ली** : पिकांसाठी कायदेशीर बंधनकारक किमान आधारभूत किंमत (एमएसपी) मागणीसाठी पंजाब-हरियाणा सीमेवरील शंभू आणि खनौरी सीमेवर शेतकऱ्यांचे आंदोलन सुरूच आहे. आज (दि.१६) पंजाबमधील शेतकऱ्यांनी तीन तासांचे 'रेल रोको' आंदोलन सुरू केले.

संयुक्त किसान मोर्चा (गैर-राजकीय) आणि किसान मजदूर मोर्चाच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनाचा मोगा, फरीदकोट आणि मोहालीसह प्रमुख स्थानांवर परिणाम झाला. शंभू आणि खनौरी सीमेवरही आंदोलने सुरूच आहेत. शेतकरी नेते जगजित सिंग डल्लेवाल उपोषण करत आहेत.

एमएसपीवर कायदेशीर हमी, कर्जमाफी, शेतकऱ्यांना पेन्शन, पोलिस खटले मागे घेणे आणि मागील आंदोलनातील पीडितांना भरपाई या मागण्यांचा समावेश आहे.

शेतकऱ्यांच्या 'रेल रोको' आंदोलनामुळे, पंजाबमधील विविध स्थानकांवर अनेक गाड्या थांबवण्यात आल्या आहेत, काही गाड्या अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत.


**जाहीर नोटीस**

**उपविभागीय दंडाधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय**

७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे ४११००१

दुरध्वनी क्र. ०२०-२६३३०८३२ Email-sdopune@gmail.com

क्र. मृत्यु रजि./ एसआर / ५७/२०२४

१) श्री. भानुदास बाळू जगताप, अर्जदार
रा. उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे

**विरुध्द**

१) जन्म - मृत्यु नोंदणी अधिकारी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत, उरुळी कांचन, ता. हवेली, जि.पुणे
२) पंचायत समिती हवेली जाबदेणार

**विषय :- जन्म - मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम २०२३** नुसार जाहीर नोटिस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. भानुदास बाळू जगताप, रा. उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे यांनी त्यांचे आजी कै. ताईबाई आबू जगताप यांचा मृत्यू दि.१०/०७/१९६३ रोजी मौजे उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे येथे झाला आहे. त्यांचे मृत्युची नोंदणीचा हुकूम मिळण्याकरीता या न्यायालयात जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम ११ (३) प्रमाणे मृत्यु नोंदणी आदेश मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या कागदपत्रांसह आपले म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करणेत येईल याची नोंद घ्यावी. सदरची जाहीर नोटिस आज दि. ११/१२/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण - पुणे
दिनांकः- ११/१२/२०२४

**(डॉ. यशवंत माने)**
उपविभागीय दंडाधिकारी, हवेली
उपविभाग पुणे


### दोघे जण अद्यापही बेपत्ताच, १३ जणांचा मृत्यू

# महाराष्ट्रात बोटींच्या अपघातांची मालिका कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** नौदलाच्या बोटीच्या अपघातानंतर अद्याप दोघेजण बेपत्ता आहेत. नौदल आणि तटरक्षक दलाच्या मदतीनं शोधमोहीम सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ४३ वर्षीय हंसराज भाटी आणि सात वर्षीय जोहान मोहम्मद निसार अहमद पठाण अशी बेपत्ता झालेल्या दोघांची नावे आहेत. बोट अपघातात दोन्ही बोटीतील ११३ जणांपैकी १३ जणांचा मृत्यू झाला. तर दोन जखमींसह ९८ जणांना वाचवण्यात यश आले.

बुधवारी दुपारी गेटवे ऑफ इंडियावरून एलिफंटा बेटावर १०० हून अधिक प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या 'नील कमल' या बोटीचा अपघात झाला. नौदलाच्या क्राफ्टने धडक दिल्यानं नौदलाचा एक कर्मचारी आणि दोन कंत्राटी नौदल कर्मचाऱ्यांसह १३ जणांचा मृत्यू झाला. मुंबईच्या आजूबाजूच्या सर्वात भीषण सागरी आपत्तींपैकी एकामध्ये, १३ लोकांचा मृत्यू झाला होता, तर आणखी १०५ जणांना वाचवण्यात आले होते, जेव्हा 'नीलकमल' ही गेटवे ऑफ इंडिया येथून प्रसिद्ध युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळातील एलिफंटा बेटांकडे जात होती. तेव्हा अपघात झाला.

यापूर्वीदेखील महाराष्ट्रात बोटीचे भीषण अपघात झाले आहेत. २१ मे २०२४ : महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील भीमा नदीवरील उजनी धरणाच्या बॅक वॉटरमध्ये ७ जणांना घेऊन जाणारी बोट खराब हवामानामुळे उलटली. या दुर्घटनेत २२ मे रोजी ५ व्यक्तींचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. १४ सप्टेंबर २०२१ : अमरावतीत नदीत बोट उलटून तीन जणांपेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला. १४ मार्च २०२०: महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील मांडवा समुद्रकिनाऱ्यावर कोसळलेल्या बोटीतील सर्व ७८ प्रवाशांची सुटका करण्यात आली.

११ ऑगस्ट २०१९: सांगली जिल्ह्यात बोट उलटून झालेल्या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला. १६ जानेवारी २०१९: महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यात नर्मदा नदीत बोट उलटल्याच्या घटनेत सात जणांचा मृत्यू झाला. २४ ऑक्टोबर २०१८: मुंबईजवळील अरबी समुद्रातील प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या कामाची पाहणीला जात असताना सुमारे २५ जणांना घेऊन जाणारी स्पीड बोट पाण्याखालील खडकावर आदळली. यात एकाचा मृत्यू झाला. तर दोन जण जखमी झाले.

१३ जानेवारी २०१८ : मुंबईपासून सुमारे १३५ किमी अंतरावर पारनाका बीचजवळ डहाणूच्या किनाऱ्यावर ४० शालेय विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी बोट उलटली. यात ३ जणांचा मृत्यू झाला.

#रा


**डॉ. विकास खरात उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२) व ३ नुसार जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्युची नोंद कारणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने **अर्जदार सिताराम सोनु पवार रा.आशिंपी पो. शिरगांव ता. भोर जि. पुणे** यांनी या कार्यालयाकडे जन्म- मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३(३) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार आर्जदार यांचा **स्वतःचा जन्म मौजे. आशिंपी ता. भोर जि.पुणे येथे दि.१५/०५/१९६६ रोजी** झालेचे नमूद करुन सदर जन्माची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म मृत्यु नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल.

आज दि. १९/१२/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.

क्र. फौज/जन्म/एस. आर/१५०८/२०२४
**दिनांक :-** १९/१२/२०२४
**ठिकाण :-** भोर

शिक्का

**सही**
**(डॉ. विकास खरात)**
उपविभागीय अधिकारी तथा
दंडाधिकारी भोर उपविभाग भोर

## पुणे जिपच्या आरोग्य केंद्रातील कामगार कर्जबाजारी : कुटूंबावर उपासमारीची वेळ

# कंत्राटी रुग्णवाहिका चालकांना दहा महिन्यांपासून पगार मिळेना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

**नीरा :** पुणे जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यातील ९६ प्राथमिक आरोग्य केंद्रांवर अत्यावश्यक सेवेतील रुग्णवाहिका सेवा पुरविणाऱ्या कंत्राटी चालक व आरोग्य केंद्राच्या साफ - सफाई कामगारांवर गेल्या दहा महिन्यांपासून पगारच मिळेना. त्यामुळे कंत्राटी कामगार मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले असून, कर्जबाजारी झाले आहेत. परिणामी, कंत्राटी कामगारांचे कुटुंब उपासमारीला सामोरे जाऊ लागले आहेत.त्यामुळे कामगारांमध्ये निराशेचे वातावरण आहे. दरम्यान, शासनाकडूनच अत्यावश्यक सेवा पुरविणा-या जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला अनुदान मिळत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

पुणे जिल्ह्यातील ग्रामिण भागात नवजात शिशू, बाळंतीण महिला, गरोदर मातांची तपासणी, ऑपरेशन शिबिरासाठी येणाऱ्या महिलांना ने - आण करणे,तसेच सर्पदंश सारख्या रूग्णांसह दर महिन्याला आरोग्य केंद्रात औषधे व लस आणणे आदी अत्यावश्यक सेवा १०२ क्रमांकाच्या रूग्णवाहिके मार्फत देण्यात येतात. ही सेवा पुरविताना रुग्णवाहिका चालक महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असतात. मात्र त्यांच्याच पगाराचा प्रश्न निर्माण झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.



पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने सुमारे दोन वर्षांपासून शारदा सर्व्हिसेस या सेवा देणा-या कंपनीला रूग्णवाहिका चालक व सफाई कामगार पुरविण्याचे कंत्राट दिले असल्याचे समजते. या कंत्राटदाराच्या माध्यमातून पुरंदर तालुक्यातील नीरा, वाल्हे, परिंचे, बेलसर, माळशिरस या आरोग्य केंद्रांसह जिल्ह्यातील ९६ आरोग्य केंद्रात कंत्राटी रूग्णवाहिका चालक व सफाई कामगार सेवा देत आहेत.

> आम्ही दहा हजार पाचशे रूपयांच्या तुटपुंज्या पगारावर रूग्णवाहिका चालक म्हणून रूग्णांना अत्यावश्यक सेवा देत आहोत. मात्र, गेल्या दहा महिन्यांपासून आम्हांला पगार मिळला नाही. आम्ही कर्ज काढून आमचा प्रपंच चालवित आहे. त्याचा व्याजाचा भुर्दंड वाढत चालला आहे. आमच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे, तर आमच्या हक्काचा पी.एफ. व ई.एस.आय देखील दीड वर्षापासून कंत्राटदाराने भरला नाही."
>
> — **सचिन ननवरे,** रूग्णवाहिका चालक, नीरा प्राथमिक आरोग्य केंद्र

मात्र, एक वर्षापासून शारदा सर्व्हिसेस या कंपनीकडून कंत्राटी कामगारांना वेळेवर पगार मिळत नाही. गेल्या दीड वर्षापासून या कामगारांचे पीएफ व ईएसआय भरला गेला नसल्याची धक्कादायक माहिती पुढे आली. मार्च - एप्रिल या महिन्यांपासून या कंत्राटी कामगारांना पगार मिळाला नाही. रूग्णवाहिका चालकांना त्यांच्या सेवेच्या तुलनेत अवघे दहा हजार पाचशे रुपये एवढे कमी मानधन दिले जाते. तेही वेळेवर मिळत नाही. हे कामगार सध्या व्याजाने पैसे घेऊन आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. त्यामुळे ते कर्जबाजारी झाल्याने कामगारांच्या कुटुंब उपासमारीला सामोरे जाऊ लागले आहे.

याबाबत कंत्राटदार म्हणाले की, ऑक्टोंबर २०२३ पासून मला जिल्हा परिषदेकडून बिल मिळाले नाही. माझ्या जवळील रक्कमेतून कंत्राटी कामगारांचे मार्च पर्यंतचे पगार अदा केले आहेत. जिल्हा परिषदेकडे सतत पाठपुरावा करीत असून जि.प. प्रशासन निधी नसल्याचे सांगण्यात येत आहे.

### निधी मिळाल्यावरच बिले मिळतील

● पुणे जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांची बिले वेळोवेळी राज्य शासनाकडे पाठविलेली आहेत. राज्य शासनाकडून अनुदान मिळाले नसल्याने, कंत्राटदारांची बिले रखडलेली आहेत. तसेच, सध्या राज्याच्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सरकारने नुकतेच पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत. अधिवेशन समाप्तीनंतर पुणे जि.प.ला अनुदान मिळेल, अशी आशा आहे. त्यानंतर कंत्राटदारांची बिले अदा होतील, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या सुत्रांनी दिली.

## उंची कमी असल्याने त्या पुलाखालून प्रवास करताना अडथळा; रस्ता सुरळीत करण्याची मागणी

# आंबेगाव तालुक्यातील हा पूल ठरतोय अडचणीचा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** काठापूर बुद्रुक (ता.आंबेगाव) येथील वैदवाडी फाटा ते पोंदेवाडी या रस्त्यावर काठापुर गावच्या हद्दीत असणा-या कालव्याच्या पूलाची उंची कमी असल्याने त्या पुलाखालून प्रवास करताना अडथळा येत आहे. विशेष म्हणजे पुल हा बरीच वर्ष बंद आहे. कालव्यावरील पूल काढून रस्ता सुरळीत करावा अशी मागणी प्रवासी वाहनचालक व ग्रामस्थांकडून होत आहे.



काठापुर बुद्रुक गावच्या हद्दीमधुन अवसरी फाटा-अवसरी -मेंगडेवाडी-जारकरवाडी फाटा-वैदवाडी फाटा तिथून पुढे पोंदेवाडी व काठापूर किंवा अष्टविनायक महामार्गाला येण्यासाठी रस्ता आहे. सदर रस्ता पूर्वी छोटा होता. परंतु मागील वर्षे भरात महिन्यांपूर्वी या ठिकाणी रुंद व मोठा रस्ता झाला आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहनांची ये-जा होत असते. निरगुडसर, पारगाव मार्गे मंचरला जाण्यासाठी शिरूर कडून येणारे अनेक वाहने गर्दीचा रस्ता टाळण्यासाठी, शिरूर वरून अष्टविनायक महामार्गाने आल्यानंतर, काठापूर गावच्या हद्दीत हनुमान चौक पोंदेवाडी फाटा या ठिकाणावरून वळन घेऊन नवीन रुंदीकरण झालेल्या रस्त्याचा वापर करतात. हा रस्ता वैदवाडी वरून मंचरकडे येत असतात. या रस्त्याचा वापर मोठ्या प्रमाणावर सध्या होऊ लागला आहे. गुगल मॅपवर सुद्धा हा रस्ता अनेक वाहनांना दिशादर्शक ठरतो. त्यामुळे अनेक वाहनचालक मोबाईलवर गुगल मॅपमध्ये दाखवलेल्या रस्त्याचा वापर करून जवळचा रस्ता म्हणून या रस्त्याचा वापर करतात. परंतु काठापुर बुद्रुक गावच्या हद्दीमध्ये गणेशवस्ती या ठिकाणी डिंभे उजव्या कालव्याच्या पारगाव वितरिकेला काठापूर गावासाठी एक वितरिका काढण्यात आलेले आहे. ही वितरिका करत असताना जमिनीच्या वरून पुल करून पाणी नेलेले आहे. गेल्या काही वर्षांपूर्वी या वितरीकेचे काम केलेले आहे. पूर्वी या रस्त्यावर वर्दळ कमी होती. त्यामुळे या वितरीकेच्या पुलाखालून अनेक वाहने येजा करायची. परंतु सध्या वाहतूक वाढल्याने अनेक मोठी वाहने या रस्त्याचा वापर करतात.हा वापर करत असताना उंच सामान भरलेली वाहने या पुलाला ठोकरतात आणि त्यामुळे अपघाताची शक्यताही वाढली आहे.

सदर वितरीकेला गेल्या कित्येक वर्षात अजूनही पाणी आलेले नाही. त्यामुळे सदर वितरिकेचा उपयोग काठापुर गावच्या शेतकऱ्यांना होत नाही. त्यामुळे हा पूल असून अडचण झाली आहे. त्यामुळे सदर वितरिकेचा पुल काढून टाकावा, अशी मागणी काठापूर ग्रामस्थ व वाहतूक करणारे अनेक वाहनचालक करत आहेत. प्रशासनाने यावर योग्य तो मार्ग काढून सदर वितरीके वरील पूल काढून टाकावा, अशी मागणी जोर धरत आहे.

## Selected

### कडाक्याच्या थंडीमुळे ग्रामीण भागापेटू लागल्या शेकोट्या



**आंबेगाव :** गेल्या काही दिवसांपासून कडाक्याची थंडी पडत असून आंबेगावसह ग्रामीण भागात लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिक पहाटे व रात्री पाला पाचोळा, लाकडे, टाकाऊ कागद, पुठ्ठे आदींचा वापर करून शेकोट्या पेटवून ऊब घेत गप्पा गोष्टी करताना दिसत आहेत. मोबाइलमध्ये अडकलेली आजची पिढी शेकोटीच्या निमित्ताने घराबाहेर पडताना दिसते. शेकोटीतून एकमेकांशी संवाद साधला जात असून व शेकोटीची हवीहवीशी ऊब घेताना ते दिसत आहेत.

गेल्या काही दिवसंपासून गारवा चांगलाच वाढला असून उबदार कपडे नागरिक परिधान करत आहेत.तसेच शहरी भागात इमातींमधील फरश्या थंडीने गार पडत असल्याने त्यावरून चालण्यासाठी नागरिक पाया मध्ये सॉक्स परिधान करताना दिसून येत आहेत.सकाळी व रात्री कामा निमित्त बाहेर पडणारा कर्मचारी वर्ग तसेच शहरातील ग्रामीण भागातील नागरिक सुद्धा पूर्णपणे उबदार कपड्यांचा वापर करूनच बाहेर पडत आहे तर काही सकाळी सूर्याच्या किरणांमध्ये उभे राहत आहेत.

## अनुयायांची गैरसोय न होण्यासाठी सर्व विभाग कार्यान्वित

# सोशल मीडियावर पोलिसांची करडी नजर - प्रशांत ढोले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा येथे ऐतिहासीक विजयस्तंभ मानवंदना व अभिवादन कार्यक्रम शांततेत पार पाडत गावामध्ये सामाजीक सलोखा निर्माण करण्यासाठी व येणाऱ्या अनुयायांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होऊ नये यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून स्थानीकांवरील गुन्हे मागे घेण्यासाठी वरीष्ठांकडे याबाबत पाठपुरावा करु असे सांगत सोशल मीडियावर वादग्रस्त मेसेज टाकणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर असल्याचे शिरूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांनी सांगितले.



● कोरेगाव भीमा येथील ग्रामस्थांशी संवाद साधताना उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले व आदी

कोरेगाव भीमा येथे ऐतिहासीक विजयस्तंभ मानवंदना व अभिवादन कार्यक्रमासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांची बैठक पार पडली. याप्रसंगी शिक्रापुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक दिपरतन गायकवाड, सहाय्यक पोलीस निरिक्षक संदिप साळूंखे, सरपंच संदीप ढेरंगे, शिवसेनेचे अनिल काशीद, अण्णासाहेब मगर बँकेचे संचालक राजाराम ढेरंगे, सोसायटीचे अध्यक्ष अशोक गव्हाणे, माजी सरपंच अमोल गव्हाणे, नवनाथ माळी, माजी उपसरपंच गणेश कांबळे, सदस्य केशव फडतरे , माजी अध्यक्ष बबुशा ढेरंगे, माजी सदस्य उमेश गव्हाणे, कुंदा फडतरे, मीना ढेरंगे, विवेक ढेरंगे, राजेंद्र गवदे, अमीर इनामदार, राजेशसिंह ढेरंगे, सचीतानंद कडलक, दीक्षांत भालेराव, प्रवीण खलसे, ग्रामविकास अधिकारी श्रीकांत वाव्हळ, पोलीस पाटील मालन गव्हाणे, संदिप कारंडे यांसह ग्रामस्थ व नागरीक उपस्थित होते.

अनुयायांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन केले असून, बसेसची संख्या व वाहनतळाच्या जागा वाढविण्यात आल्या आहे. भीमा नदीवरील पुलावर बांधकाम विभागाकडून संरक्षक जाळी बसवल्या जातील. मात्र, सोशल मीडिया वर चुकीचे मेसेज न टाकण्याचे आवाहन प्रशांत ढोले यांनी केले.

### नाव कोरेगावचे अन निधी पेरणेला?

● १ जानेवारी पासून कोरेगाव भीमा गावची सामाजीक व आर्थिक हानी झाली असुनही गावच्या सर्व समाजाच्या वतीने सामाजीक सलोखा अबाधीत राहावा यासाठी प्रयत्न चालुच राहणार आहे मात्र प्रशासनाने गावासाठी भीमानदीवर संरक्षक घाट, रस्ते, विद्युत दिवे व इतर भौतीक सुविधा निर्माण करण्यासाठी गेल्या सहा वर्षात एक रुपयाही निधी दिला नाही तर या उलट पेरणे ग्रामपंचायतीला मोठा निधी देत आहात हा कोणता न्याय आहे असा सवाल उपस्थित करुन स्थानीक तरुणांवरील गुन्हे मागे घेण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची मागणी यावेळी ग्रामस्थांनी केली.

## ग्रामसेवकांचा 'असहकार';

**खेड :** जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी युनियम पुणे यांच्या आदेशानुसार राज्य सरकारने प्रलंबीत मागण्याबाबत लक्ष वेधण्यासाठी राज्यभरातुन ग्रामसेवकांनी १७ डिसेंबर पासुन वरीष्ठ अधिकारी प्रशासनाला माहिती देण्याबाबत असहकार आंदोलन सुरु केले आहे. शासनाने याची दखल न घेतल्यास, येत्या २३ तारखेपासून आंदोलन सुरू करुन कामकाज बंद ठेवण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

ग्रामसेवक तथा ग्रामपंचायत अधिकारी यांच्या प्रलंबित मागण्यामध्ये अश्वाशीत प्रगती योजनांतर्गत लाभ देणे, आदिवासी भागात काम करणा-या ग्रामपंचायत अधिका-यांना एक स्तर वेतन श्रेणी देणेबाबत आदि सर्व जिल्हा स्तरावरील न्याय मागण्या मान्य होण्यासाठी असहकार आंदोलन सुरु करण्यात आले आहे.

## श्री सद्गुरु साधुबाबा महाराज समाधी सोहळ्या निमित्त पुरस्कार प्रदान



**जेजुरी :** पुरंदर तालुक्यातील तीर्थक्षेत्र भिवडी येथे सद्गुरु साधुबाबा महाराज यांच्या समाधी सोहळ्या निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यात विविध क्षेत्रात सामाजासाठी उल्लेखनीय कार्य व दानशूर असलेल्या व्यक्ती व संस्था यांना कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष तात्यासाहेब भिंताडे, शालन भिंताडे व बाळासाहेब पोकळे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किर्तन केसरी व ब्रह्म सांप्रदाय संस्थेचे अध्यक्ष ह भ प राजेंद्र महाराज येप्रे हे होते.

तीर्थक्षेत्र भिवडी येथे सद्गुरू साधूबाबा यांच्या 51 व्या समाधी सोहळ्या निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व गाथा परायाणाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात रोहिनी लोखंडे यांना आदर्श शिक्षक तर पंडित रविंद्र बबनराव यादव यांना स्वर पुरंदर, यशोदा कृष्णाजी चरवड यांना आदर्श माता, पांडुरंग आबा दातार मृदूंग महर्षी यांना पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. ब्रह्म सांप्रदाय संस्थेचे उपाध्यक्ष वैभव महाराज राज शिर्के, खजिनदार सतिश मांढरे , सचिव घनश्याम केरबा थोरात, कार्याध्यक्ष माऊली निंबाळकर, यांनी पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सतिश मांढरे यांनी केले. सूत्रसंचालन आशिष उत्तम धावडे यांनी केले. तर आभार सचिव घनश्याम थोरात यांनी फमानले.

# इतरांच्या भल्याचा विचार ही संतपरंपरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** सर्वांना बरोबर घेऊन स्वतःपेक्षा इतरांच्या भल्याचा विचार करणे, ही महाराष्ट्राच्या थोर संतांची शिकवण आहे. ती परंपरा कायम राहावी यासाठी अखंड हरिनाम सप्ताह, धार्मिक, आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन मोठया स्वरूपात होणे गरजेचे आहे. या सामाजिक सोहळ्यांना अलीकडे खर्चिक किंवा दिखाऊपण आले आहे. मात्र, तेवढा समाज यामध्ये सहभागी होत नाही. कीर्तनकार, प्रवचनकार यांनी प्रबोधनाचा तोच तो पणा बदलला पाहिजे.



संत तुकाराम महाराज, ज्ञानेश्र्वर महाराजांनी घालुन दिलेल्या नियमात पण बदलत्या परिस्थितीत जनतेला अध्यात्मिक मार्गदर्शन केले पाहिजे, असे प्रतिपादन हभप पोपट महाराज राक्षे यांनी केले.

राजगुरुनगर येथील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण मंडळ आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता हभप पोपट महाराज राक्षे यांच्या काल्याच्या कीर्तन सेवेने गुरुवारी (दि १९) झाली. अखंड हरिनाम सप्ताहाचे हे ४६ वे वर्ष साजरे करण्यात आले. राजगुरुनगर येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर गेले सात दिवस हा अखंड हरिनाम सप्ताह सुरू होता.

# विवाह नोंदणी प्रमाणपत्र डिजिटल देण्याची सुविधा द्यावी- संजय थोरात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** मंचर शहरातील नागरिकांच्या समस्यांसंदर्भात भाजप नेते संजय थोरात यांनी मंचरच्या उपजिल्हा रुग्णालयाला निवेदन दिले आहे. विवाह नोंदणी प्रमाणपत्र डिजिटल देण्याची सुविधा सुरू करावी, अशी मागणी थोरात यांनी केली आहे. उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाला मंचर शहरातील नागरिकांच्या अडीअडचणींसंदर्भात निवेदन देण्यात आले.

निवेदनात असे म्हटले आहे की, उपजिल्हा रुग्णालयाच्या माध्यमातून गेले एक वर्षापासून विवाह नोंदणी प्रमाणपत्र डिजिटल मिळणे हे बंद झाले आहे. आंबेगाव तालुक्यातील इतर ठिकाणी डिजिटल प्रमाणपत्र मिळत आहे; परंतु उपजिल्हा रुग्णालय मंचर या ठिकाणी ही सुविधा चालू नाही. तरी ही सुविधा आपण लवकरात लवकर चालू करावी, कारण मंचर शहरातील नागरिकांना ही सुविधा बंद असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण होत आहे. यासंदर्भात मंचर शहरातील जरीफ जफर शेख यांनी भाजप जनसंपर्क कार्यालयात एक तक्रार अर्ज दिला आहे. त्याअनुषंगाने विनंती करण्यात आली आहे की, ती सुविधा लवकरात लवकर चालू करावी व नागरिकांना याचा लाभ मिळावा. कारण, मंचर शहरामध्ये अनेक नागरिक आहेत, ज्यांना ही सुविधा बंद असल्यामुळे अन्य समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आंबेगाव तालुक्यातील इतर ठिकाणी ही सुविधा चालू आहे. मंचर उपजिल्हा रुग्णालयात ही सुविधा बंद का आहे, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या वक्तव्याचा निषेध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** संसदेचे हिवाळी अधिवेशन चालू असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी 'आंबेडकर आंबेडकर नावाचा जप करण्यापेक्षा एवढ्या जर देवाच्या नावाचा जप केला तर स्वर्गात जागा मिळेल,' अशा पद्धतीचे बेताल वक्तव्य केले. या वक्तव्याने आंबेडकरी समाजाच्या भावना दुखावल्या असून, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान करणाऱ्या वक्तव्याचा स्वाभिमानी रिपब्लिकन महासभेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला.



स्वाभिमानी रिपब्लिकन महासभेचे प्रदेशाध्यक्ष हरेशभाई देखणे व सहकाऱ्यांनी प्रांताधिकारी अनिल दौंडे यांना निवेदन दिले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्वरित माफी मागावी अन्यथा महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा स्वाभिमानी रिपब्लिकन महासभेचे प्रदेशाध्यक्ष हरेशभाई देखणे यांनी राजगुरुनगर येथे दिला. महासभेच्या वतीने खेडचे प्रांताधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार ज्योती देवरे, विभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे, पोलिस निरिक्षक प्रभाकर मोरे यांना निषेधाचे निवेदन देण्यात आले. महासभेचे तुषार गायकवाड, विकास शिंदे, किशोर भालेराव, सोनू काळे, आकाश डोळस,अनिल जाधव, नामदेव वाकचौरे व इतर यावेळी उपस्थित होते.

## मुख्याधिकारी केंद्रे यांना नागरिकांचे साकडे

# आळंदीत पाणी नियमित पुरेशा दाबाने पुरवठा करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** आळंदी नगरपरिषद प्रभाग क्रमांक ७ ते ९ या परिसरातील रहिवासी नागरिक यांना पिण्याचे पाणी नियमित, पुरेशा दाबाने पुरवठा करण्याची मागणी करण्यात आली आहे. या पुढील काळात सुरळीत पाणी पुरवठा व्हावा. अन्यथा, या मागणीस सनदशीर मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि यास आळंदी नगरपरिषद प्रशासन जबाबदार राहील, असा खणखणीत इशारा माजी नगरसेवक दिनेश घुले यांनी दिला आहे.



आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांना निवेदन देऊन घुले यांनी प्रशासनाचे लक्ष वेधत साकडे घातले आहे. आळंदीत नियमित उच्च दाबाने पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याने तसेच अनियमित आणि झोन निहाय होणं-या पाणी पुरवठ्यावर महिला, नागरिकांत प्रचंड नाराजी आहे. यामुळे महिला वर्ग हैराण झाला आहे. आळंदीत सध्या दोन दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. मात्र, यातून नागरिक समाधानी नाही. होणारा पाणी पुरवठा हा अनियमित, कमी दाबाणे अपुरा होत आहे. तसेच वेगवेगळ्या कामा निमित्त अधिकचा पाणी पुरवठा बंद राहत असल्याने अनेकांना कधी कधी तीन ते चार दिवसांनी पाणी मिळते. आळंदीत पाणी पुरवठ्याचे कामकाजावर नागरिकांचा रोष आहे. नागरिकांचे घरी पाणी साठवण यंत्रणा नसल्याने अनेकांना पाणी पुरवठ्याचे नियोजन अभावी गैरसोय होत आहे. यामुळे पाणी पुरवठा विभागावर नागरिक नाराजी व्यक्त करीत आहे. स्थानिक संस्थेचे प्रमुख या नात्याने पर्यायी जबाबदारी आपणावर येत असून नियमित पुरेशा प्रमाणात उच्चं दाबाने पाणी पुरवठा प्रभाग क्रमांक ७. ८ व ९ या भागात मिळावा. यासाठी निवेदन देण्यात आल्याचे घुले यांनी सांगितले. नगरपरिषदेने जाहीर केलेल्या झोन प्रमाणे तसेच आता झोन ला देखील रोटेशनने पाणी पुरवठा करण्याची मागणी जोर धरत आहे.

आळंदीत रात्री अपरात्री होणारा पाणी पुरवठा यामुळे देखील महिला वर्ग नाराजी व्यक्त करीत आहे. रात्री उशिरा पाणी येत असल्याने सकाळी कामावर जाण्यास देखील धावपळ करावी लागते. यातून आळंदीत प्रचंड नाराजी आहे. झोन निहाय दिलेल्या वेळेत पाणी पुरवठा व्हावा. रात्री अपरात्री होणारा पाणी पुरवठा बंद व्हावा. शक्यतो रात्री दहा वाजे पर्यंत संपूर्ण आळंदीत पाणी पुरवठा पूर्ण होईल असे तात्काळ नियोजन करण्यात यावे. किमान दोन तास पाणी पुरवठा नियमित व्हावा अशी मागणी करीत अपुऱ्या दाबाने होणारा पाणी पुरवठा उच्चं दाबाने होण्यासाठी तात्काळ उपाय योजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. आळंदीत या पुढील काळात सुरळीत पाणी पुरवठा व्हावा. अन्यथा या मागणीस सनदशीर मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल. यास नगरपरिषद प्रशासन जबाबदार राहील असा खणखणीत इशारा घुले यांनी प्रशासनास दिला आहे.

#रा

### प्रवेश मंदिराजवळील राजिक देवी मुखवटा अर्पण सोहळा संपन्न

# श्रीनाथ म्हस्कोबा मंदिराला चांदीची महिरप अर्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड :** लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या काशीखंडाच्या काळभैरवाचे अवतार असलेल्या श्रीनाथ म्हस्कोबा महाराज व आई जोगेश्वरी, श्री क्षेत्र वीर मंदिराला रविवारी समस्त कैकाडी समाज बांधवाच्या देणगीतून दर्शनी भागात चांदीची चौकट, महिरप तसेच श्रीनाथ म्हकोबा देवस्थान ट्रस्ट मार्फत समस्त भाविकांच्या देणगीतून राजिकदेवी मंदिराच्या चांदीच्या मुखवटा, पादुका यांचा विधिवत अर्पण सोहळा मोठ्या उत्साहात समस्त सालकरी, मानकरी, दागीनदार, विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात पार पडला.

श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी (देवाची आळंदी) चे विश्वस्त योगी निरंजननाथ महाराज मार्गदर्शनाखाली विधिवत अर्पण सोहळा, "भैरवचंडी याग" आयोजन करून विधिवत संपन्न झाल्याचे उपाध्यक्ष अमोल धुमाळ यांनी सांगितले.

आज श्रीनाथ म्हस्कोबा क्षेत्र वीर मंदिराला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. देवस्थान ट्रस्टमार्फत श्रीनाथ म्हस्कोबा व आई जोगेश्वरी यांना पोशाख व सुवर्ण अलंकार साज करण्यात आला. सकाळी ११ वाजता पूजन व अर्पण झाल्यावर फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. यावेळी मंदिरात गर्दी झाली होती. श्रीनाथ ,म्हस्कोबा देवस्थान ट्रस्त वीर यांचेमार्फत समस्त देणगीदार कैकाडी समाज याच्या देणगीदारांचा यथोचित सन्मान करण्यात आल्याचे चेअरमन राजेंद्रबापू धुमाळ यांनी सांगितले.

# जेजुरीच्या मंदिरासाठी श्री स्वामींची पंचधातूची मूर्ती अर्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या पायथ्याशी व ऐतिहासिक होळकर तलावा काठी श्री स्वामीमय सेवा ट्रस्टच्या वतीने श्री स्वामी समर्थांचां मठ उभारण्यात आला असून येथील मंदिरासाठी उद्योजक व स्वामी भक्त उमेश दराडे यांनी पंचधातूची श्री स्वामींची मूर्ती अर्पण केली असून लवकरच या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना सोहळा होणार असल्याचे सेवामय ट्रस्टचे अध्यक्ष भगवान डिखळे यांनी सांगितले.

श्री स्वामीमय सेवा ट्रस्टच्या माध्यमातून जेजुरी ते अक्कलकोट स्वामींच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दत्तजयंती दिवशी हा सोहळा अक्कलकोट येथे पोहचला येथील खंडोबा मंदिरामध्ये गुरुवर्य अण्णूमहाराज पुजारी, महेश पुजारी, आदित्य पुजारी, व समाधी मठा मधील सर्व पुजारी सेवक वर्गाच्या वतीने सोहळ्याचे स्वागत करून पूजा अभिषेक महाआरती करण्यात आली. अक्कलकोट शहरातून सोहळ्याची मिरवणूक काढून भंडाराची उधळण करण्यात आली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष भगवान डिखळे, उपाध्यक्ष माऊली खोमणे, कार्याध्यक्ष गणेश मोरे, गुरुवर्य अण्णूमहाराज पुजारी उपस्थित होते. येथील धार्मिक विधी नंतर स्वामींचा पालखी सोहळा जेजुरी कडे रवाना झाला.

या सोहळ्याचे आयोजन श्री स्वामीमय सेवा ट्रस्टचे अध्यक्ष भगवान डिखळे, श्री माऊली खोमणे, गणेश मोरे, संदीप गायकवाड, ज्ञानेश्वर मोरे, नितीन कदम, सचिन खोमणे, कबीर मोरे, प्रवीण हेंद्रे, संतोष मोरे, अमोल नाकाडे; रविकाका खोमणे, संजिवन बोडरे, सदा शिंदे, सुंदर खोमणे, समर्थ डिखळे , समर्थ खोमणे, ओंकार धुमाळ, ओंकार जावळे, आदींनी या सोहळ्याचे आयोजन केले होते.

## श्री स्वामी समर्थ

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**जेजुरी :** श्री स्वामीमय सेवा ट्रस्टच्या वतीने श्री स्वामी समर्थांचां मठ उभारण्यात आला असून येथील मंदिरासाठी उद्योजक व स्वामी भक्त उमेश दराडे यांनी पंचधातूची श्री स्वामींची मूर्ती अर्पण केली

# पै विजय बीचकुले बांदलवाडी केसरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जन्मभूमी असलेल्या पुरंदर किल्ल्याच्या कुशीत आणि सावलीत वसलेल्या बांदलवाडी येथे गुरुदत्त तरुण मंडळाच्या वतीने आयोजित कुस्तीच्या आखाड्यात पुणे येथील खाशाबा गायकवाड कुस्ती संकुलाचा पैलवान विजय बीचकुले याने एक तास कुस्ती खेळून बांदल वाडी केसरीचा बहुमान पटकाविला. पुरंदर तालुक्यातील बांदल वाडी येथे गेली ५१ वर्ष अविरतपणे अखंड हरिनाम सप्ताह व यात्रेचे आयोजन केले जाते. यावर्षी पहिल्यांदाच कुस्त्यांच्या आखाद्याचे आयोजन करण्यात आले होते.



पुरंदर तालुक्यातील बांदलवाडी कुस्त्याच्या आखाड्यात पै. विजय बीचकुले याने बांदलवाडी केसरीचा किताब पटकाविला.

या कुस्त्यांच्या आखाड्यात ८० नामांकित पहिलवानांनी सहभाग नोंदवला होता. तबांदलवाडी केसरी च्या किताबासाठी पै. विजय बिचुकले ( खाशाबा गायकवाड कुस्ती संकुल पुणे ) विरुद्ध पै. सोमनाथ डोंबाळे ( मामासाहेब मोहोळ तालीम पुणे ) यांच्यामध्ये अतिशय थरारक व रंजक असा जवळ जवळ १ तास हा सामना रंगला. नंतर उत्सव कमिटी चा निर्णय मान्य करून दोन्ही पहिलवानांनी आपला मनाचा मोठेपणा दाखवत हा सामना गुणांवर खेळण्यास होकार दिला . या कुस्तीत पै. विजय बिचुकले "बांदलवाडी केसरी" चा 'प्रथम' मानकरी ठरला. विजेत्यास रोख रक्कम व मानाची गदा आणि उप विजेत्यास रोख रक्कम व सन्मान चिंन्ह देऊन ग्रामस्थांकडुन गौरवण्यात आले.

या आखाड्याला पै. रामा गोळे (बाजारवाडी भोर) यांनी उअसे निवेदन केले. सातारा येथील अंबाजी लिंबाजी हलगी ग्रुप यांनी आखाड्याची रंगत वाढवली. या आखाड्याचे आयोजन गणेश सूर्गुडे, विजय पेटकर, विशाल जाधव, अमोल जाधव, कमलेश जाधव, तुषार पेटकर, सागर जाधव आणि गुरुदत्त तरुण मंडळ, बांदलवाडी ग्रामस्थांनी केले.

# ऊस वाहतूकदार वाहनांना रिफ्लेक्टरचे वाटप



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** बारामती तालुक्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यात मंगळवारी (दि. १७) रस्ता सुरक्षा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रिफ्लेक्टर व परावर्तीत पड्यांचे वाटप कारखान्याचे संचालक व उपप्रादेशिक परिवहन अधिका-यांच्या हस्ते करण्यात आले.

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यात उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांच्या मार्गदर्शनानुसार रस्ता सुरक्षा कार्यक्रमांतर्गत ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाडी, ट्रक, ट्रॅक्टर, हार्वेस्टर या वाहनांना रिफ्लेक्टर व परावर्तीत पड्यांचे वाटप कारखान्याच्या केनयार्ड परिसरात मंगळवारी (दि.१७) करण्यात आले. बारामतीचे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोटर वाहन निरीक्षक बजरंग कोरवले, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक प्रियांका सस्ते, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक हेमलता तावरे, कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब कामथे व उपस्थित संचालकांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले.

यावेळी बारामतीचे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोटर वाहन निरीक्षक बजरंग कोरवले म्हणाले की, वाहनचालक व मालक यांनी कर्कश व मोठ्या आवाजात ट्रॅक्टरवर गाणी लावून ऊस वाहतूक करु नये. आपल्या वाहनांना जे रिफ्लेक्टर देण्यात आलेले आहेत ते लावणे बंधनकारक आहे. मद्यपान करुन वाहने चालवू नयेत व वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई केली जाईल.

कारखान्याचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक राजवर्धन शिंदे, संचालक संग्राम सोरटे, अभिजीत काकडे,लक्ष्मण गोफणे,किसन तांबे,रणजीत मोरे, जितेंद्र निगडे, तुषार माहुरकर, कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी बापुराव गायकवाड आदी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेतकी अधिकारी सतिश काकडे यांनी केले तर आभार केनयार्ड सुपरवायझर योगेश पाटील यांनी मानले.

# शिक्रापुरच्या वाचनालयाला पुस्तके भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर येथील शासनमान्य भैरवनाथ मोफत वाचनालयास ग्रंथपाल संतोष काळे यांनी वाचनालयास पुस्तके दान व भेट देण्याचे आवाहन काही दिवसांपूर्वी केले असताना, या आवाहनाला वाचक व नागरिकांनी प्रतिसाद दिल्याने तब्बल पस्तीस पुस्तक प्रेमींनी पुस्तके सप्रेम भेट दिली. ग्रामपंचायत महिला कर्मचारी मनीषा शिर्के यांनी वाचनालयास जपानी भाषेचा अभ्यासक्रम असलेली व स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त असलेल्या पुस्तकांचा संच



सरपंच रमेश गडदे, उपसरपंच पूजा भुजबळ, ग्रामविकास अधिकारी शिवाजी शिंदे व ग्रंथपाल संतोष काळे यांच्या उपस्थितीत भेट दिली.

याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते दिपक भुजबळ, पोपटराव गायकवाड, राजाराम गायकवाड, ग्रामपंचायत कर्मचारी जयश्री निंबाळकर, सईराम वाबळे यांसह आदी उपस्थित होते दरम्यान ग्रंथपाल संतोष काळे यांनी सर्वांचे आभार मानले.

## कर्डेलवाडीत रोहित्राच्या तांब्याच्या तारांची चोरी

**शिक्रापूर :** कर्डेलवाडी (ता. शिरुर) येथील टायको पेक कंपनी समोरील विद्युत पुरवठा रात्रीच्या सुमारास अचानक बंद झाल्याने विद्युत वितरणचे काही कर्मचारी सदर ठिकाणी पाहणी करण्यासाठी गेले असता, त्यांना त्या ठिकाणचे विद्युत रोहित्र जमिनीवर पडलेले आणि त्यातील तांब्याच्या तारा गायब असल्याचे निदर्शनास आले. याबाबत विद्युत वितरण विभागाचे कर्मचारी महादेव प्रकाश मोरे यांनी रांजणगाव एमआयडीसि पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

# सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी भिगवणला ९ कोटी रुपये मंजुर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भिगवण :** सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी भिगवणला ९ कोटी रुपये मंजुर झाले असल्याची माहिती सरपंच दिपीका क्षीरसागर यांनी दिली.या प्रकल्पामुळे सांडपाण्याची समस्या सुटनार असून, त्याची योग्यरित्या विल्हेवाट लावली जाणार आहे.

नमामी चंद्रभागा अभियानाअंतर्गत नदी संवर्धन व संरक्षण करणे करीता हा प्रकल्प राबविला जात आहे यामुळे नदीमध्ये मिसळणारे सांडपाणी बंद करून या प्रकल्पाद्वारे एकत्रित केले जाणार असून त्यावर शुद्धीकरणाची प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावली जाणार आहे.नदीकाठच्या गावातुन गेल्या अनेक वर्षांपासून सांडपाणी आणि घाण पाण्यात मिसळल्याने चंद्रभागा अर्थात भीमा नदी प्रदूषित झाली आहे.पाण्यात झालेले प्रदूषण रोखण्यासाठी त्याचे संरक्षण आणि संवर्धन करणे गरजेचे असल्याने हा प्रकल्प महत्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पाचे काम तात्काळ सुरू करण्यात येणार असून यातून सांडपाणी समस्या सुटणार असल्याने ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत. प्रकल्प संचालक, जि. प. पुणे यांच्याद्वारे या कामाचे सनियंत्रण करण्यात येणार असून, काम पूर्ण करण्याचा कालावधी पंधरा महिने असणार आहे.

> भिगवण गावाच्या दृष्टीने सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असून सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्याने सदरचे काम मंजूर झाले आहे.या प्रकल्पामुळे नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी मदत होऊन घाण पाण्याची समस्या सुटणार आहे. या प्रकल्पाची संपूर्ण माहिती ग्रामसभा घेऊन गावकऱ्यांना दिली जाईल तसेच या संदर्भातील कागदपत्रे ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करून दिली जातील."
>
> — **दिपीका क्षीरसागर,** सरपंच भिगवण



### संचालक संजय जगताप यांनी दिली माहिती

# जिल्हा बँकेकडून २२५ कोटी १७ लाखांचे पिककर्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने ३० नोव्हेंबर अखेर पुरंदरमधील २६ हजार ७१६ शेतकऱ्यांना खरीप आणि रब्बी हंगामासाठी एकूण २२५ कोटी १७ लाख ९५ हजार रूपयांचे पिककर्ज वाटप करण्यात आल्याची माहिती जिल्हा बँकेचे संचालक व पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप यांनी दिली. बँकेच्या पुरंदरमधील १३ शाखा आणि ९५ विविध कार्यकारी सोसायट्यांच्या माध्यमातून २१ हजार ६८६ हेक्टरहून अधिक क्षेत्रावर पिककर्ज देण्यात आले असून मार्च अखेर पिककर्ज वाटप सुरू राहणार असल्याचेही जगताप यांनी सांगितले.

> १ हजार ९५९ ऊस उत्पादक सभासदांना १ हजार ४७८ हेक्टर क्षेत्रावर २२ कोटी ६९ लाख ७६ हजार रूपये. २४ हजार ३३९ टोमॅटो उत्पादक सभासदांना १९ हजार ७३८ हेक्टर क्षेत्रावर १९४ कोटी ११ लाख ३२ हजार रुपये. गुलाब, कार्नेशन उत्पादक २२ सभासदांना जवळपास १२ हेक्टर क्षेत्रावर १ कोटी ८ लाख ३५ हजार रुपये आणि ३९६ डाळींब व इतर फळ उत्पादक सभासदांना ४५९ हेक्टर क्षेत्रावर ८ कोटी ८ लाख ५२ हजार रुपयांचे पिककर्ज वाटप करण्यात आले आहे."
>
> — **संजय जगताप,** माजी आमदार, संचालक पीडीसीसी बँक



सासवड ( ता.पुरंदर) येथील जिल्हा बँकेच्या विभागीय कार्यालयात संचालक संजय जगताप यांनी बँकेचे अधिकारी आणि विकास सोसायट्यांच्या सचिवांची बैठक घेऊन पिककर्ज वाटपाबाबत आढावा घेऊन सुचना केल्या. शेतमालाचे अनियमित बाजारभाव, बदलते हवामान अशा अनेक कारणांमुळे शेतकरी अडचणीत येतो. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी ज्या शेतकरी सभासदांनी ३१ मार्चपूर्वी पीककर्जाची संपूर्ण बाकी भरली होती अशा सर्व पात्र शेतकऱ्यांना मागील पिककर्जापेक्षा अधिक रक्कम दोन्ही हंगामात देण्यात आल्याचेही संचालक संजय जगताप यांनी सांगितले. यावेळी बँकेचे विभागीय अधिकारी महेश खैरे, वसुली अधिकारी किरण जाधव, पुरंदर नागरीचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे, जिल्हा बँकेचे विकास अधिकारी जयेश गद्रे, शरद वणवे, राजन जगताप, शिरीष जाधव, पवन दुर्गाडे, मयूर भूजबळ, अनिल शिंदे, जिल्हा केडरचे सचिव रफिक शेख, हनिफ सैय्यद, संदिप ताकवले, गंगाराम कादबाने, विजय कांबळे, रविंद्र कांबळे, रसूल शेख, सुहास जगताप, अमोल फडतरे, अमोल यादव, वैभव काकडे, दीपक जगताप, जालिंदर बाठे, दादा खोमणे, राहुल जाधव, राजेंद्र कुदळे, तुकाराम गायकवाड, गणेश दिक्षित, राहुल घारे, साहेबराव साळुंखे, संदीप भोसले, ज्ञानेश्वर पवार, ज्ञानेश्वर यादव सदानंद थेऊरकर, सोमनाथ चव्हाण, संतोष गुरव, बाबुराव गायकवाड यांसह सर्व सोसायट्यांचे सचिव उपस्थित होते.

#रा

## Selected

### जेजुरी महाविद्यालयाची सिद्धी काळाणे सुवर्णपदक विजेती



**जेजुरी :** श्रीरामपूर येथे झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविभागीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत जेजुरी येथील शरदचंद्रजी पवार महाविद्यालयाची तृतीय वर्ष कला विद्या शाखेतील विद्यार्थिनी ५२ किलो वजनी गटात सिद्धी काळाणे हिने सुवर्णपदक पटकाविले. सिद्धी काळाने हिला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. शिवाजी भिंताडे यांचे मार्गदर्शन लाभले. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान पुरंदरचे अध्यक्ष विजय कोलते, सचिव शांताराम पोमण, सहसचिव शिवाजीराव घोगरे, बंडू काका जगताप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी नागणे उपप्राचार्य डॉ. बेबी कोलते व सर्व स्टाफ, विद्यार्थी यांनी सिद्धीचे कौतुक केले.

### शिक्रापुरात शौर्यदिनाच्या पार्श्वभूमीवर रंगीत तालीम



**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी २०१८ रोजी झालेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर प्रशासन विशेष खबरदारी घेत असून सध्या प्रशासन शौर्यदिन कार्यक्रमाच्या तयारीला लागले असताना नुकतेच उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पोलिसांच्या दंगा काबु योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली आहे. कोरेगाव भीमा येथे एक जानेवारी रोजी शौर्यदिनी विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रम पार पडत असताना सदर कार्यक्रम शांततेत पार पडण्यासाठी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्त विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रमाचे नियोजन करत आहे, सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने शिक्रापूर येथे दोन स्वतंत्र पार्किंग करण्यात आलेले असताना, येथील पार्किन परिसरात उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले व पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, महादेव वाघमोडे यांच्या उपस्थितीत रांजणगाव एमआयडीसि व शिरुर पोलीस स्टेशनच्या पोलीस पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची दंगा काबु योजनेची रंगीत घेण्यात आली दरम्यान या दंगा कबु योजना तालीम मध्ये एक टिअर स्मोक सेल सर्प व एक टिअर स्मोक ग्रेनेड वापरण्यात आले असल्याचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी सांगितले.

### विठ्ठलवाडीच्या विद्यालयात बाल वैज्ञानिकांचे प्रदर्शन



**शिक्रापूर :** विठ्ठलवाडी येथील श्री पांडुरंग विद्या मंदिर या विद्यालयात मुख्याध्यापक भाऊसाहेब वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली शालेयस्तरावर अपूर्व विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या अपूर्व विज्ञान मेळाव्यात पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी तब्बल पंचावन्न प्रकल्पांचे सादरीकरण केले आहे.विठ्ठलवाडी येथील श्री पांडुरंग विद्या मंदिर या विद्यालयात बाल वैज्ञानिक प्रदर्शनाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग संघचालक संभाजी गवारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक भाऊसाहेब वाघ, हनुमान तरुण मंडळाचे उपाध्यक्ष बापूसाहेब पवार, कलाशिक्षक संघाचे अध्यक्ष प्रविणकुमार जगताप, अनिल गवारे, अॅड. संतोष गवारे, संदीप गवारे, राहुल गवारे उपस्थित होते, दरम्यान विद्यार्थ्यांना वैज्ञानिकांची माहिती व नाविन्यपूर्ण कल्पना याविषयी माहिती देण्यात आली. या प्रदर्शनास सनराइज् इंग्लिश मीडियम स्कूल मधील विद्यार्थी व शिक्षकांनी भेट देऊन विज्ञान प्रकल्पांची पाहणी केली. सदर अपूर्व विज्ञान मेळाव्याचे संयोजन व परीक्षण विद्यालयाचे विज्ञान शिक्षक प्रभाकर चांदगुडे व शुभांगी जाधव यांनी केले, तर मुख्याध्यापक भाऊसाहेब वाघ यांनी सर्वांचे आभार मानले.

### अकार्यक्षम पोलिस पाटलांवर आरोपपत्र दाखल करा - जमीन हक्क परिषद

**बारामती :** अकार्यक्षम व बेजबाबदार पोलीस पाटील यांच्यावर सदोष आरोपपत्र दाखल करून पोलीस पाटील पदावरून मुक्त करावे, अशी मागणी जमीन हक्क परिषदेचे बारामती तालुका अध्यक्ष युवराज पोटे यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी मुख्यमंत्र्यांना दिले आहे. संबंध राज्यामध्ये टप्याटप्याच्या स्वरूपात नवनियुक्त पोलीस पाटील पदाच्या उमेदवारांची भरती प्रक्रिया पूर्ण करून, त्या सर्वांना पोलीस पाटील पदाचे अधिकार व कर्तव्य बहाल करण्यात आले होते. गावातील कायदा व सुव्यवस्था राखणे व अवैध धंदे रोखण्यासाठी पोलीस व महसूल प्रशासनास माहिती देऊन मदत करणे इत्यादी जबाबदारीचे कर्तव्य असूनही बहुतांश पोलीस पाटील अकार्यक्षम व बेजबाबदारपणे आपले कर्तव्य बजावताना दिसत आहेत.

# आवळ्याची ‘पॉवर’



आवळा या फळाचे आपल्याकडे धार्मिक व सांस्कृतिकही महत्त्व आहे. मात्र, त्याचे आरोग्यासाठी असलेले महत्त्वही कमी नाही. हा निसर्गातील सर्वात शक्तिशाली अँटिऑक्सिडंट आहे. आरोग्यासाठी आवळ्याचे सेवन अनेक प्रकारे लाभदायक ठरते, असे तज्ज्ञ सांगतात. प्रदूषणामुळे शरीरातील पेशींमध्ये होणारे नुकसान टाळण्यासाठी आवळा मदत करतो. भरपूर औषधी गुणधर्म असलेल्या आवळ्याचे फायदे जाणून तुम्हालाही आश्चर्य वाटेल. आवळा वृद्धापकाळ रोखण्यासाठी आणि तारुण्यात आपल्याला बलवान बनवण्यासाठी औषध म्हणून कार्य करतो. अल्झायमरने त्रस्त असलेल्यांसाठी आवळा एक चांगले औषध म्हणून काम करतो. वंध्यत्वाच्या समस्येवर आवळा गुणकारी आहे. यामुळे शारीरिक आणि मानसिक तणावापासून आराम मिळतो तसेचआवळ्याचे सेवन केल्याने शुक्राणूंची संख्या देखील वाढते. आवळा ॲलर्जीपासून बचाव करण्यास मदत करतो. आवळा पेशींमध्ये डीएनएचे संरक्षण करून रक्तवाहिन्यांमधील अँटी-फंगल, प्लेग इनहिबिटर, अँटी-कॅन्सर आणि रोगप्रतिकारक शक्ती म्हणून कार्य करतो. आवळ्यामध्ये १८०० मिलिग्राम व्हिटॅमिन सी, १७ मिलिग्राम कॅल्शियम, २६ मिलिग्राम फॉस्फरस, ३ मिलिग्राम ट्रॉप्टोफेन आणि २ मिलिग्राम मेथिओनिन असते. ते शरीरातील ऊतींचे पुनरुत्पादन करून सांधेदुखीपासून संरक्षण देते. आवळा त्वचेच्या आजारांपासून संरक्षण करतो. आवळ्यामध्ये डाळिंबापेक्षा ६० पट जास्त अँटिऑक्सिडंट्स असतात. आवळा सर्वात शक्तिशाली अँटिऑक्सिडंट मानला जातो. आवळा हे खरे तर उत्तम फळ मानले जाते.आवळ्यामध्ये हळदीपेक्षा दुप्पट अँटिऑक्सिडंट्स असतात, जे सुपरफूड मानले जाते.



# अवघ्या पाच वर्षांचा शेफ

‘आजच्या डिजिटल युगात मुले स्क्रीनच्या आकर्षणाला सहज बळी पडत आहेत. स्मार्टफोन, टॅब्लेटस्? आणि टीव्ही हे त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनले आहेत. पण या स्क्रीनवर आधारित जगातही म्हैसूरमधील एका पाच वर्षांच्या मुलाची गोड कहाणी सध्या चर्चेत आहे. बहुतांश मुलं फोन आणि टीव्हीला चिकटलेली असतात, तेव्हा हा छोटा मुलगा सुट्ट्या घालवण्याचा अनोखा आणि निरोगी मार्ग शोधतोय तो म्हणजे स्वयंपाक!



अथर्व असे या पाच वर्षांच्या छोट्या शेफचे नाव असून, सुट्टीत मोबाईलवर वेळ घालवण्याऐवजी आपल्या आईकडून स्वयंपाक शिकण्यामध्ये त्याने रस दाखवला. अथर्वच्या या उत्साहाला पाहून त्याची आई श्रीविद्या यांनी त्याला प्रोत्साहन दिले. त्यांनी मसाले, डाळी आणि पाककलेची माहिती अथर्वला शिकवायला सुरुवात केली.

मांड्या शहरात राहणाऱ्या श्रीविद्या यांचा मुलगा अथर्व आता आपल्या आईसोबत घरासाठी स्वयंपाक करतो. कधी तो आईजवळ उभा राहून तिला स्वयंपाक करताना पाहतो, तिच्या पद्धती आत्मसात करत एवढंच नाही, तर हळूहळू या लहानग्या शेफने चपाती, डोसा, टोमॅटो भात आणि पुलावसारखे काही पदार्थ स्वतःच बनवायला शिकले आहेत अथर्वच्या आईवडिलांचा मेणबत्तीचा व्यवसाय आहे. अथर्वची ही कहाणी आपल्याला आठवण करून दे की, डिजिटल युगातसुद्धा मुलांना पारंपरिक छंद जोपासायला प्रोत्साहित करणे महत्त्वाचे आहे. स्वयंपाकासारख्या उपक्रमांम सहभागी होणे मुलांच्या सर्जनशीलतेला चालना देते आणि त्यांचे स्क्रीन टाईम कम करते. तंत्रज्ञानाच्या फायद्यांसोबतच, त्याचा अति मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यावर परिणाम करू शक

नुकताच त्याच्या आईने सोशल मीडियावर व्हिडीओ पोस्ट केला आहे, त्यात त म्हणते, ‘‘माझ्या पाच वर्षांच्या मुलासाठी खरेद करणे खरोखरच कठीण आहे. त्याच्या तीन आवडी आहेत. एक म्हणजे मांजर. आमच्याक चार मांजरे आहेत; दुसरी म्हणजे प्लश टॉईज. त्याच्याकडे खूप आहेत आणि तिसरी आवड म्हणजे जुंगकूक. मी त्याला जुंगकूक भेट म्हणू दिला असता; पण तो कुठे मिळणार? जुंगकू जो दक्षिण कोरियन पॉप बँड बीटीएचा सदस्य आहे.

# दुर्मिळ नाणे, किंमत सव्वा चार कोटी

काही दुर्मीळ व जुन्या नाण्यांना लिलावात मोठीच किंमत मिळत असते. मात्र, अमेरिकेत फार जुन्या नव्हे, तर १९७५ मधील एका दुर्मीळ नाण्याला सव्वाचार कोटी रुपयांची किंमत मिळाली आहे. ‘१९७५ नो एस प्रूफ डायम’ या अमेरिकन नाण्याने लिलावाचा हा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. हे नाणे ५,०६,२५० डॉलर म्हणजे ४ कोटी २६ लाख ७४ हजार ९१ रुपयांना विकले गेले. हे नाणे ‘एस’ मिंट चिन्हाशिवाय चुकून जारी केले गेले, ज्यामुळे ते आधुनिक अमेरिकन नाण्यांपैकी एक बनले. अर्ध्या शतकाहून अधिक काळ खासगी ताब्यात राहिल्यानंतर प्रोफेशनल कॉईन ग्रेडिंग सर्व्हिसने १९७५ च्या डायमची पडताळणी केली आणि ग्रेड प्रूफ-६७ दिले. तसेच, सर्टिफाईड एक्सेप्टन्स कॉर्पोरेशनने त्याला मंजुरी दिली आहे. हे नाणे १९७५ साली तयार करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. हे २० व्या शतकातील सर्वात दुर्मीळ नाण्यांपैकी एक असल्याचे म्हटले जाते. लिलाव एजन्सीने सांगितले की, हे नाणे सॅन फ्रान्सिस्कोच्या मिंटने १९७५ मध्ये तयार केलेले अमेरिकन डायम होते. या नाण्यावर तुम्हाला एक चित्र दिसेल. याशिवाय प्रत्येक नाण्यावर बनवलेल्या या नाण्यावर ‘एस’चे चिन्ह बनवलेले नाही. हे ज्या प्रकारचे नाणे आहे, संपूर्ण जगात अशी दोनच नाणी अस्तित्वात आहेत. म्हणूनच हे नाणे इतके दुर्मीळ आहे. ग्रेट कलेक्शन नावाच्या लिलाव गृहाने या दुर्मीळ नाण्याचा ऑनलाईन लिलाव केला. कॅलिफोर्निया ग्रेट कलेक्शन्सचे अध्यक्ष इयान रसेल यांनी सांगितले की, हे नाणे सव्वाचार कोटी रुपयांना विकल्याचा आनंद आहे. लिलावापूर्वी हे नाणे ओहायोच्या तीन बहिणींकडे होते. मात्र, त्यांनी आपली ओळख गुप्त ठेवली आहे. पण लिलाव कंपनीशी बोलताना त्यांनी भावाच्या मृत्यूनंतर हे नाणे मिळाल्याचे सांगितले. त्यांच्या भावाकडे आणि आईकडे दोन नाणी होती, जी त्यांना वारशाने मिळाली होती; पण १९७८ मध्ये यातील एक नाणे परिवाराने १५ लाखांना विकले.




# यंदाचे वर्ष ठरणार सर्वात उष्ण?

जागतिक तापमानवाढ ही अवघ्या जगाचीच चिंता बनलेली आहे. उष्णतेच्या लाटा, भयानक वादळे आणि अचानक आलेला पूर या घटनांमुळं यंदा जगभरात हजारो लोकांना जीव गमवावा लागला आहे. जागतिक तापमानवाढीमुळं या घटनांमध्ये वाढ झाली आहे. युरोपियन हवामान विभागाने वर्तवलेल्या शक्यतेनुसार, २०२४ आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष ठरू शकते. वर्षभरातील जागतिक सरासरी तापमान पूर्व-औद्योगिक पातळीपेक्षा १.५ अंश सेल्सिअस जास्त असण्याची शक्यता आहे.

वैज्ञानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, तापमानवाढ हा धोक्याचा इशारा आहे. पुढील आठवड्यात अजरबैजान येथे होणाऱ्या संयुक्त राष्ट्र हवामान कॉन्फ्रेस ‘कॉप २९’ च्या आधीच आलेल्या या रिपोर्टने चिंता वाढवली आहे. रॉयल मेट्रोलॉजिकल सोसायचीचे अध्यक्ष लिज बेंटले यांनी म्हटलं आहे की, आताच आलेल्या अहवालानुसार ‘कॉप २९’ साठी कठोर इशारा मिळालेला आहे. येत्या काही काळात तापमानात आणखी वाढ होऊ शकते. तापमानवाढ रोखण्यासाठी तत्काळ कारवाईची गरज भासू शकते. २०२४ च्या पहिल्या १० महिन्यांत जागतिक तापमान इतके वाढले आहे की, आता उरलेल्या दोन महिन्यांत तापमान वाढीतील घसरणच हा रेकॉर्ड बनवण्यापासून रोखू शकतो.

युरोपीय कोपरनिकस जलवायू परिवर्तन विभागाच्या अहवालानुसार, २०२४ मध्ये तापमान पूर्व-औद्योगिक काळापेक्षा कमीत कमी १.५५ अंश सेल्सिअस अधिक असेल. पूर्व औद्योगिक काळातील सन १८५०-१९०० हा एक मानक काळ आहे. या काळात माणसाने औद्योगिक क्रांती केली. मात्र, एकीकडे पर्यावरणाचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली. पृथ्वीवर तापमान वाढ होण्यास सुरुवात झाली. अलीकडेच आलेल्या शक्यतांनुसार, २०१४ मध्ये १.४८ सेल्सिअसचा रेकॉर्ड तुटण्याची शक्यता आहे. मागच्या वर्षीच हा नवा रेकॉर्ड तयार झाला होता.



दरम्यान, हिवाळा सुरू झाला असला तरीही तामिळनाडूच्या किनारपट्टीलगत कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन मध्य आणि दक्षिण भारतात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. प्रशांत महासागरातील ला-निना स्थिती डिसेंबरअखेर सक्रिय होण्याचा अंदाज आहे.

# मिमांसा वामकुक्षीची



अनेकजण दुपारी जेवणावर आडवा हात मारून लगेचच आडवे होतात. दुपारची ‘वामकुक्षी’ या नावाने अनेक लोक तासाभराची का होईना झोप काढत असतात. अर्थात, दुपारच्या जेवणानंतर झोप येणे किंवा सुस्ती येणे, हे अगदी साहजिक आहे. ऑफिसमध्ये दुपारच्या जेवणानंतर आपल्या आजूबाजूचे बरेच लोक जांभई देताना दिसतात. कधीकधी आपल्याला शरीरातून सर्व ऊर्जा निघून गेली आहे आणि झोपेशिवाय पर्याय नाही, असेही वाटते. पण, दुपारच्या जेवणानंतर आपल्याला झोप का येते, हे माहिती असणे देखील गरजेचे आहे.

आहारतज्ज्ञांच्या मते, दुपारच्या जेवणानंतर झोप, आळस आणि अशक्तपणा जाणवणे सामान्य नाही. या अवस्थेला फूड कोमा म्हणून ओळखले जाते. या अवस्थेमागे कोणतेही ठोस कारण नाही आणि लोक बऱ्याचदा जेवणानंतर झोप येते म्हणून याकडे दुर्लक्ष करतात. पण, यामागे काही गंभीर कारणे देखील असू शकतात, ज्याकडे दुर्लक्ष करणं महागात पडू शकते. यापैकी काही कारणे अशी : मेंदूतील रक्ताभिसरण कमी होणे- आहारतज्ज्ञांच्या मते दुपारच्या वेळी हलक्या अन्नाचे सेवन करावे. पौष्टिक आहार घेतल्यास पचनासाठी अधिक ऊर्जेची आवश्यकता असते. अन्न पचविण्यासाठी पचनसंस्थेला अधिक रक्ताची आवश्यकता असते. दुपारच्या जेवणानंतर मेंदूतील रक्ताभिसरण कमी होते. हेच कारण आहे की दुपारच्या जेवणानंतर आपल्याला आळस आणि झोप येते. रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होणे- आपल्या शरीराला कार्य करण्यासाठी ऊर्जेची आवश्यकता असते. हे आपण वेळोवेळी नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण यासारख्या जेवणातून मिळवतो. आपण जे अन्न खातो त्यात असलेले पोषण हे आपल्या शरीराच्या ऊर्जेचा प्राथमिक स्रोत आहे. अन्नाच्या सेवनानंतर लगेचच पचन प्रक्रियेमुळे रक्तातील साखरेच्या पातळीत लक्षणीय घट होते. यामुळे तंद्री आणि झोप येते. तज्ज्ञांच्या मते, जे लोक नाश्ता सोडून थेट दुपारचे जेवण करतात त्यांना ही स्थिती जाणवण्याची शक्यता जास्त असते.

# माऊंट एव्हरेस्टची उंची का वाढतेय?

माऊंट एव्हरेस्ट हे जगातील सर्वात उंच शिखर आहे. पृथ्वीवर अस्तित्वात असलेल्या शिखरांपैकी एव्हरेस्टची उंची समुद्रसपाटीपासून सर्वांत जास्त आहे. या शिखराची उंची आणखी वाढत आहे. ही बाब जरा विचित्र वाटेल; पण ती पूर्णपणे खरी आहे. २००५ मध्ये चीनने त्याची उंची मोजली होती, तेव्हा ती ८८४४.४३ मीटर भरली होती. २०२० मध्ये चीन आणि नेपाळने संयुक्तपणे पुन्हा एव्हरेस्टची उंची मोजली आणि डेटा शेअर केला. नवीन आकडेवारीनुसार, माऊंट एव्हरेस्टची उंची ८,८४९ मीटर झाली आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे एव्हरेस्टची उंची वाढण्यासाठी एक नदी कारणीभूत ठरत आहे. युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनच्या एका संशोधनातून ही बाब उघड झाली आहे.

माऊंट एव्हरेस्ट हे जगातलं सर्वांत मोठे शिखर नेपाळच्या हद्दीमध्ये आहे. नेपाळमध्ये त्याला ‘सागरमाथा’ नावाने ओळखले जाते. २०१७ मध्ये नेपाळने जगातल्या सर्वोच्च शिखराची उंची मोजण्यास सुरुवात केली होती. कारण २०१५मध्ये तिथे झालेल्या भूकंपाचा माऊंट एव्हरेस्टवरही परिणाम झाला आहे, असे मानले गेले. नंतर चीनही उंची मोजण्याच्या कामात सहभागी झाला. सुमारे दोन वर्षांनी हे काम पूर्ण झाले. २०२० मध्ये जेव्हा एव्हरेस्टची उंची जाहीर करण्यात आली, तेव्हा शास्त्रज्ञांना धक्का बसला. त्यानंतर लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमधल्या संशोधकांनी याबाबत अधिक संशोधन केले.

या संशोधनानुसार, माऊंट एव्हरेस्टपासून ७५ किलोमीटर दूर वाहणाऱ्या अरुण नदीमुळे शिखराची उंची सुमारे ८९,००० वर्षांत १५ ते ५० मीटरने वाढली आहे. नदीच्या भूपातळीतल्या बदलांमुळे एव्हरेस्टची उंची दर वर्षी दोन मिलिमीटरने वाढत आहे. जीपीएस उपकरणांच्या मदतीने हा बदल स्पष्टपणे पाहिला जाऊ शकतो. लाखो वर्षांपूर्वी भारतीय आणि युरेशियन टेक्टॉनिक प्लेट्सची टक्कर (भूकंप) होऊन हिमालयाची निर्मिती झाली होती. आतापर्यंत याच टेक्टॉनिक प्लेट्सच्या घर्षणामुळे एव्हरेस्टची उंची वाढत आहे, असे मानले जात होते. पण, लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजच्या संशोधनातून एक अनोखा पैलू समोर आला आहे.



या संशोधनात सहभागी असलेले ॲडम स्मिथ यांनी दिलेल्या माहितीनुसार, समुद्रातील जहाजाच्या उदाहरणासह ही प्रक्रिया समजून घेता येईल. जर आपण समुद्रा जहाजातून सामान बाहेर फेकायला सुरुवात केली, तर जहाजाचा वरच्या वजनाचा भा कमी होतो आणि ते पाण्यात आणखी वर येऊन तरंगू लागतं. त्याचप्रमाणे, जेव्हा जमिनीवरून वाहणारी नदी गाळ वाहून आणते तेव्हा पृथ्वीच्या कवचाचा थर थोडा वर उचलला जातो. या प्रक्रियेला ‘आयसोस्टॅटिक रिबाऊंड’ म्हणतात. एडिंनबरा युनिव्हर्सिटीतील स्कूल ऑफ जिओ-सायन्सेसमधले प्रोफेसर ह्यू सिंक्लेअर यांचे म्हण आहे की, या संशोधनात ठळक केलेली कारणे योग्य वाटत असली तरी त्याबाबत का प्रश्न निर्माण होत आहेत. ते म्हणाले, की एव्हरेस्टच्या उंचीसाठी नदीच्या पात्रातील धू प्रक्रियेला कारणीभूत ठरवणे थोडे अनिश्चित वाटत आहे.

# किंग कोब्राच्या नव्या प्रजाती

जगातील सर्वात मोठा विषारी सर्प म्हणजे किंग कोब्रा. अन्य साप खाणारा व घरटे बांधून अंडी घालणारा हा साप अनेक बाबतीत लोकांच्या तसेच संशोधकांच्याही कुतूहलाचा विषय असतो. गेल्या १८८ वर्षांपासून किंग कोब्राची एकच प्रजाती असल्याचे समजले जात होते. मात्र, वास्तवात त्याच्या चार प्रजाती असल्याचे आता निष्पन्न झाले आहे.

यापूर्वी किंग कोब्राला ‘ओफिओफेगस हन्नाह’ या एकाच प्रजातीचे समजले जात होते. मात्र, आता नव्या संशोधनात आढळले आहे की, वेगवेगळ्या भागातील या चार प्रजातींमधील किंग कोब्राच्या शारीरिक रचनेपासून ते जनुकीय संरचनेपर्यंत अनेक बाबतीत भेद आहेत. यापूर्वी २०२१ मधील एका संशोधनातही म्हटले होते की, किंग कोब्रा सापांमध्ये जनुकीय भेद अस्तित्वात आहेत. या संशोधनाचा आधार घेऊनच हे नवे संशोधन करण्यात आले. संशोधकांनी काही म्युझियम स्पेसिमन्स म्हणजेच संग्रहालयात ठेवलेल्या किंग कोब्राचे काही नमुने घेऊन याबाबतचा अभ्यास केला. त्यावेळी त्यांना अनेक शारीरिक भेद दिसून आले. त्यावरून त्यांनी आता चार नव्या प्रजाती ठरवल्या आहेत. त्यामध्ये नॉर्दन किंग कोब्रा (ओ.हन्नाह), सुंदा किंग कोब्रा (ओफिओफेगस बंगारस), वेस्टर्न घाट किंग कोब्रा (ओफिओफेगस कलिंगा ) व ल्युझन किंग कोब्रा (ओफिओफेगस सॅल्वाटना). याबाबतच्या संशोधनाची माहिती ‘युरोपियन जर्नल ऑफ टॅक्सोनॉमी’च्या १६ ऑक्टोबरच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. कलिंगा फौंडेशनचे संस्थापक आणि कलिंगा सेंटर फॉर रेनफॉरेस्ट इकॉलॉजीचे संचालक गौरीशंकर पोगिरी यांनी याबाबतचे संशोधन केले आहे. त्यांनी सांगितले की, हे संशोधन म्हणजे इतिहास घडवण्यासारखीच बाब आहे. किंग कोब्रा हे आर्द्रतायुक्त पर्यावरणात राहतात. विशेषतः, खुली जंगले तसेच पाणथळ जागी असलेल्या घनदाट मॅंग्रोव्ह झुडपांच्या परिसरातही आढळतात. भारतात पश्चिम घाटासह अन्यही काही ठिकाणी तसेच दक्षिण चीनपासून संपूर्ण आग्नेय आशियात किंग कोब्रा आढळतो. वेगवेगळ्या भागातील किंग कोब्राच्या शरीराचा रंग, पॅटर्न व आकारात बदल असतो, असे दिसून आले. २०२१ च्या अभ्यासावेळी किंग कोब्रांच्या डीएनएचे विश्लेषण करण्यात आले होते. त्यानुसार त्यांचे चार प्रमुख जनुकीय वंश असल्याचे आढळले. आता तेच चार वेगवेगळ्या प्रजाती असल्याचे निष्पन्न झाले आहे. या अभ्यासासाठी १५३ म्युझियम स्पेसिमन्सचा वापर करण्यात आला.



## अशा आहेत चार नव्या प्रजाती

- **नॉर्दन किंग कोब्रा(ओ. हन्नाह) :** हे पूर्व भारत, म्यानमार आणि इंडो-चायना परिसरातील हिमालयाच्या भागात आढळतात. पुढे थायलंडपर्यंतही त्यांची व्याप्ती आहे. या प्रजातीचे प्रौढ साप गडद काठाचे व पिवळ्या पट्ट्यांचे असतात.
- **सुंदा किंग कोब्रा (ओ. बंगारस) :** हे मलाय पेनिन्सुलामध्ये तसेच ग्रेटर सुंदाच्या सुमात्रा, बोर्नियो व जावासारख्या बेटांवर आणि फिलिपाईन्समध्ये आढळतात. यापैकी बहुतांश किंग कोब्रा हे कोणतेही पट्टे नसलेले किंवा अतिशय अरुंद, फिकट पट्ट्यांचे व गडद काठाचे असतात.
- **वेस्टर्न घाट किंग कोब्रा (ओ. कलिंगा) :** हे भारतातील पश्चिम घाटात आढळतात. त्यांचे ‘ओ.बंगारस’ पेक्षा वेगळेपण त्यांच्या फिकट बँड्सभोवती नसलेल्या गडद काठांमुळे ओळखता येते.
- **ल्युझन किंग कोब्रा (ओ. सॅल्वाटाना) :** हे उत्तर फिलिपाईन्समधील ल्युझन बेटावर आढळतात. त्यांचे शरीर अतिशय कमानदार व फिकट रंगाचे असते. त्यांच्या शरीरावर अन्य प्रजातींसारखे गडद पट्टे किंवा काठ नसतात.



अश्विन संघ व्यवस्थापनला असे सांगू शकला असता की, ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेनंतर मी भारतीय संघासाठी उपलब्ध असणार नाही; पण त्याने थेट निवृत्तीचा निर्णय घेतला. सिडनी येथील खेळपट्टी फिरकी गोलंदाजांना पोषक अशी असते.
— सुनील गावसकर

"महेंद्र सिंग धोनी आला आणि मला म्हणाला, 'रवी मला खेळडूंसोबत ५ मिनिटे बोलायचे आहे.' मला वाटलं तो, चांगलं खेळल्याबद्दल खेळाडूंचे कौतुक करेल. पण तो म्हणाला, "आता मी कसोटी क्रिकेटमधून बाजूला होतोय."
— रवी शास्त्री



### त्रिशाच्या अर्धशतकासह १२.१ षटकांतच केले लक्ष्य पूर्ण

# भारताचा मोठा विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय १९ वर्षांखालील महिला संघाने आशिया कप २०२४ स्पर्धेत बांगलादेशविरूद्धचा दणदणीत विजय मिळवला. भारताने हा सामना अवघ्या १२.१ षटकातच जिंकला. भारताने नाणेफेक जिंकून भारताने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला व बांगलादेश संघाचा डाव ८ बाद ८० धावांवर रोखला. प्रत्युत्तरात भारताची सलामीवीर जी त्रिशाने ५८ धावांची नाबाद खेळी केली. त्रिशाला कर्णधार निक्की प्रसादची २२ धावांची साथ मिळाली आणि भारताने सामन्यात ८ विकेट्सने बाजी मारली.


याआधी भारताने स्पर्धेत पाकिस्तान व नेपाळ संघाला पराभूत केले व आज बांगलादेशवर मात केली. प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या बांगलादेशचा पहिला विकेट मिळवण्यासाठी भारताला ५.२ षटकांपर्यंत वाट पाहावी लागली. २७ व्या षटकात भारताला पहिला विकेट मिळाला. ज्यामध्ये मस्त इव्हा १४ धावा करून माघारी परतली. त्यानंतर बांगलादेशचे विकेट्स जायला सुरूवात झाली. बांगलादेशच्या अवघ्या ४ खेळाडूंना दुहेरी धावा करता. २० षटकांअंती बांगलादेशला ८० धावांपर्यंत मजल मारता आली.

भारतीय गोलंदाज आयुषी शुक्ला हीला सामन्यात ३ विकेट्स घेण्यात यश आले. सोनम यादवला २, मिथीला व्ही शबनम शकील यांना प्रत्येकी १ विकेट घेता आला.

८१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताला १० धावांवर पहिला विकेट गमवावा लागला. सलामीवीर जी कामिलिनीला शून्यावर माघारी परतावे लागले. तिच्या जागी फलंदाजीसाठी आलेली सानिका चाळकेही १ धावेवर बाद झाली. दोघींनाही मस्त अनिशा अक्तर सोबा हीने बाद केले. पण त्यानंतर सालामीवर जी त्रिशा व कर्णधार निकी प्रसाद हिने दमदार फटकेबाजी केली. जी त्रिशाने ४५ चेंडूत ५८ धावांची नाबाद खेळी केली. ज्यामध्ये तिने १० चौकार ठोकले. तर निकी प्रदासने १ चौकार व २ षटकारांसह १५ चेंडूत २२ धावांची खेळी केली. दोघींनी ४६ चेंडूत ६४ धावांची नाबाद खेळी केली आणि अवघ्या १२.१ षटकात भारताला विजय मिळवून दिला.

## श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती हिला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम- जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत ओॲसिस सोलापूर ओपन एमएसएलटीए - एसडीएलटीए २५हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत भारताच्या श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती हिने विजेतेपद संपादन केले.

एम. एस. एल. टी. ए. टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे पार पडलेल्या या स्पर्धेत एकेरीत अंतिम फेरीत भारताच्या पाचव्या मानांकित श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती हिने थायलंडच्या बुन्यावी थामचैवतचा ७-५, ६-३ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. हा सामना २तास ४५मिनिटे चालला. सामन्यात सुरुवातीला दोन्ही खेळाडूंनी आपापल्या सर्व्हिस राखल्या. त्यानंतर श्रीवल्लीने बुन्यावीची चौथ्या गेममध्ये सर्व्हिस ब्रेक केली व हा सेट ७-५ असा जिंकून विजेतेपदाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले. दुसऱ्या सेटमध्ये श्रीवल्लीने बुन्यावीला कमबॅक करण्याची फारशी संधी दिली नाही व हा सेट ६-३ असा जिंकून विजेतेपदावर आपले नाव कोरले.

स्पर्धेतील एकेरीतील विजेत्या खेळाडूला करंडक व २,२९,०००/-, तर उपविजेत्या खेळाडूला करंडक व १,७४,०००/- अशी पारितोषिके देण्यात आली.

## पार्ट टाईम क्रिकेटर असलेला खेळाडू न्यूझीलंडचा नवा कर्णधार



**नवी दिल्ली :** न्यूझीलंडने बुधवारी त्यांच्या मर्यादित षटकांच्या संघाचा कर्णधार म्हणून मिचेल सँटनर याच्या नावाची अधिकृत घोषणा केली आहे. सँटनर त्याच्या इंस्टा बायोमध्ये पार्ट टाईम क्रिकेटर आणि फुल टाईम गोल्फर असे लिहितो. जूनमध्ये झालेल्या ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेनंतर केन विलियम्सनने ही जबाबदारी सोडली होती आणि आता सँटनर किवींचा नवा कर्णधार असणार आहे. २४३ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ब्लॅककॅप्सचे प्रतिनिधित्व करणारा सँटनरने यापूर्वी २४ ट्वेंटी-२० व ४ वन डे सामन्यांत संघाचे नेतृत्व सांभाळले आहे. आता तो ओडीआय आणि टी-२० या दोन्ही संघाचे कायमस्वरूपी नेतृत्व सांभाळेल. डिसेंबरच्या अखेरीस आणि जानेवारीच्या सुरुवातीला श्रीलंकेविरुद्धच्या आगामी ट्वेंटी-२० आणि वन डे मालिकेत ३२ वर्षीय खेळाडू अधिकृतपणे पूर्णवेळ कर्णधारपदाचा कार्यकाळ सुरू करेल. या दोन्ही मालिकेतून संघ आगामी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या तयारीचा श्रीगणेशा करतील. पाकिस्तानमध्ये फेब्रुवारी महिन्यात न्यूझीलंड तीन वन डे सामन्यांची मालिका खेळणार आहे.

## पुण्यातील डॉ. संतोष तेली यांना सुवर्णपदक

**नवी दिल्ली :** इंटरनॅशनल कुराश असोसिएशनच्या वतीने मंगोलिया येथे घेण्यात आलेल्या जागतिक कुराश चॅम्पियनशिप स्पर्धेत पुण्यातील डॉ. संतोष तेली यांनी पहिल्यांदाच सुवर्णपदक पटकविले. त्यानिमित्त कुराश असोसिएशन ऑफ महाराष्ट्रातर्फे डॉ. संतोष तेली यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. अर्जुन पुरस्कार विजेते काका पवार यांच्या हस्ते डॉ. तेली यांना शाल, पुष्पगुच्छ, मानपत्र व सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले. नवी पेठेतील पत्रकार भवनात झालेल्या कार्यक्रमात कुराश असोसिएशनचे अध्यक्ष अंकुश नागर, सचिव शिवाजी साळुंखे, खजिनदार सोनाली नागर, डॉ. नंदिनी तेली, करणसिंह मोहिते आदी उपस्थित होते.व्यवसायाने अस्थिरोगतज्ज्ञ असलेल्या डॉ. तेली यांनी वरिष्ठ, ६५ किलो वजनी गटात ही चमकदार कामगिरी केली. विविध फेऱ्यांमध्ये उत्कृष्ट खेळ करीत अंतिम फेरी गाठल्यानंतर डॉ. तेली यांनी राजस्थान येथील धर्मेंद्र कुमार या भारतीय खेळाडूला मात देत सुवर्णपदकाला गवसणी घातली.

## संजूला एकदिवसीय संघातून बाहेरचा रस्ता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताची प्रमुख देशांतर्गत एकदिवसीय स्पर्धा विजय हजारे ट्रॉफी २१ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. त्यासाठी संघांची घोषणा केल्या जात आहे. केरळनेही मंगळवारी आपला संघ जाहीर केला आहे, पण त्यात प्रमुख खेळाडू संजू सॅमसनच्या नावाचा समावेश करण्यात आलेला नाही. तेव्हापासून संजूला संघात का स्थान मिळाले नाही, अशी चर्चा सुरू होती, मात्र आता त्यामागचे मोठे कारण समोर आले आहे.

संजू अलीकडेच संघाच्या शिबिरात सामील झाला नव्हता आणि त्यामुळेच त्याला संघातून वगळण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. त्याच्या नावाचा संभाव्य संघात समावेश करण्यात आला होता, मात्र अंतिम संघात त्याचा समावेश करण्यात आलेला नाही.

अलीकडेच सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत केरळचे कर्णधारपद भूषवणाऱ्या संजू सॅमसनला विजय हजारे ट्रॉफीच्या संघातून वगळण्यात आले आहे. तयारी शिबिरात संघ सहभागी न होणे हे त्यामागचे प्रमुख कारण असल्याचे सांगितले जात आहे. केरळने गेल्या आठवड्यात या स्पर्धेसाठी ३० सदस्यीय संभाव्य संघाची घोषणा केली होती आणि त्यानंतर तीन दिवसांनी तयारीसाठी शिबिर आयोजित केले होते. केरळने वायनाडच्या कृष्णगिरी स्टेडियमवर दोन सराव सामने खेळले.

## भारतावर इंडीजचा दणदणीत विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हेली मॅथ्यूजने झळकावलेल्या नाबाद ८५ धावांच्या खेळीच्या जोरावर वेस्ट इंडिज महिला क्रिकेट संघाने नवी मुंबईत पार पडलेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात यजमान भारतीय महिला संघावर नऊ विकेट व २६ चेंडू राखून शानदार विजय मिळवला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी केली.

भारतीय महिला संघाकडून वेस्ट इंडिज संघासमोर १६० धावांचे आव्हान उभे ठाकले. हेली मॅथ्यूज व कियाना जोसेफ या जोडीने ६६ धावांची भागीदारी करीत आश्वासक सुरुवात करून दिली. साईमा ठाकोरने कियाना हिला ३८ धावांवर बाद करीत जोडी तोडली. त्यानंतर मॅथ्यूज व शेमेन कॅम्पबेल या जोडीने नाबाद ९४ धावांची भागीदारी रचत वेस्ट इंडिजच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. मॅथ्यूज हिने १७ चौकारांसह नाबाद ८५ धावांची खेळी केली. कॅम्पबेल हिने नाबाद २९ धावा केल्या.

### २३व्या गुरू तेगबहादुर गोल्ड कप फुटबॉल स्पर्धेत

## लौकिक एफसी, नवमहाराष्ट्र, सनी डेज, बीटा एफसी संघ उपांत्यपूर्व फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** गुरू श्री तेगबहादुर यांच्या हौतात्म्याला ३४९ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून लायन रानी अहलूवालीया व गुरू तेगबहादुर फाऊंडेशनचे अध्यक्ष एस. एस. अहलुवालिया, गुरू तेगबहादुर फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित २३व्या गुरू तेगबहादुर गोल्ड कप फुटबॉल स्पर्धेत लौकिक एफसी, नवमहाराष्ट्र एफसी, सनी डेज, बीटा एफसी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. यावेळी पीडीजी एमजेएफ लायन बी.एल. जोशी या प्रसंगी उपस्थित होते. याप्रसंगी लायन रानी अहलूवालीया यांनी गेल्या २३ वर्षापासून सातत्याने फुटबॉल स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल डॉ. पट्टी हिल, इंटरनॅशनल प्रेसिडेंट लायन्स क्लब ऑफ इंटरनॅशनल यांच्या वतीने प्रशस्तिपत्रक देऊन गौरवण्यात आले.

रेंजहिल्स स्पोर्ट्स मैदान, खडकी येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत उप उपांत्यपूर्व फेरीत ज्युनियर गटात पहिल्या लढतीत वैभव दोडके(२९मि.) याने केलेल्या एकमेव गोलाच्या जोरावर नवमहाराष्ट्र एफसी संघाने रेंजहिल्स मिलान एफसी संघाचा १-० असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली. दुसऱ्या सामन्यात लौकिक एफसी संघाने राहुल एफसी संघाचा १-० असा पराभव केला. विजयी संघाकडून हरीश तुमरन(२९मि)याने चेतन सिंगच्या पासवर गोल करून संघाला विजय मिळवून दिला.

चुरशीच्या लढतीत बीटा एफसी संघाने अशोका एफसी संघाचा टायब्रेकरमध्ये ५-२ असा पराभव केला. निर्धारित वेळेत बीटा एफसीकडून झीयान बेपारी 34मि.) याने तर, अशोका एफसीकडून साहिल पायडे(३७मि.)यांनी प्रत्येकी एक गोल केला व त्यामुळे सामना १-१ असा बरोबरीत सुटला.

## यूपी योद्धाजचा हरियाना स्टीलर्सवर सनसनाटी विजय



**नवी दिल्ली :** यूपी योद्धाज संघाने प्रो कबड्डी स्पर्धेतील मंगळवारच्या साखळी फेरीच्या लढतीत उत्कृष्ट सांघिक कौशल्य दाखवत हरियाना स्टीलर्स संघावर ३१-२४ असा सनसनाटी विजय नोंदविला. या विजयासह त्यांनी प्ले ऑफच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले. मध्यंतराला यूपी योद्धाज संघाकडे दोन गुणांची आघाडी होती. या सामन्याच्या सुरुवातीपासूनच दोन्ही संघांमध्ये आघाडी घेण्यासाठी सतत संघर्ष दिसून येत होता. दहाव्या मिनिटाला हरियाना संघ ६-५ असा आघाडीवर होता. मात्र यूपीच्या खेळाडूंनी जिद्द सोडली नाही. ७-१० अशा पिछाडीवरून त्यांनी १८ व्या मिनिटाला लोण चढवला व १३-११ अशी आघाडी घेतली. मध्यंतराला त्यांच्याकडे १५-१३ अशी नाममात्र आघाडी होती. उत्तरार्धातही यूपीच्या खेळाडूंनी जोरदार चढाया आणि भक्कम पकडी याच्या जोरावर आणखी एक लोण नोंदवण्यात यश मिळविले. त्यामुळे त्यांना २३-१४ अशी मोठी आघाडी घेता आली.

## पिंकाथॉनच्या 'जेबीजी इनव्हिन्सिबल वुमेन्स रन'ला मोठा प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** पिंकाथॉनच्या सहकार्याने एलए (एलए) शील्ड द्वारा समर्थित जेबीजी इनव्हिजीबल वुमन्स रन दुसरी आवृत्तीचा समारोप नुकताच मुंबईत झाला. हा महिलांसाठी दोन दिवसांचा कार्यक्रम होता. महिलांना त्यांच्या आरोग्य आणि तंदुरुस्तीला प्राधान्य देण्यासाठी प्रोत्साहित करणे हा त्या मागचा उद्देश होता.

कार्यक्रमात विविध अंतराच्या धावण्याच्या शर्यतींचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये हजारो महिलांनी भाग घेतला होता. फिटनेस आयकॉन आणि मॉडेल मिलिंद सोमण यांनी या शर्यतीला हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली.

मॅरेथॉन व्यतिरिक्त सुमारे पाच हजार महिलांनी आरोग्य आणि फिटनेसशी संबंधित इतर उपक्रमांमध्ये भाग घेतला. पिंकाथॉनने ब्रेस्ट कॅन्सर आणि इतर महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांबाबत जनजागृती मोहीमही सुरू केली.

मॉडेल मिलिंद सोमण म्हणाले, 'सध्या खूप छान वाटत आहे कारण हे कोविड नंतर पहिल्यांदाच घडत आहे आणि ते इनव्हिजीबल वुमन्स रनच्या सहकार्याने घडत आहे. येथील अंतर ३ किलोमीटर ते १०० किलोमीटर इतके आहे.

## हेड मेलबर्न कसोटीत खेळणार नाही?

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाचा फलंदाज ट्रॅव्हिस हेड बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये भारतीय गोलंदाजांसाठी डोकेदुखी ठरला आहे. आतापर्यंतच्या तिन्ही कसोटी सामन्यांमध्ये त्याने उत्कृष्ट कामगिरी करत ऑस्ट्रेलियाकडून बॉर्डर गावस्कर ट्रॉफी २०२४-२५ मध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे.

मात्र, हा खेळाडू पुढील कसोटी सामन्यात खेळणार की नाही हे अद्याप निश्चित नाही. गाबा कसोटी सामन्याच्या पाचव्या दिवशी त्याला दुखापत झाली, त्यानंतर त्याच्या खेळण्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. गाबा कसोटीच्या पाचव्या दिवशी हेड फलंदाजीसाठी आला तेव्हा तो अडचणीत असल्याचे स्पष्टपणे दिसत होते. हेड मांडीच्या दुखापतीने त्रस्त आहे.

## झिदाने स्वीलर्स, हिलयॉस ईगल्स संघाची विजयी सलामी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुना क्लब लिमिटेड आयोजित पीसीएफएल(पुना क्लब फुटबॉल लीग) स्पर्धेत साखळी फेरीत झिदाने स्वीलर्स, हिलयॉस ईगल्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली.

पुना क्लब फुटबॉल मैदान येथे सुरू असलेल्या मुंबई फाल्कन्स अँड टेरीरोचे मालक अमित गढोक यांचे प्रायोजकत्व लाभलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत सलामीच्या लढतीत समर्थ सोनावणे १०,१९ मि.) याने केलेल्या दोन गोलाच्या जोरावर झिदाने स्वीलर्स संघाने जियो लिजेंड्स संघाचा ३-१ असा पराभव करून शानदार सुरुवात केली. पराभुत संघाकडून ओंकार कुलकर्णी १६ मि.)याने एक गोल केला.

## आर्यन्स् क्रिकेट, क्रिकेट नेक्स्ट संघांची विजयी कामगिरी

**पुणे :** स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'स्पोटर्सफिल्ड अजिंक्यपद करंडक' १७ वर्षाखालील आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धेत आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमी आणि क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी या संघांनी प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.



मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत अर्जुन पाटील याने केलेल्या ७७ धावांच्या जोरावर क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीने बीएस्पोटर्स क्रिकेट ॲकॅडमीचा ६ गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळताना बीएस्पोटर्स क्रिकेट ॲकॅडमीने १९९ धावांचे लक्ष्य उभे केले. आदेश जगदाळे (३८ धावा), आयुष बिराजदार (३६ धावा) आणि सोहम लिंभोरे (नाबाद ३० धावा) यांनी संघाचा डाव उभा केला. क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीने हे लक्ष्य ३१.१ षटकात पूर्ण केले. अर्जुन पाटील याने ७७ धावांची तर, राज देवोकर (३२ धावा), तनिष्क गांधी (३२ धावा) आणि शौनक पंजाबी (नाबाद २४ धावा) यांनी धावांचे योगदान देत संघाला विजय मिळवून दिला.

### कटककर करंडक अखिल भारतीय आंतर क्लब

## वॉटर पोलो स्पर्धेत इंडियन नेव्ही संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** डेक्कन जिमखाना यांच्या तर्फे आयोजित कटककर करंडक अखिल भारतीय आंतर क्लब वॉटर पोलो स्पर्धेत अंतिम फेरीत इंडियन नेव्ही संघाने मिस्टिक ९६ रायगड संघाचा १०-८ असा पराभव करून विजेतेपद संपादन केले.

डेक्कन जिमखाना टिळक तलाव येथे पार पडलेल्या 'कॅट कंट्रोल्स' चे हेमंत कटककर यांचे प्रायोजकत्व लाभलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीच्या चुरशीच्या लढतीत इंडियन नेव्ही संघाने मिस्टिक ९६ रायगड संघाचा १०-८ असा पराभव केला. विजयी संघाकडून भागेश कुथे ३, अनंथू जी एस २, अभिशेष गुप्ता २, आनंद एम एस २, वैभव कुथे १ यांनी गोल करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. तिसऱ्या क्रमांकांच्या लढतीत उदय उत्तेकर ७, ऋतुराज बीडकर ५, आदर्श व्ही एस ४, अमलकुमार ३, निमिष निझामपूरकर १ यांच्या सुरेख कामगिरीच्या जोरावर सेंट्रल रेल्वे संघाने एअरफोर्स संघाचा २०-१४ असा पराभव करून तिसरा क्रमांक पटकावला. याआधीच्या उपांत्य फेरीच्या लढतीत मिस्टिक ९६ रायगड संघाने इंडियन एअरफोर्स संघाचा १४-९ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. मिस्टिक ९६ रायगड संघाकडून अश्विनीकुमार कुंडे ५, भूषण पाटील ३, अक्षयकुमार कुंडे ३, करण शुक्ला 2, मनिष खोमणे १ यांनी गोल केले. दुसऱ्या सामन्यात इंडियन नेव्ही संघाने सेंट्रल रेल्वे संघाचा १८-१७ असा संघर्षपूर्ण पराभव केला. या स्पर्धेतल्या पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे ५० हजार, ३० हजार आणि २० हजार रुपयांची रोख पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धेतला सर्वोत्कृष्ट गोलकिपर म्हणून कलकत्ता स्पोर्टस क्लबचा पलाश जोयरदार आणि सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून उदय उत्तेकर यांना गौरवण्यात आले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण कॅट कंट्रोलचे हेमंत कटककर, विश्वेश कटककर, स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे जनरल सेक्रेटरी मोनल चोक्सी, स्विमिंग फेडरेशनच्या सदस्या नीता तळवलीकर, डेक्कन जिमखान्याचे मानद सचिव मिहीर केळकर, क्लबचे वित्तीय विभागाचे सचिव गिरीश इनामदार, स्पर्धा सचिव शौर्य करंदीकर, डेक्कन जिमखान्याच्या नियामक मंडळाचे सदस्य अमित गोळवलकर उपस्थित होते.

#रा

## व्हिनिसियस ज्युनिअर 'फिफा'चा वर्षातील सर्वोत्तम खेळाडू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**दोहा :** रियल माद्रिदचा स्टार फुटबॉलर व्हिनिसियस ज्युनिअर 'फिफा'च्या वर्षातील सर्वोत्तम खेळाडू पुरस्काराचा मानकरी ठरला. याचवेळी महिला गटात बार्सिलोनाची ऐताना अव्वल खेळाडू ठरली. २४ वर्षीय व्हिनिसियस यापूर्वी ऑक्टोबरमध्ये बॅलॉन ओडोर पुरस्कार हुकल्याने निराश झाला होता. मात्र, येथे व्हिनिसियसने पुरस्कारावर आपली मोहोर उमटवत ती कसर भरून काढली. योगायोग म्हणजे ऑक्टोबरमध्ये बॅलॉन ओडोर पुरस्कार जिंकणारा मँचेस्टर सिटीचा मिडफिल्डर रॉड्री येथे फिफा पुरस्काराच्या शर्यतीत व्हिनिसियसपेक्षा पाच गुणांनी मागे राहत दुसऱ्या स्थानी फेकला गेला.

२४ वर्षीय ब्राझिलियन व्हिनिसियस फिफाचा हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी माद्रिदतर्फे इंटरकाँटिनेंटल कप फायनल खेळल्यानंतर दोहाकडे रवाना झाला. फिफाचा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर व्हिनिसियस अतिशय भावुक होत म्हणाला, मला आज कुठून सुरुवात करावी, हे देखील उमजत नाही. गोनॅलोच्या रस्त्यावर अनवाणी पायाने खेळत मी सुरुवात केली; पण तेथून इथवर उत्तुंग झेप घेता येईल, हे माझ्या स्वप्नातही नव्हते. आता ज्या मुलांना आपल्याला काहीच शक्य नाही, असे वाटते, त्यांच्यासाठी मी अधिक वेळ देणार आहे. जागतिक स्तरावरील सर्वोत्तम खेळाडू ठरण्यासाठी मला बरेच परिश्रम घ्यावे लागले आहेत आणि या सर्व परिश्रमाचे, त्यागाचे आता खऱ्या अर्थाने सोने झाले आहे.